म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३८६



किं. १ रु

REFBK-0006154

वि. पां. दांडेकर

" मला ज्यावेळीं कांहींहि काम नसतें—आणि असले क्षण माझ्या आयुष्यांत कांहीं थोडे येतात—त्यावेळीं मला समाधान वाटतें. हातपाय ताणून आळोखे देत, शून्य दृष्टीनें छताकडे किंवा आकाशाकडे पाहात मी ज्यावेळीं पडून रहातो त्यावेळीं जगाच्या सम्राटाचें वैभव माझ्या पायाशीं पडून आहे असें मला भासतें. बस्स, कांहीं देखील करावयाचें नाहीं. आळस द्यायचा आणि डोळ्यांनीं जें दिसेल तें बघावयाचें किंवा, डोळ्यांची इच्छा नसल्यास डोळेहि मिटून ठेवावयाचे. असें करीत असतांना मनाला इतकें शांत—शांत वाटतें कीं कांहीं पुसूं नका. हृदयाचें कमळ उमलून त्यांतून पराग स्रवूं लागतात. आत्म्याचा गुंजारव सुरू होतो....आत्मा नाचूं लागतो. हृदय डोलूं लागतें.. असल्या आनंदाचा उपभोग घेतला आहांत का कधीं आपण ? "

—आळस, पृष्ठ १०.

# एक पाऊल पुढें

—: लेखक :—

## वि. पां. दांडेकर

१९४१

REFBK-0006154

किंमत

सव्वा रुपाया

: प्रकाशक :
विश्वनाथ पांडुरंग दांडेकर
हाथीपोळ नाका, बडोदें.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.

तारीख ५-४-१९४१

: मुद्रक :
रा. मथुरदास मोतीलाल राणा
श्री इंदिरा प्रेस, मुतडीझांपा, बडोदें.

श्री. सौ. सुभद्राबाई पगार, पी. ए. टी. डी.

व

कर्नल डॉ. शंकरराव पगार, एम्. ए. पीएच्. डी

यांस

स्नेहपूर्वक समर्पण

# वि. पां. दांडेकर यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १. | कळ्यांची माळ ( लघुकथासंग्रह ) | १– ०–० |
| २. | आजच्या कळ्या ( ,, ) | ०–१०–० |
| ३. | चारित्र्यसुधा ( कादंबरी ) | २– ०–० |
| ४. | केळकरांचीं सहा नाटकें ( प्रबंध ) | १– ४–० |
| ५. | श्रीमंत सयाजीराव महाराज ( चरित्र ) | ०– ८–० |
| ६. | अर्जुन ( चरित्र ) | ०– ६–० |
| ७. | निवृत्तिविनोद ( भाषांतरित ) | १– ८–० |
| ८. | भारतीय समाजस्थिति ( भाषांतरीत ) | १– ४–० |
| ९. | फेरफटका ( लघुनिबंधसंग्रह ) | १– ०–० |
| १०. | टेकडीवरून ( लघुनिबंधसंग्रह ) | १– ०–० |
| ११. | प्रतारणा ( कादंबरी ) | १–१२–० |
| १२. | पौराणिक नाटकें ( प्रबंध ) | ५– ०–० |

पुस्तकें लेखकाकडे 'हाथीखोल नाका, बडोदें.' या पत्त्यावर किंवा सर्व प्रसिद्ध पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १०५०४

# एक पाऊल पुढें

एका चांगल्या, आनंदी, उत्साही आणि आशावादी मनुष्याविषयीं परवां कुणीसें म्हणालें, कीं ' त्याचा उत्साह आणि आशावाद हीं बाहेरचीं आहेत. ती त्याची ऐट आहे. तें त्याचें सोंग आहे, नाटक आहे. त्यांत नाहीं सत्याचा अंश कीं प्रामाणिकपणाचा थेंब. सर्व वरवरचं, खोटं, मुलाम्यासारखं, थोडक्यांत शंभर टक्के नाटक आहे तें. '

या म्हणण्याचें मला हंसू आलें. आनंदाची, उत्साहाची, आशावादाची चव ज्यांनीं चाखली नाहीं, अशा दुबळ्या जीवांचे ते हताश उद्गार होते. जें ज्याला प्राप्त झालें नाहीं, ज्यानें प्राप्त करून घेण्याची खटपट

केली नाहीं, अशांनीं इतरांच्या उत्साहाकडे पाहून नाकें मुरडावींत हेंच स्वाभाविक.

परंतु माझ्या मतानें आनंदाचें नाटक आयुष्यभर करणें अशक्य आहे. वरवरचा आनंद आणि उत्साह जन्मभर टिकणारच नाहीं. शरिराच्या अणुरेणूंतून ज्या वेळीं आनंद नाचू लागतो, उत्साह स्फुरूं लागतो, आशावाद डोलूं लागतो, त्याच वेळीं आपणाला खरोखरीच आनंदी, उत्साही, आशावादी बनतां येतें. येरा गबाळांचें काम नोहे.

उतावळ वाचक म्हणतील, ' आम्ही तेंच तर म्हणतों. हें शक्य नाहीं. हें सर्व नाटक आहे. हें कुणा-च्यानं होणं शक्य नाहीं. '

अशा वाचकांना म्हणावेसें वाटतें, जरा थांबा. सुदैवानें अशी परिस्थिति नाहीं. वाचक म्हणतील, ' वापरलात तुम्हीं दैव शब्द. सुदैवानं आनंदी होतां येतं, हें आम्हांलाहि कबूल; येरव्हीं शक्य नाहीं. '

कांहीं हरकत नाहीं. दैव शब्द दिला सोडून. माझा त्याच्यावर विश्वासहि नाहीं. नुसतेंच म्हणूं या, वस्तु-स्थिति अशी नाहीं. खरोखरीच्या आनंदी आणि उत्साही मनुष्याचा आनंद आणि उत्साह हीं खरीं असतात. तें शंभर नंबरी सोनें असतें. त्यानें तें अनुभवानें, नीट कस लावून प्राप्त करून घेतलेलें असतें. आणि म्हणूनच त्याच्या

देदीप्यमान किरणांनीं तो चमकत असतो, प्रकाशत असतो. तें कांहीं सोंग नसतें. तें सत्य असतें.

एकदम सांगून टाकावयाचें म्हणजे वस्तुस्थिति अशी आहे. ज्याला आपण आशावाद म्हणतों, आनंद म्हणतों, तें परिस्थितीच्या पुढें एक पाऊल टाकणें असतें. नैराश्यानें भरलेली कोणतीहि घटना घ्या, तिच्या पुढें एक पाऊल टाकलें कीं आशेचीं सोनेरीं किरणें चमकतांना आढळतील. आशानिराशेचे किंवा सुखदुःखाचे सीमाप्रांत एकमेकांना लागून असतात. तुम्हीं सीमोल्लंघन करावयाचेंच नाहीं असें म्हटल्यावर तुम्हांला आशेच्या अन् सुखाच्या साम्राज्यांत येतां कसें येणार? दुबळ्यासारखे तुम्हीं जुन्यालाच चिकटून बसावयाचें निश्चित् केल्यास तुम्हांला नव्या अन् चांगल्या गोष्टी मिळणार तरी कशा? ज्या स्थितींत असाल त्याच्यापुढें एक पाऊल टाकलेंत कीं तुम्हांला हवें तें मिळेल. दैवावर विश्वास टाकलात कीं आटोपलेंच! त्यानें तुमच्यावर कुरघोडी केलीच म्हणून समजा. त्यापेक्षां हिमतीनें पुढें या, म्हणजे तुम्हांला दिसेल कीं जिकडेतिकडे प्रकाश आहे, आनंद आहे.

मी म्हणतो तें खरेंच आहे. एक पाऊल पुढें टाकलें कीं दुःख हरपतें, निराशा मालवते.

कांहीं दिवसांपूर्वीं एक चेंडूफळी-सामना पहायला मी गेलों होतों. त्यांत टोलेबाजी करणाऱ्या पक्षाच्या

पहिल्या दोन गड्यांकडून २७ धांवा झाल्यावर तिसरा,—चवथा, पांचवा हे गडी १० धांवांची भरती टाकून चालते झाले. सहावा आणि सातवा या गड्यांची बैठक चांगली जमून त्यांनीं धांवा एकूट करायला सुरवात करतांच सातवा गडी ' रन–आऊट ' झाला. झालें ! आठवा गडी, ' पराक्रम करीन कीं पराजित होईन ? ' या भावनेनें पुढें आला, पण पराजित होत्साता मागें गेला ! चेंडूफळीच्या मैदानावर औदासिन्यं पसरलें. सर्वांचीं तोंडें चिमणी-सारखीं झालीं. पण तेवढ्यांत दमदार पावलें टाकीत नववा गडी आला आणि त्यानें क्रीडांगण नीट न्याहाळून मनाशीं ठरविलें, ' मी पराक्रमच करणार. ' समोरून येणाऱ्या चेंडूची गति नीट पारखून त्यानें असें प्रेक्षणीय फटके लगवायला सुरवात केली, कीं त्यानें साऱ्या खेळाचा नूर पालटून टाकला ! पराजित होऊं घातलेल्या पक्षाला त्यानें पराकाष्ठेचा लौकिक मिळवून दिला. क्रीडांगण हर्षानें, आनंदानें फुलल्यासारखें दिसूं लागलें. पराजय आणि जय यांत एका खेळाडूच्या खिलाडू वृत्तीइतकेंच अंतर होतें. योग्य दिशेनें पुढें पाऊल टाकलें असतांना नैराश्याचें रूपांतर हर्षांत कसें होतें, याचें तो सामना एक सुंदर उदाहरणच होतें.

रणांगणावरील जयापजयाच्या बाबतींत तर हें फारच प्रकर्षानें पहावयास सांपडतें. कोणत्याहि निकराच्या

लढाईची गोष्ट घ्या. त्यांत जय मिळविलेल्या पक्षाकडे पाहिलें असतांना असें आढळेल, कीं निरुत्साहित करणाऱ्या, उद्विग्न बनविणाऱ्या परिस्थितीच्या पुढें एक पाऊल टाकल्यानें तो जय मिळालेला असतो.

जी गोष्ट रणांगणांतील किंवा खेळांतील, तीच व्यक्तीच्या आयुष्यांतील. कारण आपल्या आयुष्यांत रणांगण आणि क्रीडांगण यांचें बेमालूम मिश्रण झालेलें असतें. परिस्थितीशीं निकराची झुंज खेळण्याच्या बाबतींत आणि घरांतील मंडळींशीं भांडण करण्याच्या बाबतींत कित्येकांचीं गृहें रणांगणाचें स्वरूप कसें धारण करतात हें पुष्कळांनीं पाहिलें असेल. तरीदेखील त्यांतील बोचकपणा नाहींसा करणें सहज शक्य आहे. कोणत्याहि व्यक्तीच्या आयुष्यांतील दुःखदायक प्रसंग घेतले तरी देखील त्यांत कोठें तरी सुखाला सुरवात होत असलेली खचित् आढळेल. त्या दुःखांतून, त्या अडचणींतून आपण एक पाऊल पुढें आलों, कीं सुखाला आणि आनंदाला पारावर नसतो.

माझ्या आनंदी मित्रांच्या आणि मैत्रिणींच्या आयुष्याकडे मी जेव्हां पहातों, त्या वेळीं त्यांचीं आयुष्यें अडचणींवांचून आहेत असें मला मुळींच दिसत नाहीं. दिसतें तें इतकेंच, कीं प्रत्येक अडचणीच्या वेळीं, प्रत्येक क्षोभकारक प्रसंगाच्या वेळीं त्यांनीं एक पाऊल पुढें टाक-

लेलें असतें. त्यामुळें दुःखांत असूनहि त्यांना दुःख जाणवत नाहीं. त्यांचा आनंद कोणी त्यांच्यापासून हिरावून घेऊं शकत नाहीं.

क्षोभकारक घटनांच्या बाबतींत तात्यासाहेब केळकर यांनीं फार चांगला दृष्टांत दिला आहे. ते म्हणतात, चालत्या आगगाडींत बसलेल्या प्रवाशानें जवळ पाहिलें तर त्याला झाडें फिरत असलेलीं दिसतात; पण त्याच प्रवाशानें दूर क्षितिजाकडे पाहिलें तर त्याला सर्व सुस्थित दिसतें.

आपलें चुकत असेल तर तें इथें, कीं आपण पुढे पहात नाहीं. मग पुढें पाऊल टाकण्याचें तर दूरच. पण असें परिस्थितीच्या किंवा विद्यमान घटनांच्या पुढें आपण पाहूं लागलों, आणि नेहमीं पाहूं लागलों, अगदीं त्याची संवय केली, तर आपण जे क्षोभकारक प्रसंगांनीं बावचळून जातों तसें जाणार नाहीं.

कारण हें अगदीं शंभर टक्के सत्य आहे, कीं निराशेच्या सभागृहातून आपण आंत गेलों, कीं आशेचें मंदिर दिसूं लागतें. त्या मंदिरांत एकदां जाऊन तर पाहा. आनंदाचा नंदादीप तेथें अनंत काळपर्यंत उत्साहाचीं किरणें फेंकीत असलेला आढळेल. त्यांपैकीं कांहीं थोडीं जरी तुम्हीं आपल्या हृदयांत सांठवून ठेवलींत, तरीदेखील तुम्हांला जगाकडे दिमाखानें, प्रेमानें, आनंदानें, मनापासून पाहतां येईल. आणि एवढें झालें तरी बस्स आहे.

# आनंदाचे संकेत

काहीं दिवसांपूर्वी एका थोर पुढाऱ्याच्या आठवणी मी वाचीत बसलों होतों. त्यांपैकीं एका आठवणींत अशा आशयाचा मजकूर होता, कीं दिवाळीसारख्या आनंदाच्या सणांत सदरहू पुढारी केवळ खेळण्यांत किंवा गप्पागोष्टींत वेळ न घालवितां 'इंडियन अँटिक्वेरी'चे अंक अभ्यासीत बसले होते ! या थोर पुढाऱ्यांच्याविषयीं माझ्या मनांत परम आदर वसत असूनहि मी वाचीत असलेली आठवण मला कांहीं फारशी आवडली नाहीं. त्यांना भेटायला आलेल्या गृहस्थानें त्यांना विचारलें, 'हें काय चाललं आहे ?' त्यावर त्या पुढाऱ्यांनीं उत्तर दिलें, 'हा माझा दिवाळीचा खेळ चालला आहे.' मोठ्यांच्या सर्वच गोष्टी

मोठ्या असतात हें खरें; तथापि भेटायला आलेल्या गृह-स्थाच्या भावना लक्षांत घेतां ज्या अपेक्षेनें तो भेटायला आला असेल, ती अपेक्षा पूर्ण झाली नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. सारा हिंदु समाज आज आनंदानें कालक्रमण करीत असतांना आपल्या पुढाऱ्यानेंहि त्यांत सामील व्हावें, असें त्याला वाटणें स्वाभाविक आहे. आणि अशा मोकळे-पणाच्या वेळीं आपणहि जाऊन जरा गंमत करूं असें त्याला वाटलें असेल. पण जेव्हां त्यानें भलताच भार-दस्तपणा अवलोकिला असेल, त्या वेळीं तो खात्रीनें सर्दच झाला असला पाहिजे !

आणि याचें कारण उघडच आहे. आपल्या मनांत कांहीं दिवसांविषयीं कांहीं अपेक्षा असतात, संकेत असतात. या अपेक्षा आणि हे संकेत पूर्ण झाले कीं आपणाला समाधान लाभतें. उलट तसें न झाल्यास आपलें मन बेचैन बनतें. दिवाळीच्या सणाचेंच घ्या ना. नुकतेंच ज्यांचें लग्न झालें आहे अशा वधूवरांच्या मनांत किती तरी अपेक्षा आणि संकेत असतात. कुणाच्या मनांत सासऱ्याकडून ग्रामोफोन किंवा रेडिओचा सेट किंवा निदान सोन्याची आंगठी घ्यावयाची असते. कुणाच्या मनांतून ‘ तिकडून ’ दिवाळीच्या पाडव्याच्या निमित्तानें मोहनमाळ, मोत्यांच्या कुड्या, हिऱ्याची आंगठी वगैरे मिळण्याची अपेक्षा असते. आणखी कुणी असतात त्या

'तिकडच्यांना' लाटून शिवाय आणखी भाऊरायानें कांहीं तरी भाऊबिजेचें दिलेंच पाहिजे, असा संकेत करून बसलेल्या असतात. आणखी कांहीं लोक असतात ते मिष्टान्नभोजनाच्या आमंत्रणाची अपेक्षा करीत त्या आनंदांत चूर झालेले असतात.

अशा वेळीं कांहीं भलतेंच झालें तर त्या त्या मंडळींना काय वाटेल? वर उल्लेखिलेल्या जांवईबुवांचे सासरे आपल्या जांवयांना रेडिओ-सेट देण्याऐवजीं 'इंडियन अँटिक्वेरी'चा सेट देऊं लागले तर त्या जांवईबापूंना काय वाटेल? जांवईबापू स्वतःच्या पत्नीला मोहनमाळ अगर हिऱ्याची आंगठी न देतां जपानमध्यें चालू असलेल्या घरगुती धंद्यासंबंधीं (Cottage Industry) व्याख्यान देऊं लागले तर त्या साध्वीला काय वाटेल? तसेंच भाऊबिजेच्या आशेनें भावाला जेवायला बोलावणाऱ्या बहिणीला भावानें ओंवाळणीदाखल आपट्याचीं पानें दिल्यास तिला बिचारीला काय वाटेल? इतकेंच नाहीं, तर जागतिक मंदीच्या सबबीवर आपण जर आपल्या इष्ट मित्रांना दिवाळीच्या सणांत भोजनाला न बोलाविलें तर त्यांना काय वाटेल?

काय वाटावयाचें? मनुष्यस्वभावावरील त्यांचा विश्वास उडून त्यांचें मन अस्वस्थ बनेल. मनांत बाळगलेल्या अपेक्षांचा आणि संकेतांचा चुराडा होऊन जाईल.

आणि असें न झाल्यासच नवल. आपले सणवार म्हणजे आनंदाचे संकेत होत. त्यांतल्या त्यांत दिवाळी म्हणजे शंभर टक्के आनंदाचा संकेत होय. वर्षभर होणाऱ्या त्रासाचा ( दुःख मी म्हणत नाहीं ), जिकिरीचा आणि कष्टाचा परिहार या सणांत करून घ्यावयाचा असतो. अगदीं खूबखूब आनंद करावयाचा असा प्रत्येकाने जणूं काय मनाशीं संकल्प केलेला असतो. मित्रांशीं गप्पा मारावयाच्या, मैत्रिणींना चिडवावयाचे, नातेवाइकांना सळो कीं पळो करून सोडावयाचें, आईवडिलांना त्रास द्यावयाचा, साहेबाला खूश करावयाचा—असे एक कीं दोन, शेंकडो बेत मनांत रचून सर्वजण आनंदाची लयलूट करण्याच्या विचारांत असतात. मनाचीं सर्व कवाडें मोकळीं सोडून मनोवृत्तींना स्वैरपणें नाचूं द्यावेसें सर्वांना वाटतें.

आणि हेंच योग्य होय. वर्षभर असतेंच आपल्या अंगावर कर्तव्याचें ओझें. गांभीर्याचा बुरखा घेऊन आपण तीनशें चौसष्ठ दिवस वावरत असतों. मोठेपणाच्या कल्पना उराशीं बाळगून त्यांच्या वजनानें जड झालेल्या पावलांनीं आपण रोज चालत असतों. असें असतांना, एक दिवस तरी आपण बालकांच्या आनंदाचा उपभोग घ्यावा, कर्तव्यनिष्ठा, गांभीर्य, स्वधर्म वगैरेसारख्या बोजड शब्दांची एक दिवस तरी जरूर हकालपट्टी करून मुलांत मिसळावें आणि मुलांसारखें वागावें.

१०४०७

दिवाळीच्या सणांत कांहीं कांहीं म्हाताऱ्यांना तरुणच नव्हे, तर लहान मुलांप्रमाणें वागतांना जेव्हां मी पहातों, तेव्हां मला फारफार बरें वाटतें. नवे कपडे घालण्यापासून तों थेट फटाके उडविण्यापर्यंत सर्व गोष्टी ते बालकाच्या उत्साहानें करतात. खाण्याखेळण्याच्या बाबतींतहि असेंच. खूप खेळायचें, असें त्यांनीं दिवाळीचें ब्रीदवाक्य बनविलेलें असतें. आलेल्या दिवाळीचें सहर्ष स्वागत करावयाचें असेंच जणूं काय त्यांनीं ठरविलेलें असतें.

आनंदाचा हा एक संकेतच असतो म्हणानात. पण संकेत म्हटल्यानें त्याची किंमत कांहीं कमी होत नाहीं. आनंद हा स्वाभाविक असावा असें म्हणणारे कांहीं आहेत. त्यांच्या मतें आनंदाचा संकेत असणें हें अस्वाभाविक होय. परंतु मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहिल्यास आनंदाचा संकेत ठरवूनहि निर्मळ व विपुल आनंदाचा उपभोग घेतां येतो. चला आपण हंसूं या, जरा गंमत करूं या, असें जेव्हां आपण म्हणतों त्या वेळीं आनंदाचा संकेत मनांत ठेवूनच आपण तसें म्हणत असतों. पण त्यामुळें आपला आनंद कमी झाल्याचें आपल्या अनुभवांत नाहीं. उलट जितके आनंदाचे भागीदार अधिक, तितका आनंद अधिक.

माझे एक वृद्ध स्नेही आहेत. माझ्या व त्यांच्या वयांत तीस वर्षांहून अधिक अंतर आहे. पण आनंदाचा

विचार केला असतांना हें अंतर आम्हांला मुळींच जाणवत नाहीं. आमच्या दोघांत एक मनोमन संकेत ठरलेला आहे. तो असा, कीं मी त्यांच्याकडे गेलों किंवा ते माझ्याकडे आले म्हणजे परस्परांनीं मौजेच्या गोष्टी सांगून खूपखूप हंसायचें. जेवढा वेळ आम्ही एकमेकांच्या सहवासांत घालवितों, तेवढा आमचा वेळ एखाद्या सम्राटाच्या सुखा-पेक्षांहि अधिक सुखकर जातो. त्यांना कांही दुःखें नसतील किंवा मला कांही काळज्या नाहीत, अशांतला भाग नाहीं. परंतु आमच्या आनंदसंकेताचा एवढा जबरदस्त परिणाम आमच्या मनावर झाला आहे, कीं इतर गोष्टींचें आम्हांला फारसें कांहीं वाटत नाहीं. माझे वृद्ध स्नेही तर या मताचे आहेत कीं, आत्म्याचें मूळ स्वरूप केवळ आनंदमय होय आणि आपण प्रयत्न केल्यास तें अधिक आनंदमय बनेल.

ज्यांना माझ्या स्नेह्यांसारखे स्नेही लाभले असतील ते परम भाग्याचे होत. पण इतरांनींहि निराश होण्याचे कारण नाहीं. आपल्या समाजानें निरनिराळे सण निर्माण करून सर्वांना एकाच वेळीं आनंदित होण्याची सोय करून ठेविली आहे. आपण मात्र त्यांत आनंदानें भाग घेतला पाहिजे. सांघिक खेळांप्रमाणेंच सांघिक आनंदाचें स्वरूपहि मोहक असतें.

निसर्गाकडे पाहिलें असतांना याचें प्रत्यंतर पटण्याजोगें आहे. वर्षाऋतूचेंच उदाहरण घ्या. साऱ्या निसर्गानें आनंदाचा संकेत पाळण्याचें ठरविलेलें दिसतें. मनुष्यानें मज्जाव न केल्यास पृथ्वीनें जिकडेतिकडे हिरव्यागार गवताची मऊमऊ बिछायत पसरून ठेवण्याचा संकल्प केलेला असतो. शेतांतून बाजरी, जोंधळा, भात वगैरे धान्याची कणसें वाऱ्याबरोबर झोंके घेत असतात. रानफुलांना आणि बागेतील फुलांना बहर आलेला असतो. वृक्षांना बिलगलेल्या वेलींवर फुलें आणि फळें नाचत असतात. उलट वृक्षहि त्यांचे पान अन् पान पावसांत धुऊन निघाल्यानें सुस्नात युवकाप्रमाणें विलोभनीय दिसत असतात. आकाशाची मौज कांहीं औरच असते. एखादे वेळीं ढगांवर ढग जमा होऊन सैनिकांच्या रांगा लागल्यासारख्या दिसतात, तर एखादे वेळीं पातळ ढगांची धाबळी परिधान केल्यासारखे आकाश दिसतें. एखादे वेळीं बाणाच्या वेगानें पावसाच्या धारा पडतात, तर एखादे वेळीं फुलबाजीप्रमाणें मंदमंद भुरभुर सुरू असते. पण कांहींहि असलें तरी निसर्गाचें आनंदाचें सांघिक गाणें या ऋतूंत सुरू असतें.

आणि तसा विचार केला तर आपण निसर्गाच्याहि पुढें एक पाऊल गेलों आहोंत. दिवाळी हा आनंदाचा संकेत ठरवून आपण परिस्थितीवरहि विजय मिळविला

आहे. तो असा. वास्तविक दिवाळी ही कृष्णपक्षांत म्हणजे जिकडेतिकडे काळोख, अंधःकार यांचें साम्राज्य पसरलें असतांना येते. पण आपण आपल्या कृतीनें, आनंदाच्या संकेतानें, जिकडेतिकडे प्रकाशज्योति पसरून काळोखाला दूर सारतों आणि आनंदाच्या कारंज्यांतून निर्मळ भावनांचे तरंग सर्वत्र मनमुराद उधळतों.

# आळस

आळस हा मनुष्याचा शत्रु आहे. आळसाचा नाश वेळींच नाहीं केला तर तो उलट मनुष्याचाच नाश करून टाकतो. तस्मात् ज्याला आपला अभ्युदय करून घ्यावयाचा असेल त्यानें आळसाचा त्याग प्रथम करावा. अशा प्रकारचा उपदेश अगदीं गंभीर चेहरा करून, आपण विश्वसत्य सांगतों आहोंत अशा आविर्भावानें केलेला, आपल्यापैकीं सर्वांनीं, वयाच्या पांचव्या वर्षापासून आजपर्यंत ( अगदीं हा माझा लेख वाचीपर्यंत ) ऐकला असेल, आणि हा आळस घालवावा कसा या फिकीरींत आपण पडला असाल ! माझें आपणाला मनापासून आणि हात जोडून असें सांगणें आहे कीं या फिकीरींत आपण पडूं

नका. कांहीं थोडें फाजील उद्योगी लोक आळसाला खुशाल आपला शत्रू मानोत. माझी तर दिवसानुदिवस अशीं खात्री होत चालली आहे कीं, आळस हा मनुष्याचा शत्रू नसून मित्र आहे, दुष्मन नसून दोस्त आहे. कसा, तें सांगतोंच आतां आपणाला.

आपण मनुष्याच्या मनाचा कल—अगदीं लक्षपूर्वक पाहिला असल्यास तो आळसाकडे असलेला आढळेल. ( उपजतबुद्धीनें उगीचच्या उगीच हातपाय उडविणारीं अगदी लहान मुलें आपल्या सिद्धांताच्या आड येतात म्हणून तीं अपवादादाखल सोडून द्यावयाचीं. उगीच जागच्याजागीं हातपाय उडवीत बसण्यांत काय धन्यता वाटत असेल ती त्या अर्भकांनाच माहीत ! ) सामान्यपणें, कांहीं न करण्याकडे मोठया माणसांच्या मनाचा कल असतो एका हिंदी सुभाषितांत म्हटलें आहे—' दौडनेसे चलना भला. चलनेसे ठैरना भला. ठैरनेसे बैठना भला और बैठनेसे सोना भला ! ' आणि हें खरेंच नाहीं कां ? ' धांवण्यापेक्षां चालणें बरें. चालण्यापेक्षां थांबणें बरें. थांबण्यापेक्षां बसणें बरें. आणि बसण्यापेक्षां झोंपणें हें केव्हांही बरेंच बरें । जे असें करतील ते धन्य होत. कारण त्यांनीं जीवनाच्या बुडाशीं असलेलें रहस्य जाणलेलें असतें. आपल्या भारतवर्षांत फार पुरातन कालापासून आळसाचें तत्त्वज्ञान आत्मसात केलेले लोक होऊन गेले

आहेत. या सर्व आळशी लोकांचा आचार्य म्हणून कुंभकर्णाकडे बोट दाखवायला कांहींच चिंता नाहीं. ही स्वारी नेहमीं झोंपेत चूर असावयाची! एवढें रामरावणांचें घनघोर युद्ध झालें, परंतु तत्त्वज्ञानी कुंभकर्णाला त्याची वार्ताही नव्हती! तीच तऱ्हा ऋषीमुनींची. त्यांपैकीं कोणीं साठ हजार वर्षें तप केलें, तर कोणी सव्वा लाख वर्षेंपर्यंत तप केलें, असें आपण ऐकतों. माझी अशी पूर्ण खात्री आहे कीं, तप याचा अर्थ निद्रा असाच त्या काळीं रूढ असावा. साठ हजार वर्षें अमुक एका ऋषीनें तप केलें, याचा सरळ अर्थ साठ हजार वर्षें त्यानें झोंपून काढलीं, कांहींहि केलें नाहीं, असाच मी तरी करतों. असल्या अदीर्घ निद्रेच्या पायींच ते जगाला ललामभूत होणाऱ्या तत्त्वज्ञानाला जन्म देऊं शकलें. आळसाच्या पोटींच वेदांताची उत्पत्ति होऊं शकते. पाश्चात्य राष्ट्रें तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत मागें कां, आणि हिंदुस्थान, चीन, तिबेट इत्यादि राष्ट्रें पुढें कां याचें रहस्य उघडच आहे. पाश्चात्य राष्ट्रें अकारण उद्योगांत वेळ घालवितात. याच्या उलट पौर्वात्य राष्ट्रांत विशेषतः हिंदुस्थान आणि चीन या राष्ट्रांत आळसाला विशेष मान दिला जातो. उगाच जीवाची धडपड आणि वणवण आपणाला मुळींच पसंत नाहीं. सदोदित गर्दी, कामाचा धोशा, हें झालें कीं तें काम, माणसामागें माणसाची रीघ, सर्व आपले धांवताहेत—

चाल-चालताहेत, कोणाला बोलण्याची फुरसत नाहीं-असलें चित्र पाश्चात्य देशांत पुष्कळ ठिकाणीं पाहायला सांपडतें. आपल्याकडे हें कांहीं नाहीं. सर्वत्र रेंगाळत चालणाऱ्या ताशीं एक मैल गतीच्या बैलगाड्यांचा थाट! बैल चाकोरींतून गाड्या ओढताहेत, आंतील माणसें झोंपलीं आहेत, रात्रभर मिळून दहा कोस मुशाफरी होते आहे—हें चित्र नऊदशांश हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं दिसतें! आपल्या देशांतील ही स्थिति मला फारफार आवडते! उपहासबुद्धीनें मी हें लिहितों आहें, असें कृपा करून समजूं नका. कारण मला स्वतःला आळस मनापासून प्रिय आहे. माझ्या दुर्दैवानें मला फार वेळ आळसांत घालवितां येत नाहीं. पण जो कांहीं थोडावेळ मी आळसांत घालवितो, त्याच वेळीं मी खरोखर जगतो आहे असें मला वाटतें.

खरोखर आळसाची मौज कांहीं और आहे. तिचा अनुभव ज्यांना आला असेल त्यानांच आळसाची गोडी कळणार. इतर म्हणणार—‘ नकारे बाबांनो, आळसांत वेळ घालवूं! ’

मला ज्यावेळी कांहींहि काम नसतें—आणि असले क्षण माझ्या आयुष्यांत कांहीं थोडे येतात—त्यावेळीं मला समाधान वाटतें. हातपाय ताणून आळोखे देत, शून्य दृष्टीनें छताकडे किंवा आकाशाकडे पाहात मी ज्यावेळीं पडून रहातो त्यावेळीं जगाच्या सम्राटाचें वैभव माझ्या पायाशीं

धरून आहे असें मला भासतें. बस्स, कांहीं देखील करावयाचें नाहीं, आळस द्यायचा आणि डोळ्यांनीं जें दिसेल तें बघायचें किंवा, डोळ्यांची इच्छा नसल्यास डोळेहि मिटून ठेवावयाचे. असें करीत असतांना मनाला इतकें शांत–शांत वाटतें कीं कांहीं पुसूं नका. हृदयाचें कमळ उमलून त्यांतून पराग स्रवू लागतात. आत्म्याचा गुंजारव सुरू होतो. आत्मा नाचू लागतो. हृदय डोलूं लागतें. हा अपूर्व देखावा पाहून आपल्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहू लागतात. आणि आपण आळसांत वेळ घालविला नसून, आनंदांत घालविला असें वाटूं लागतें. असल्या आनंदाचा उपभोग घेतला आहांत का कधीं आपण ?

नसला घेतल्यास आजच घेऊन पाहा. कारण जगण्यांतील खुमारी असल्या आनंदामुळेंच वाढते. ज्यांनीं आळसांत वेळ कधींच घालविला नसेल, त्यांचें आयुष्य नीरस, बेचव, कृत्रिम, यांत्रिक बनून जातें. सांचलेल्या व स्थिर पाण्याप्रमाणें त्यांची स्थिति होते. पाण्यावर शेवाळ सांचूं द्यावयाचें नसल्यास, पाणी जसें वाहतं ठेवावें लागतें, त्याचप्रमाणें जीवन बेचव करावयाचें नसल्यास आयुष्यांतील बराचसा भाग आळसाच्या रूपानें वांया घालविलाच पाहिजे. जो मनुष्य कधींच आळसांत वेळ घालवीत नाहीं, त्याचा ठिकाणीं कांहीं तरी जबरदस्त विकृति आहे असें खुशाल समजावें. एखादा मनुष्य

आपल्या आयुष्याचा क्षण देखील फुकट घालवीत नाहीं असें मला कळतांच त्या महाभागाविषयीं आदर वाटण्या ऐवजी मला वाटतें--फुकट गेला देवाच्या घरचा एक चांगला प्राणी !

आळसांत वेळ घालविणें ही चैन नसून आवश्यक गोष्ट आहे. आपण पशुपक्षांकडे पाहा. एक मुंगी सोडून दिली तर सर्व पशु आणि सर्व पक्षी आळसाचें महत्व ओळखीत असलेलें आढळतात. म्हैस पाण्यांत तासनतास बसलेली पुष्कळांनीं पाहिली असेल. गाय, बकरी, घोडा हीं देखील आळसांत बसलेली पुष्कळ वेळां दिसतात. त्यांतल्या त्यांत घोडा थकूनभागून आल्यावर पडल्या पडल्या ज्यावेळीं पाय ताणून आळस देतो त्यावेळीं अगदीं बघण्याजोगा असतो. पक्षांत देखील बुलबुल, दयाळ, पोपट, चिमण्या, इत्यादि पक्षी, दुपारच्या वेळीं अगदीं स्वस्थ बसून असतात. फुलपांखरासारखा चंचल प्राणी नाहीं. पण तोही सुस्तावल्यासारखा पुष्कळवेळां एकाच फुलावर बसून राहतो.

अशा तऱ्हेनें सर्वत्र आळसाचा बडेजाव होत असतांना, आपणच मात्र उद्योगांत असावें हें समंजस मनुष्याला मुळींच रुचणारें नाहीं. टेनिसन कवीनें 'लोटस ईटर्स' या नांवाची एक सुंदर व काव्यमय कविता लिहिली आहे. कमलकंद खाऊन पूर्णचंद्राकडे बघत पेंगत बस-

णारे 'लोटस ईटर्स' म्हणतात. "बाकी सर्व जग सुस्तावल्या सारख्या स्थितींत पडून राहिले असतांना वस्तुजाताच्या अग्रभागीं शोभणाऱ्या आम्हींच काय म्हणून श्रम करावेत?" खरेंच आहे हें त्यांचें म्हणणें. आळसांत काळ घालवितां येणें ही सर्वांच्या हक्काची गोष्ट आहे.

आळस देण्यांत काव्यहि कमालीचें असूं शकतें असा माझा अनुभव आहे. जीवनसंगीत नांवाचें उदय-शंकरचें ज्यावेळीं मी नृत्य पाहिलें आणि त्यांत त्यानें आळसाचा ज्यावेळीं अभिनय केला त्यावेळीं त्या आळसांत विलक्षण काव्य निर्माण झाल्यासारखें मला वाटलें. उदय-शंकरचें नृत्य पुष्कळांनीं पाहिलें नसल्यास, निकोप प्रकृतीच्या आणि डौलदार बांधाच्या कामिनी ज्यावेळीं आळस देतात त्यावेळीं तो बघावा, अशी मी शिफारस करतों. केवढें काव्य असतें त्यांच्या त्या हात वर नेण्यांत नी खालीं आणण्यांत!

आपल्या इकडे देव देखील चार महिने आळसाच्या पायीं खुशाल झोंप घेतात! देवशयनी एकादशीच्या दिवशीं जे झोंपीं जातात ते प्रबोधिनी एकादशीला जागे होतात! ज्या आळसाचा एवढ्या मोठ्या देवांनी देखील अंगिकार केला तो आळस वाईट कसा म्हणतां येईल? आपणच सांगा.

# न्हावीदादा

माझा आणि न्हावीदादाचा प्रथम परिचय झाला तो माझ्या वयाच्या तिसऱ्या वर्षी—म्हणजे ज्या वर्षी माझें जावळ काढण्यांत आलें त्या वर्षी होय. तेव्हांपासून आजतागायत आमचा परस्पर परिचय दृढावत जाऊन आमच्या ओळखीचें रूपान्तर स्नेहांत झालें असल्यास नवल नाहीं. वस्तऱ्यानें सबंध डोकें साफ करण्याच्या (ज्याला लोकभाषेंत कल्हई करणें अशी संज्ञा दिली जाते) त्या जमान्यांत न्हावी पाहिला कीं माझ्या उरांत धडकी भरत असे. डोक्यावरून एकीकडे केस खालीं पडत असतांना दुसरीकडे माझ्या डोळ्यांतून अश्रु गळत असत ! केस राखणें हें अब्रह्मण्यम् समजल्या जाणाऱ्या

त्या काळांत माझ्या अश्रुंचा मुलाहिजा कोण राखणार? परंतु पुढें पुढें या परिस्थितींत पालट पडून गेल्या महायुद्धानंतर ‘ कल्हई ’ करणाऱ्यांचें प्रमाण कमी कमी होऊं लागलें. याचा फायदा यथावकाश मलाहि मिळाला. आणि न्हावीदादाबद्दल मला वाटणाऱ्या भीतीचें रूपांतर प्रीतींत झालें. गेल्या महायुद्धाच्या सुपरिणामांत या गोष्टीची मोजदाद केली जाईल अशी मला आशा वाटते.

तसें म्हटलें तर केसांत काय आहे? पण एक काळ असा होता, कीं केसांतच सर्व सुधारणा एकवटल्यासारखें लोकांना वाटत असे. केस राखणें हें सुधारणेचें किंवा धर्मबाह्य वर्तनाचें लक्षण समजलें जाई. उलट डोक्याची तुळतुळीत हजामत करवून नंतर त्यावर एरंडाचें पान ठेवणें हें संस्कृतिसंरक्षणाचें चिन्ह मानण्यांत येई! तुळतुळीत डोक्याच्या अंगणांत घेऱ्याचें वृंदावन उभारून त्यांत शेंडीरूपी तुळशीची स्थापना एकाद्यानें केली, कीं तो शंभर टक्के सनातनधर्माभिमानी आहे असें भोळे लोक मानीत असत. याच्या उलट डोक्यावर केस राखणें हें भयंकर कृत्य समजलें जाई. ‘ त्यानें केस राखले ’—या साध्या निरुपद्रवी वाक्याचा अर्थ तो समाजांतून उठला, त्याला धर्माची पर्वा उरली नाहीं, त्याला नीतीची चाड राहिली नाहीं, तो आतां कोणतें पापकर्म करायला बाकी ठेवणार आहे?—असा घेतला जाई. पण वर सांगितल्या-

प्रमाणें गेल्या महायुद्धानंतर या असल्या वेडगळ समजु-
तींत फरक पडून केस राखणें हें नीतिअनीतीच्या कक्षे-
बाहेरचें समजलें जाऊं लागलें आहे.

केसांकडे आपण आतां उपयुक्तता आणि सौंदर्य या दृष्टींनींच बघत असतों. त्यांतल्या त्यांत सौंदर्याचीच दृष्टि अधिक प्रभावशाली मानली जाते. युद्धपूर्वकालापेक्षां युद्धोत्तरकालांत केसांची निगा राखणें, त्यांची चेहऱ्याला अनुकूल अशी रचना करणें, त्यांना व्यवस्थित कापणें व वाढविणें इत्यादि गोष्टींना अधिक महत्व आलेलें आहे. याचें एक ठोकळ प्रमाण असें सांगतां येईल कीं, याच काळांत केशकर्तनालयें किंवा केशभूषागारें, किंवा ज्यांना सलून्स म्हणतांत तीं, मोठ्या प्रमाणावर अलम् हिंदुस्थानांत जागोजागीं उघडलीं गेलीं. पूर्वीचे 'खुंटे' जाऊन त्या जागीं सौंदर्यानें नटलेलीं केषभूषागृहें दिसूं लागलीं. खाकोटीला धोपटी मारून रस्त्यानें केसाळलेल्या दाढ्यांकडे आशाळ-भूतपणानें पाहात जाणाऱ्या हजामांची संख्या कमी कमी होत जाऊन, त्या जागीं आपापल्या सलून्समध्यें बसून गिऱ्हाईकाला 'थोड्या वेळानें या—थोडा वेळ बसावें लागेल' असें ऐटींत म्हणणाऱ्या हजामांची संख्या वाढूं लागली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हजामाचा धंदा हा प्रतिष्ठित बनून, हजाम हा एक कलावंत समजला जाऊं लागला. 'काय हजाम आहेस'—असें शिवीदाखल पूर्वी

म्हटलें जाई, आणि ऐकणाऱ्याला त्यामुळें अपमान झाल्यासारखें वाटे. नापित हा कलावंत ठरल्यापासून ' काय हजाम आहे पण ! ' या वाक्यप्रयोगाला मिळमिळीतपणा आला आहे. कालमहिमा दुसरें काय !

आपण कलोपासक आहोंत या भावनेनें अलीकडे हजामहि स्वतःकडे आणि स्वतःच्या धंद्याकडे बघूं लागले आहेत. आपण हजाम नसून केषभूषाकार आहोंत असें परवांच माझ्या नापितानें मला बजावून सांगितलें. तो म्हणाला, ' दादा, हा धंदा कांहीं असातसा नाहीं. यांतहि कला आहे. काम असं झालं पाहिजे कीं, पाहणाऱ्याला वाटलं पाहिजे न्हावी कांहीं जाणतो. घेतलं डोकं आणि तासले केस—असे दिवस आतां राहिले नाहींत. चेहरा मोहरा पाहून आतां केस कापावे लागतात. जरा गोल वाटोळा चेहरा असेल तर ऑक्सफर्ड फॅशन शोभेल. तुमच्या सारखा लांबट चेहरा असेल तर त्याला साधेच केस शोभतील. काम शोभेल असं झालं पाहिजे, गिऱ्हाईक खूष झालं पाहिजे, आपलं नांव राहिलं पाहिजे. '

आपापल्या धंद्याविषयीं सर्वच धंदेवाइकांना असें वाटूं लागेल तर, काय बहार होईल ! सर्वच जण कलोपासक आणि कलावंतच बनल्यानें जग हें एक कलाभुवनच ठरेल. सुतार कलावंत, चांभार कलावंत, शिंपी कलावंत, तांबट कलावंत, सोनार कलावंत, अशा तऱ्हेनें

सर्वच कलावंत झाल्यानें त्यांच्या सुगृहिणी आपोआप कलावंतिणी बनतील, आणि मग भलत्याच धंद्याला लागणारे हे धंदेवाईक लोक निदान आपापले धंदे सांभाळून तरी राहतील. खुद्द भगवंतानें देखील सांगितलें आहे– ' स्वधर्मे निधनं श्रेयः ।

इतर धंद्याविषयीं मला नक्की सांगतां येणार नाहीं. परंतु माझी खात्री आहे, कीं न्हावी किंवा केशभूषाकार हे न्हावीच राहतील. आर्थिक मंदी कितीहि होवो, केशभूषाकाराला निदान आठबारा आणे दिवसाला मिळायला कांहींच हरकत नाहीं. या बाबतींतहि खुद्द माझ्या नापिताचें उदाहरण मी देऊं इच्छितों. तो मला म्हणाला ' हा धंदा तसा चांगला आहे. कसाही बंगाळ वखत आला तरी आठ-बारा आण्याला मरण नाहीं. कोणाच्या घराचे उंबरठे नको घासायला कीं कोणासमोर जाऊन तोंड नको वाकडं करायला. आपल्याजवळ हुन्नर असला कीं झालं. '

•

आपल्या धंद्यावर मधूनमधून वरकरणी नाराज होत असणाऱ्या परंतु मनांतून खूष असणाऱ्या माझ्या केशभूषाकाराचें दुकान म्हणजे माझ्या विश्रांतीचें एक स्थान आहे. त्याच्या खुर्चीवर अंग टाकलें कीं माझी खात्री असते, आतां चाळीस मिनिटें सुखांत, ऐश्वर्यांत, मजेंत जाणार ! मऊ गादीच्या नि भारी किंमतीच्या त्याच्या

खुर्चीसमोर असणाऱ्या भव्य नि बिलोरी आरशांत स्वतःचें प्रतिबिंब चाळीस मिनिटें बघायला सांपडून स्वतःच्या सौंदर्यावर निहायत खूष व्हायला सांपडतें; म्हणून मला माझा केशभूषाकार आवडतो असेंच केवळ नाहीं. तें एक तर आहेच. आरशांत बघत असतांना कोणाला असें वाटलें आपण कुरूप आहोंत म्हणून? सर्वजण आरशांत दिसणाऱ्या आपल्या प्रतिबिंबावर अगदीं खूष असतात. दुसऱ्यांच्या दृष्टीनें असणाऱ्या आपल्या तोंडावरील उणिवा आपणाला दिसतच नाहींत. डोळे लहान असले तरी ते आपणाला मोठे पाणीदार दिसतात; नाक चपटें असलें तरी तें आपणाला चवळीच्या शेंगे-प्रमाणें भासतें. तोंड बुद्रुक असलें तरी तें आपणांस मोठें मोहक वाटतें. केशभूषाकाराचा आरसा या दृष्टीनें मोठा बघणीय असतो यांत शंका नाहीं. मऊमऊ खुर्चीवर आपण बसलों आहोंत, आपले केस एकीकडे कापले जाताहेत, आपण आपल्या सुंदर चेहऱ्याकडे आरशांत बघण्यांत अगदीं गुंगून गेलों आहोंत—हें चित्र मनोहर नाहीं असें कोण म्हणेल? पण याकरितांच केशभूषा-काराचें दुकान मला आवडतें असें नाहीं. तसें म्हटलें तर आणखीहि सुंदर सुंदर वस्तु त्याच्या दुकानांत असतात. निरनिराळ्या रंगाच्या तेलाच्या बाटल्या, विविध आकाराच्या ब्रिलियंटाईन नि स्नोच्या बाटल्या, सुगंधी साबूच्या

वड्या, सुंदर स्त्रियांच्या तसबिरा इत्यादि वस्तु आकर्षक निःसंशय असतात. त्यामुळें आपणाला सुख आणि ऐश्वर्याचा लाभहि मिळतो. परंतु मी या गोष्टींमुळेंहि तितकासा आकर्षिला जात नाहीं. मला खरें आकर्षण वाटतें तें केशभूषकाराच्या बोलण्याचें, किंवा त्याच्याबरोबर मला करावयाला सांपडत असलेल्या संभाषणाचें होय.

माझ्या नापिताचें एक वैशिष्ट्य आहे. तो संभाषणाच्या ऐन रंगांत आला असतांना आरशांतील माझ्या प्रतिबिंबाकडे पाहात बोलतो. अर्थात् मलाहि त्याच्याशीं बोलत असतांना आरशांत दिसणाऱ्या त्याच्या प्रतिबिंबाकडे पहात बोलावें लागतें. प्रथम प्रथम असें बोलतांना मला चमत्कारिक वाटे. पण आतां हा बिंब प्रतिबिंबभाव इतका माझ्या मनांत ठसला आहे, कीं मी तसलेंच बोलणें अधिक पसंत करतों. असल्या संभाषणांत बोलणाऱ्याच्या प्रत्यक्ष तोंडाकडे आपणाला पाहावें लागत नाहीं, हा मोठा फायदा असतो. आरशांतील आमच्या प्रतिबिंबांचें संभाषण राजकारणापासून तों सर्वकारणापर्यंत चालतें. संपादक हा जसा सर्वज्ञ समजला जातो तसाच नापितही समजायला कांहीं हरकत नाहीं असें मला वाटतें. किंबहुना संपादकापेक्षांहि नापिताच्या ठिकाणीं उपरोधबुद्धि आणि व्यवहारज्ञान हीं अधिक असतात. कुठल्याहि गोष्टीची उलट बाजू तो मार्मिकपणें मांडू शकतो. एकच मात्र

वैगुण्य नापिताच्या ठिकाणीं असतें. फुटक्या भांड्यांत जसें कांहीं टिकूं शकत नाहीं, तसें अगदीं गुपित म्हणून नापिताला सांगितलेल्या सर्व गोष्टी एकदम जगजाहीर होतात. हा जसा तोटा आहे, तसा एका दृष्टीनें तो फायदा मानायलाहि हरकत नाहीं. जाहिरातदारांनीं वर्तमानपत्रांत-- निदान गांवांतील वर्तमानपत्रांत--जाहिराती देण्याऐवजीं जाहिरातीचा मजकूर गुप्त म्हणून न्हाव्याला सांगितल्यास विनामूल्य जाहिरात दिल्याचें श्रेय त्यांना सहज मिळवितां येईल ! आणि असें झालें म्हणजे मग हजामतहि फुकट पदरांत पडल्याचें त्यांना आढळून येईल. एकदां हा प्रयोग मी करून पाहिला होता. आमच्या शाळेला मास्तराची जरूरी असतांना त्याबद्दलची जाहिरात वर्तमानपत्रांत न देतां, गुजगोष्टीसारखें नापिताजवळ मी बोललों. झालें, दुसऱ्या दिवशीं मास्तरकीच्या जागेकरितां माझ्याकडे निदान दोन डझन तरी अर्ज आले ! डुकराचे कान असलेल्या राजाच्या हजामाची गोष्ट येथें मला आठवते. पण ती आपणालाहि लहानपणीं ऐकलेली आठवत असेल असें समजून येथें सांगत नाहीं.

# रेल्वे-लाइन्स

रेल्वे-लाइन्स ! विलक्षण आकर्षण मला वाटत आलें आहे रेल्वे लाइन्सविषयीं. इतकें आकर्षण तुम्हांला तुमच्या प्रिय वस्तूविषयीं किंवा प्रियेविषयीं क्वचित्‌च वाटत असेल ! जिवाला ओढणी लागल्यासारखा मी रेल्वे-लाइन्सकडे जातो. काळ्याभोर, चकचकीत, सरळ आणि दूरदेशीं जाणाऱ्या त्या लोखंडी रुळांच्या कडेकडेनें जात असतांना अगदीं जादूनें भारल्यासारखें वाटतें मला ! संध्याकाळ झाली आणि लांब पसरलेल्या सावल्या अंधुक होऊं लागल्या कीं माझे पाय काळ्याभोर नी चकचकीत रुळांकडे आकर्षिले जातात. दारूच्या गुत्याकडे जाणाऱ्या मद्यप्याचे, प्रियेच्या घरीं जाणाऱ्या प्रियकराचे,

वासरांच्या ओढीनें गोठ्यांत येणाऱ्या गायींचे किंवा बायकोमुलांच्या प्रेमानें घरीं येणाऱ्या मध्यम स्थितींतल्या गृहस्थाचे पाय कदाचित् अशा प्रकारें आकर्षिले जात असतील ! माझें दुःख, माझ्या काळज्या, माझ्या अडचणी, माझ्या विवंचना— या सर्वांचा मला विसर पडतो या वेळीं. अशा प्रकारचा विसर पाडण्याचें सामर्थ्य संगीतांतहि असतें असें आपण म्हणाल, पण स्वर्गीय आणि हुकुमी संगीत नेहमीं कसें ऐकायला मिळणार ? आपणाला आकाशवाणीच्या द्वारें ऐकूं येणाऱ्या संगीताची आठवण झाली असेल. पण मीच आपणाला विचारतों, कीं आकाशवाणीचे संगीताचे कार्यक्रम पुष्कळ वेळां अगदीं भयंकर असतात कीं नाहीं ? लोकशाहीचें तत्त्व संगीतासारख्या मिजासखोर कलेला लावल्यानें तिची अगदीं अवकळा झाली आहे.

पण तो वेगळा मुद्दा म्हणून सोडून देतों. रेल्वे लाइन्सच्या बाजूनें जात असतांना भोंवतालच्या परिस्थितीचा विसर पडतो असें मीं सांगितलें. तेवढ्यानें संपलें नाहीं. अगदीं वेगळ्या विश्वांत गेल्यासारखें वाटतें त्या चकचकीत नी काळ्याभोर रुळांच्या सान्निध्यांत आल्याबरोबर. कां बरें आपणाला असें वाटतें ?

मनुष्याच्या मनाची अशी मौज आहे, कीं त्याला वेगळें, दूरचें, अनंतांतलें कांहीं तरी हवें असतें. निदान

त्या वेगळयाचें, दूरच्याचें, अनंताचें ओझरतें दर्शन इथें असतें. त्या चकचकणाऱ्या परंतु पुढें पुढें अस्पष्ट होत जाणाऱ्या रेल्वे लाइन्सकडे पाहिलें कीं दूरच्या आणि वेगळ्या मुलुखाची सारखी आठवण होते, मनांत त्याच्या-विषयीं कल्पनातरंग उभे राहातात. विश्वामित्री स्टेशना-पासून बडोदा स्टेशनपर्यंत जात असतांना पेशावर-रावळपिंडीची मला आठवण होते. तो प्रदेश पाहिला नसल्याने त्याच्याभोंवती कल्पनेचें धुके माझ्या मनांत पसरलेलें आहे. त्या धुक्याकडे पाहायलाहि मला गंमत वाटते. उलट हरिद्वार—हृषिकेशीचा टापु मीं पाहिला असल्यानें त्याची स्मृति होतांच पुनःप्रत्ययाचा आनंद वाटतो. हृषीकेशच्या वाटेवरील निबीड अरण्य, त्यांतील ते उंच नी सरळ वृक्ष, तांतडीनें धावणारी गंगा नदी आणि तिचें बालमनाप्रमाणें असणारें निर्मळ पाणी हीं सर्व पुन्हा दिसूं लागतात आणि आपल्याकडे येण्याची खूण करतात. नेहमी कसें जाणार त्या देवभूमीकडे ? पण रेल्वेलाइन्सनें जातांना तिचें पुण्यस्मरण होतें आणि मनाला माहेरीं जाऊन आल्याचा आनंद वाटतो. असल्या आनं-दाचा घेतला आहांत ना आपण अनुभव ? घेतला नसल्यास आजच घेऊन पाहा. प्रवास न करतां प्रवास केल्याचें श्रेय आपणाला मिळेल.

माझे एक स्नेही आहेत. सकाळ—संध्याकाळ ते रेल्वे—लाइन्सच्या बाजूनें फिरावयास जातात. ऋतु कोण-

त्या वेगळ्याचें, दूरच्याचें, अनंताचें ओझरतें दर्शन हवें असतें. त्या चकचकणाऱ्या परंतु पुढें पुढें अस्पष्ट होत जाणाऱ्या रेल्वे लाइन्सकडे पाहिलें कीं दूरच्या आणि वेगळ्या मुलुखाची सारखी आठवण होते, मनांत त्याच्याविषयीं कल्पनातरंग उभे राहातात. विश्वामित्री स्टेशनापासून बडोदा स्टेशनपर्यंत जात असतांना पेशावर-रावळपिंडीची मला आठवण होते. तो प्रदेश पाहिला नसल्याने त्याच्याभोंवती कल्पनेचें धुकें माझ्या मनांत पसरलेलें आहे. त्या धुक्याकडे पाहायलाहि मला गंमत वाटते. उलट हरिद्वार–हृषिकेशीचा टापु मीं पाहिला असल्यानें त्याची स्मृति होतांच पुन:प्रत्ययाचा आनंद वाटतो. हृषीकेशच्या वाटेवरील निबीड अरण्य, त्यांतील ते उंच नी सरळ वृक्ष, तांतडीनें धावणारी गंगा नदी आणि तिचें बालमनाप्रमाणें असणारें निर्मळ पाणी हीं सर्व पुन्हा दिसूं लागतात आणि आपल्याकडे येण्याची खूण करतात. नेहमी कसें जाणार त्या देवभूमीकडे ? पण रेल्वेलाइन्सनें जातांना तिचें पुण्यस्मरण होतें आणि मनाला माहेरीं जाऊन आल्याचा आनंद वाटतो. असल्या आनंदाचा घेतला आहांत ना आपण अनुभव ? घेतला नसल्यास आजच घेऊन पाहा. प्रवास न करतां प्रवास केल्याचें श्रेय आपणाला मिळेल.

माझे एक स्नेही आहेत. सकाळ–संध्याकाळ ते रेल्वे–लाइन्सच्या बाजूनें फिरावयास जातात. ऋतु कोण-

ताहि असो, हातांत काठी घेतलेली आणि काचा मारलेली त्यांची मूर्ति मला हमखास भेटते. अगदी बेहद्द खूष आहेत ते त्या लोखंडी रुळांवर ! मी त्यांना एकदां विचारिलें, " रावसाहेब, आपण एखाद्या बागेंत फिरावयास न जातां या ओसाड रुळांच्या बाजूनें कां फिरायला येतां ? " माझा हा प्रश्न ऐकून ते मोठ्यानें हंसले व म्हणाले, " माझी मुलाखत कुठं प्रसिद्ध करणार आहांत वाटतं ? पण तसा थांग नाहीं लागूं देणार मी. एवढंच सांगतों, कीं इकडे या रुळांच्या सान्निध्यांत विचार करायला सुलभ जातें. " " तेंच तर माझं विचारणं आहे. कुठले विचार येतात आपल्या मनांत ? " अधिक माहिती मिळविण्याच्या आशेनें मीं विचारलें. पण म्हातारेबुवा असे खमंग ! ते मला म्हणाले, " ओळखला तुमचा डाव; असे फसायचे नाहीं आम्ही. तुम्ही विचार केलांत तर तुम्हालाहि कळेल. बरं आहे, रामराम ! "


माझ्या स्नेह्यानें युक्तीनें उत्तर देण्याचें टाळलें असलें तरी तितक्याच सफाईनें त्यानें उत्तर शोधून काढण्याची जबाबदारी आपल्यावर टाकली आहे. ती आपण पार पाडली पाहिजे. खरेंच, कां आपण रेल्वे-लाइन्सच्या बाजूनें जाण्याचें पसंत करतों ?

आपण म्हणाल, रुळांच्या दुतर्फा पसरलेल्या निसर्ग-सौंदर्यामुळें—ते विविध प्रकारचे वृक्ष, तीं हिरवींगार शेतें,

ते खळखळ वाहणारे ओढे, त्या सळाळणाऱ्या नद्या, मुनीप्रमाणें तटस्थ बसलेले ते डोंगर आणि आजीबाईप्रमाणें जरा वाकलेल्या त्या टेकड्यांवर छताप्रमाणें शोभणाऱ्या आकाशामुळें त्या लोखंडी रुळांच्या कडेकडेनें जावेंसें आपल्याला वाटतें. आपलें म्हणणें बरेंचसें बरोबर असलें तरी सर्वस्वीं बरोबर नाहीं. याचें कारण असें, कीं आपण म्हणतां तसलें सौंदर्य इतरत्रहि असतें. कां वाटत नाही त्याची रेल्वे-लाइन्सइतकी जादू आपणाला ? मला वाटतें, खरी जादू, खरें आकर्षण, कामिनींच्या पापण्यांप्रमाणें दिसणाऱ्या त्या काळ्याभोर नी तकतकीत रुळांतच आहे.

त्या रुळांकडे पाहिलें, कीं कसल्यातरी भव्य नी उदात्त भावना मनांत उत्पन्न होतात. बव्हंशीं सरळ मार्गानें जाणारे ते लांबचलांब दोन रुळ म्हणजे आगगाडीचे दोन डोळेच होत. त्यांच्या विश्वासावर एंजिन आपलीं चक्रें भरधाव फिरवीत असतें.

रेल्वे लाइन्सना इंग्रजींत ‘ परमनंट वे ’ असें म्हणतात. किती योग्य आहे तो शब्द ! परमनंट वे-नेहमींची किंवा कायमची वाट ! हिंदुस्थानभर आणि जगभर पसरल्या आहेत असल्या कायमच्या वाटा. ह्या कायमच्या वाटांनीं आजपर्यंत कोट्यवधि लोक आले नी गेले, यापुढे येतील आणि जातील. या वाटा मात्र कायम राहातील ! वाटसरूंना नेण्याआणण्याचें त्यांचें काम



खरी जादू कामिनीच्या पापण्यांप्रमाणे दिसणाऱ्या त्या काळ्याभोर रुळांतच आहे

आतां जगाच्या अंतापर्यंत-निदान यांत्रिक सुधारणांच्या अंतापर्यंत- चालत राहाणार. दूरदूरच्या देशांना जवळ आणण्याचें केवढें प्रचंड सामर्थ्य आहे या कायमच्या वाटेंत ! मनुष्य हा प्रवासप्रिय प्राणी आहे. किंबहुना मनुष्य हा प्रवासी आहे म्हटलें असतांना अधिक शोभेल.

प्रवासी मनुष्याची केवढी मोठी सोय केली आहे कायमच्या वाटेनें ! या वाटेच्या बाजूनें जात असतांना प्रवासाच्या कल्पना डोक्यांत घोळूं लागतात. मनांत एक प्रकारचें सुखद चांचल्य उत्पन्न होतें. शरिराला एक प्रकारचा उत्साह वाटतो आणि यांचा संमिश्र परिणाम म्हणून चित्तवृत्ति उल्हसित होतात.

पण मी जो रेल्वे-लइन्सच्या बाजूनें फिरावयास जातों तो आणखीच एका वेगळ्या कारणानें. आपणाला तें कारण पटत असल्यास पाहा. रेल्वे-लाइन्सच्या बाजूनें बरेंच अंतर चालून झाल्यावर आडमार्गानें थोडा आंत जाऊन एकाद्या शेतांत किंवा मोकळ्या जागेंत जाऊन मी बसतों. तेथें त्या वेळीं कोणी नसतें. मी, माझ्यासमोर पसरलेला भूभाग आणि वर तरंगणारें आकाश इतकींच आम्ही तेथें असतों. तेथून रेल्वे-लाइन्सकडे बघण्यांत एक प्रकारची मौज वाटते. सृष्टिसुंदरीनें आपल्या पाठीवर दोन वेण्या सोडल्यासारखे ते काळेभोर नी तकतकीत रूळ

दिसतात. त्यांच्याकडे आणि दाट होत चाललेल्या काळो-खाकडे बघत असतांना बसल्या जागेवरून उठावेसें देखील वाटत नाहीं. इतकी मोहिनी वाटते त्या जागेची मला.

वर उल्लेखिलेल्या आडमार्गावरून एक कल्पना सुचली मला. ती आपल्या विचाराकरितां रुजू करतों. सरळ मार्गानें एकसारखे जात असतांना, जरा आडमार्गानें जाऊन पाहण्याचा मनुष्याला एक प्रकारचा मोह वाटतो. सारखेपणाला कंटाळल्यामुळें म्हणा किंवा नाविन्याच्या आवडीमुळें म्हणा त्याला थोडेंसें आडरस्त्यानें जावेंसें वाटत असावें. आपलें कांहींतरी वेगळें असावें, वैशिष्ट्य असावें या अहंवृत्तीनेंहि कदाचित् आपण आडमार्गानें जात असूं. कारण कांहींहि असो, पण ही सर्वांच्या परिचयाची गोष्ट आहे, कीं सरळ मार्गानें कांहींहि करीत असतांना थोड्याशा आडरानांत शिरल्याशिवाय आपणाला बरेंच वाटत नाहीं—निदान मला तरी बरें वाटत नाहीं. त्या आडरानांत शिरून सरळ रस्त्याकडे बघण्यांत मला मौज वाटते. सरळ रस्त्याचें खरें स्वरूप—त्याचें खरें महत्त्वहि अशा वेळीं कळायला मला सुलभ जातें. शिवाय सरळ रस्त्याला साक्ष ठेवून आडमार्गानें जात असतांना खांच-खळगे लागले तरी वाट चुकण्याची भीति मुळींच नसते. कितीहि वेडेंवाकडें आंत गेलों तरी मागें फिरून सरळ

रस्त्याला लागण्याची हमखास खात्री असते. दायांच्या-बरोबर बागेंत आलेलीं मुलें इतस्तत: कितीहि बागडलीं तरी त्यांना जशी वाट चुकण्याची भीति नसते तसेंच हें असतें म्हणानात; आणि म्हणून तर मला रेल्वे-लाइन्सच्या बाजूनें फिरायला जाण्याचें एवढें आकर्षण वाटतें. नाहीं, वाटत आपणाला असलें आकर्षण ?

# घर-घरटें

गुजराती भाषेंत एक म्हण आहे—वर वगर रहिए, पण घर वगर न रहिए. याचा अर्थ असा कीं, पतिवांचून रहावें पण घरावांचून राहूं नये. व्यवहारज्ञान हाडीमाशीं मुरलेल्या गुर्जर बंधूंनीं या म्हणीला जन्म द्यावा, ही स्वाभाविक गोष्ट आहे. घराचें महत्त्व गुजरातमध्यें लोकांना जितकें पटतें, तितकें इतरत्र पटलेलें दिसत नाहीं. आपल्या शेजारीं राहणाऱ्या गुर्जर बंधूंकडून आपण घराचें महत्त्व शिकलों तरी त्यानें आपलें कल्याणच होईल. खरोखर घर ही कांहीं अजब चीज आहे. उगाच का इंग्रजींत म्हटलें आहे, 'होम होम स्वीट होम, देअर इज नो प्लेस लाइक होम,' घराइतकी मधुर जागा पृथ्वी-वर पाहूं जातां सांपडावयाची नाहीं.

पृथ्वीवर जर तुम्हांला नंदनवन बघावयाचें असेल तर तें एखाद्या आदर्श घरांतच सांपडेल. प्रेम, शांति, आदर, अगत्य, निष्ठा, कळकळ यांचें माहेरघर म्हणजे आपलें घर होय. ज्याला घर नसेल, त्याच्याइतका दुर्दैवी प्राणी नाहीं दुसरा. या अफाट आणि क्वचित् प्रसंगीं भावशून्य वाटणाऱ्या जगांत, आपणाला प्रेमानें, कळकळीनें जर कोणी हांक मारीत असेल तर तें आपलें घरच होय. तुम्हीं कुठेंहि असा--गर्दींत असा कीं एकांतांत असा, कशाहि स्थितींत असा—स्वागत केलें जाण्याच्या किंवा त्याग केलें जाण्याच्या, 'जरा येऊन जातोस किंवा जातेस का ?'--असें जर सारखें तुम्हांला कोणी म्हणत असेल तर तें तुमचें घरच होय. घराचें आकर्षण कांहीं और आहे यांत शंका नाहीं.

कां बरं इतकी घराची ओढणी आपणाला वाटावी ? आपण म्हणाल, घरांत आपली प्रेमळ आई असते, लडिवाळ पत्नी असते, निर्व्याज पण खट्याळ मुलें असतात, आणि धनधान्य असतें. आपलें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे. पण, मला वाटतें, आपल्या म्हणण्यांत आणखी थोडी भर घालायला हवी. घरांत आपण आपणच असतो, म्हणून आपणाला घराची ओढणी लागते. माझें म्हणणें मी स्पष्ट करतो.

घराबाहेर फिरत असतांना, आपण आपणच नसतो. आपलें खरें स्वरूप धारण करून आपण जगांत वागूं

शकत नाहीं. बुरखे घेऊन किंवा मुखवटे चढवून आप-णाला जगांत वावरावें लागतें. इच्छा नसूनहि वावरावें लागतें. कां तें थोड्या वेळानें सांगतोंच. आपली इच्छा नसतांना वाटेंत कोणी भेटलें तर आपणाला शिष्टाचार म्हणून हात वर करून नमस्कार करावा लागतो व तोंडावर हास्याच्या रेषा उमटावाव्या लागतात ! आपली तब्येत बरी नसतांना, कशी काय आहे आपली तब्येत असें कोणीं विचारल्यास, शिष्टाचार म्हणून ' बरी आहे तब्येत ' असें आपणाला म्हणावें लागतें ! आपली विशिष्ट प्रामाणिक मतें असून आपला धंदा, आपली परिस्थिती यांच्याकडे लक्ष देऊन, आपणाला खुशाल त्या मतांना मूठमाती द्यावी लागते ! स्वाभिमान उचंबळून एखादें वेळीं रागाचा झटका आला तरी शिष्टाचार म्हणून त्या रागावर आपणाला विरजण घालावें लागतें ! नैसर्गिक आकर्षणानें कांहीं वस्तूंकडे आपलें मन आकर्षिलें गेलें तर तावडतोब मनाला लगाम घालून आपणाला त्याला ताळ्यावर आणावें लागतें ! वरिष्ठ अधिकारी धडधडीत अन्यायाचें, चुकीचें बोलत असतांना आपणाला मूग गिळून स्वस्थ बसावें लागतें ! फार झालें तर कादंबऱ्यां-तील नायिकांप्रमाणें आपण आवंढा गिळू शकतो. पण दुसरें कांहींच करतां येत नाहीं आपणाला. आपण अगदीं आपणाला विसरून जगांत वावरत असतो.

इच्छा नसून असें आपण वागतो. कां तें, मघा कबूल केल्याप्रमाणें सांगतों. आपणाला वाटतें, आपल्या खाजगी गोष्टी, खाजगी आवडी निवडी, यांचें प्रदर्शन जनांत कशाला करा ? लोकांना कुठें आहे आपल्याविषयीं विचार करायला फुरसत ! कुठें आहे त्यांना कळकळ ? शिवाय त्यांनाहि त्यांचीं सुखदुःखें–मानापमानाचे प्रसंग–असणारच. अशा परिस्थितींत; कृत्रिम का होईना–आनंदाचें, प्रसन्नतेचें, सुखाचें वातावरण निर्माण करणें व करविणें हेंच इष्ट नाहीं का ? ' कशी काय आपली तब्येत ? बरी आहे ना ! ' असें विचारणाऱ्याची तब्येतीहि एखादे वेळीं बरी नसते. अशावेळीं आपण आपल्या तब्येतीचें रडगाणें त्याच्यासमोर गाणें, केव्हांहि ठीक होणार नाहीं. अशा वेळीं आपली प्रकृति बरी नसूनाहि ' होय बरी आहे प्रकृति ' असें म्हणण्यांत सत्य नसलें तरी औचित्य खास आहे. जगांत परस्परांना धीर देण्यानें आपण एक प्रकारचें उत्साहाचें वातावरण निर्माण करीत असतों. कृत्रिम बगीचाच आपण एकप्रकारें तयार करीत असतो ! आणि त्याचीहि जरुरी आहे.

पण याचा केव्हांतरी कंटाळा येतोच येतो. स्वतःला विसरून केलेली कृत्रिम प्रकारची वागणूक शेवटीं तापदायक होते, असह्य होते; आणि मग आपणाला आपणच व्हावेसें वाटतें. सर्व प्रकारचे बुरखे, मुखवटे,

सर्व प्रकारचीं सोंगें टाकून देऊन आपणाला आपणच व्हावेसें वाटतें. जसें आपण असूं, जसा आपला स्वभाव असेल, जशा आपल्या आवडीनिवडी असतील, तसें वागण्याची जर मनुष्याला कुठें मुभा असेल तर ती त्याच्या घरांत होय. घराचें महत्त्व मी मानतो तें या दृष्टीनें.

बोजड वेष टाकून देऊन नुसती लंगोटी किंवा लुंगी नेसून बसावयाचें असल्यास घरांत बसतां येते. पंचपक्वान्नें किंवा त्याच्या उलट नुसती कांदाभाकर खायची असली तरी ती आपल्या घरांत खातां येते. मनाला एखादें वेळीं कांहीं न करतां झोंपून राहावेसें वाटल्यास तसेंहि करतां येतें. कुणाशीं शब्दहि बोलावयाचा नाहीं, असा निर्धारहि कांहीं काळ करतां येतो. मनासारखें कांहीं न झाल्यास घराखेरीज कुठेंच रागावतां येत नाहीं. वेडेंवांकडें बोलण्याची संधीहि घरांतच मिळू शकते. तात्पर्य दिलचाहेल त्याप्रमाणें बोलतां, बसतां, खातां, पितां घरांतच येतें. घरांतील, मनुष्याची जी वागणूक असते ती अत्यंत स्वाभाविक असते. कोणी मनुष्य कसा आहे, याचें बरोबर निदान करावयाचें असल्यास गुपचूप त्याच्या घरीं जाऊन पाहावें. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं स्वभावविषयक व इतरहि काय दोष आहेत, याची माहिती त्याच्या घरांतल्या माणसांखेरीज कोणालाच नसते, असें स्टीव्हनसननें एके

ठिकाणीं म्हटलें आहे तें खरें आहे. कारण घरांतली आपली जी वागणूक असते ती अत्यंत अकृत्रिम असते.

आणि तशीच ती असावी. शिष्टाचाराच्या बंधनाखालीं बाह्य जगांत वावरत असतांना आपल्या मनावर भयंकर ताण पडलेला असतो. तो ताण मोकळा झालाच पाहिजे. शिष्टाचाराच्या संरक्षणाकरितांहि झाला पाहिजे. कारण तसा तो न झाल्यास मनुष्य बाहेरहि वेडावांकडा वागू लागेल. मनुष्यानें मोकळेपणानें घरांत वागणें हें सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीनेंहि योग्य आहे.

घराला रुग्णालयाची उपमा एखादे वेळीं मला द्यावीशी वाटते. रुग्णालयांत शारीरिक जखमा झालेल्यांना, रोग झालेल्यांना नेऊन ठेवण्यांत येतें. मानसिक जखमा, हृदयाचे रोग, बरे करण्याच्या कामीं घरासारखें दुसरें रुग्णालय नाहीं. बाहेर झालेल्या वेदना, अपमान, यांचा उपशम घरांत येऊन घरांतल्या प्रेमळ मंडळींशीं बोलल्यानें होऊं शकतो. घराची ओढ माणसाला जी लागते ती याचमुळें होय.

आकाशांत स्वैरसंचार करणाऱ्या, पोटासाठीं वणवण फिरणाऱ्या किंवा उडणाऱ्या, पक्ष्याला संध्याकाळ होऊन काळोख पडूं लागतांच घरट्याकडे धांवून जावेसें वाटतें. कारण घरट्यांत ऊब असते, सुरक्षितता असते. घराच्या बाबतींतहि हेंच म्हणतां येईल, त्यांत प्रेमाची

ऊब असते, संरक्षणाची खात्री असते. कोंकणाकडे घराला घरटें म्हणण्याची जी चाल आहे, ती या दृष्टीनें फार योग्य आहे असें मला वाटतें. घरांत काय सामान्यपणें असतें किंवा निदान असावें, याचा उलगडा 'घरटें' या शब्दापासून फार चांगला होतो.

दुर्दैवानें आपल्यापैकीं काहींचीं घरें घरट्या-सारखीं ऊबदार, प्रेमळ, प्रसन्न नसतात. तसल्या ठिकाणीं आपण गेलों असतांना आपण घरीं आलों नसून दारीं आलों आहोंत, असें आपणाला साहजिकच वाटतें. एक प्रकारची घरघर तसल्या घरांतून सुरू असते ! अर्थात् त्याला जबाबदार घरांतलीं माणसेंच होत. रुग्णालयाचें रुपांतर मच्छीबाजारांत करून कसें चालेल ? घरांत शांतता—समंजसपणा हीं असायलाच हवींत. चांगल्या घरांत तुम्हांला हीं दोन्हीं आढळतील. त्यांतील व्यक्ति रागावल्या तरी पाळीपाळीनें रागावतील. एकदम सर्वजण रागावणार नाहींत. एकानें रागावयाचें, दुसऱ्यानें गम खायचा, असा प्रकार चालू असतो. आणि हेंच योग्य होय. गिरण्यांतील यंत्रें तापलेल्या स्थितींत फाटून जाऊं नयेत म्हणून, मधून मधून कृत्रिम वाऱ्याचे झोत सोडलेले नसतात का ? तसेंच हें समजावें.

## सर्व क्षणिकम् !

कीर्तन अगदीं ऐन रंगांत आलें होतें. बुवांनीं पूर्वरंग सुरू केला असून, त्यांतील वेदांतांत ते अगदीं गढून गेले होते. जगाचें कोडें आपण उलगडलें अशा आत्मविश्वासानें पोटावर हात फिरवीत ते म्हणाले, "सर्व क्षणिक आहे बरं. सर्व क्षणिकम् आहे. नाममात्राला, पदार्थमात्राला नाश आहे. ह्या चिपळ्या, ह्यांना—नाश आहे. हा मृदंग, ह्याला नाश आहे. ही तुमची बाजाची पेटी, हिलाहि, नाश आहे. अहो, फार काय सांगावं, तुम्हांआम्हांलाहि नाश आहे. कांहीं टिकणारं नाहीं. हां....सर्व क्षणिकम् ! मोठामोठालीं साम्राज्यं बुडालीं. राजेमहाराजे, चक्रवर्ति राजे, सर्व लयाला गेले ! एवढा

नेपोलियन बादशहा, सर्व जगाला कांपवीत होता, पण काळ समोर दिसतांच स्वतः कांपू लागला ! थरथरा कांपू लागला ! याला म्हणावं सत्ता ! काळापुढं कोणाचं चालतं नाहीं. सर्वं क्षणिकम् ! असं असून क्षणिकाच्या मागं लागले आहेत जेहेचे सर्व लोक ! माझा पैसा, माझी बायको, माझीं मुलं, माझं घर, माझा वाडा, माझं राज्य, माझं साम्राज्य, माझी कीर्ति ! अरे, आहे काय तुझं ? हां, काय हो आहे याचं ? आहे का कांहीं याचं ? सर्वं क्षणिकम् ! मग आहे तरी काय अ-क्षणिक किंवा शाश्वत ? एक गोष्ट शाश्वत आहे. गोविंद नाम ! बाकीं सर्व क्षणिक म्हटलं आहे तें उगीच नाहीं महाराज !

सर्वं क्षणिकं सर्वं क्षणिकं ।
भज गोविंदं भज गोविंदं ॥ ”

बुवांच्या कीर्तनाचा येथेंच निरोप घेऊन पुढें मी एकटाच त्या दिवशीं फिरायला गेलों. माझ्या मनांत आणि कानांत बुवांचेच शब्द घुमत होते– सर्वं क्षणिकं, सर्वं क्षणिकं !

थोड्या वेळानें मी एका बागेजवळून जाऊं लागलों. बागेंत मोगऱ्याला आणि गुलाबाला बहर आला होता. मोगऱ्याचीं आणि गुलाबाचीं टपोरीं फुलें झाडांवर खुलून दिसत होतीं. त्यांच्या सौंदर्यानें आणि त्याहीपेक्षां सौरभानें भोंवतालचें वातावरण स्निग्ध-मधुर बनलें होतें. त्या

विलोभनीय दृश्यानें मला क्षणभर जागच्याजागीं थांबायला लावलें. इतक्यांत मला बुद्धांचे शब्द स्मरले—सर्व क्षणिकं, सर्व क्षणिकं ! मी मनांत म्हणालों, हें दिसतें आहे हें क्षणिक आहे का ? मनाकडून उत्तर आलें—' अलबत. उद्यां हें मनोहारी दृश्य कदाचित् तुला दिसणारहि नाहीं. ' पुन्हा मीं मनाला सवाल टाकला, ' असेल हें क्षणिक; म्हणून तें असत्य आहे काय ? ' मनाकडून उत्तर आलें, ' तें खरं, पण तें शाश्वत नाहीं. '

मी पुढें चालू लागलों. समोरून माझ्या दृष्टीनें नमुनेदार असें एक जोडपें येत होतें. त्या जोडप्याची मला ऐकून माहिती होती. त्यांच्यांत कसलें कसलें वैगुण्य नव्हतें. बेताचें वय, बेताचा पैसा बेताचें रूपलावण्य, बेताचा स्वभाव—सर्व कांहीं ठीक होतें. त्या जोडप्याकडे पाहून मला नेहमीं समाधान वाटे व वाटतें. परस्पर प्रेम आणि परस्पर समजूतदारपणा या गुणांमुळें त्यांनीं आपलें जीवन आदर्श बनविलें होतें. त्यांच्याकडे पहातांच मला पुन्हा बुद्धांचे शब्द आठवले आणि वाटलें, असेल हेंहि जोडपें क्षणिक; पण तेवढ्यानें तें असत्य किंवा असुंदर ठरत नाहीं.

मी त्या जोडप्याला नमस्कार करून परंतु माझ्या मनांतील विचार न कळवितांच पुढें चालूं लागलों. वर्तमानपत्रें विकणारा एक मुलगा ओरडत येत होता—

'शेठ घनश्यामदास वर्मा यांची स्थानिक विश्वविद्या-लयाला पंधरा लाख रुपयांची देणगी.'

त्याची घोषणा ऐकून मला हंसू आलें. कारण बुवांचे—' सर्वं क्षणिकम् ' हे शब्द मला आठवले. शेठ घनश्यामदास यांचें दातृत्व क्षणिक की विश्वविद्यालय क्षणिक ? बुवांच्या मतानें गोविंदनामाखेरीज कांहींच शाश्वत नव्हतें. शेठजींची देणगीदेखील क्षणिक सुखा-साठीं होय, असें बुवा म्हणणार ! त्याऐवजीं सहस्रनाम-कीर्तनें शेठजींनीं करविलीं असतीं तर त्यांना शाश्वत सुखाची जोड मिळाली असती !

थोड्या वेळानें मी गांवाच्या बाहेर आलों. संध्या-काळची वेळ होत आली होती आणि आकाशांत दक्षिणो-त्तर इंद्रधनुष्य पसरलेलें होतें. एकमेकांत पसरलेल्या त्याच्या त्या सूक्ष्म आणि चेतोहर रंगछटा पाहून मला आनंद वाटला. विशेषतः जमिनीवर पसरलेला गवताचा गालिचा आणि वर बिजवऱ्याप्रमाणें शोभणारें इंद्रधनुष्य पाहून माझ्या वृत्ती क्षणभर तल्लीन झाल्या. दुसऱ्या क्षणाला मी शुद्धीवर आलो आणि म्हणालों, ' सर्व क्षणिकम् – सर्वं क्षणिकम् ! ' इंद्रधनुष्य आणि त्याचें सौंदर्य, हीं क्षणिक होत. नंतर माझ्या मनांत विचार आला, कीं क्षणिकत्वाच्या मुद्द्यावर जर आपण सुंदर वस्तूंचा त्याग करूं लागलों तर आपली मोठी अनु-

कंपनीयच स्थिति होईल. किंबहुना जगांतील बहुतेक चांगल्या नी सुंदर गोष्टी या क्षणिकच असतात.

शाश्वततेकरितां धडपडणाऱ्या चोखंदळ व नीरस लोकांचें मात्र याच्या उलट असतें. ते नेहमीं शाश्वत वस्तु असतील तेवढ्यांनाच थारा देणार. बाकीच्यांची हकालपट्टी करणार. या बाबतींत मारुतीची कथा मोठी मनोरंजक आहे.

मारुतीवर खूष होऊन सीतामाईंनीं त्याला नव-रत्नांचा हार अर्पण केला. माकडच तें. मारुतीरायांनीं दांतांनीं तीं रत्नें फोडून त्यांत राम आहे कीं काय तें पाहिलें आणि त्यांत राम नाहीं असें तपासून तो कंठा त्यांनीं फेंकून दिला ! मला वाटतें, या कंठ्याची अशी दुर्दशा करण्यापूर्वी मारुतीरायांनीं आपली बुद्धि वापरायला हवी होती. त्या नवरत्नांत राम नसेल, तीं सत्य नसतील, शाश्वतहि नसतील; परंतु ज्या प्रेमभावनेनें सीतामाईंनीं कंठा त्यांना दिला, ती भावना तरी सत्य होतीच ना ?

परंतु शाश्वततावादी लोकांचें कुठें चुकत असेल तर तें येथेंच. शाश्वततेच्या मृगजळामागें लागून ते क्षणाच्या सुखाला आंचवतात. तुम्हीं त्यांना कितिहि सांगितलेंत तरी ते ऐकणार नाहींत. विचक्षणा करकरून सुखाला आणि सौंदर्याला पारखे होतील. तुम्ही त्यांच्या समोर आइस्क्रीम ठेवलेंत, तरी तें क्षणिक म्हणून ते

स्वीकारणार नाहींत. उलट म्हणतील, ' क्षणापूर्वी हें आईस्क्रीम निव्वळ साखरेचं दूध होतं. एवढंच नाहीं, तर अर्ध्या तासानं पुन्हा तें दूधच होणार. तस्मात् या क्षणिक गोष्टीचा आम्हांला स्वीकार करतां येत नाहीं. अतएव, भज गोविंदं, भज गोविंदम्. '

एखाद्या वीस वर्षं वयाच्या रुपवतीकडे पाहून हे शाश्वततावादी काय म्हणतील हें मला माहीत आहे. ते म्हणतील, ' वीस वर्षांपूर्वी आज सुंदर दिसणारा हा देह कशांत लोळत होता याचा तुम्हीच विचार करा. तसेंच आणखी वीस वर्षांनीं या देहाची काय अवस्था होईल याचाहि विचार करा. जरेनें सुरकतलेल्या या देहाकडे तुम्हाला मग पाहावणारहि नाहीं ! तेव्हां क्षणिक टिकणाऱ्या या सौंदर्यानें तुम्ही वेडावून जातां या तुमच्या वेडाला काय म्हणावें ?

अशांना आपणहि उत्तर द्यावें–' आपण कांहीं म्हणूं नका. शक्य तर आम्हींच तुमचा मेंदु तज्ज्ञांकडून तपासवून घेणार आहोंत. शाश्वततेच्या नांवाखालीं सौंदर्याची आणि श्रेयस्कर गोष्टींची हेटाळणी करणाऱ्या तुम्हां नीरस लोकांना काय म्हणावें तेंच कळत नाहीं. आणि शिवाय अशा या बोलण्यांत स्वार्थ व परमार्थ किती आहे हेंहि आम्ही ओळखून आहोंत. भोळ्याभाबड्या लोकांना सर्व क्षणिकम् असें सांगून आणि त्यांना गाफील करून



६९५४ ग्रंथालय

त्यांच्याजवळील सर्व लुबाडण्याचाहि तुमचा कावा नसेल; असें सांगवत नाहीं. सर्व क्षणिकमूचा मंत्र सांगून आपल्या शिष्याकडून हजारों रुपयांची गुरुदक्षिणा घेणारे आणि शिष्याची मिळकत स्वाहा करणारे कांहीं कमी का सद्गुरु महाराष्ट्रांत वावरत आहेत! तुमचा 'क्षणिकवाद' तुमच्याजवळच राहूं द्या.'

दुसऱ्याहि एका मुद्यावर ह्या क्षणिकवादाचे वाभाडे काढण्याच्या योग्यतेचा तो आहे. सर्व क्षणिकं म्हणून व जगाची किंमत शून्य ठरवून या क्षणिकवाद्यांना लोकांना भलत्याच मार्गावर नेलें. प्रत्यक्ष दिसणाऱ्या जगांतील सुखाकडे आणि दुःखाकडे पाठ फिरवून, अमूर्त आणि अदृश्य अशा काल्पनिक परमात्मतत्त्वाच्या शोधार्थ कितीतरी चांगल्या लोकांनीं आपल्या शक्तीचा अपव्यय केला. जगाच्या दुःखाला, अशाश्वततेला कंटाळून कांहीं जाणत्या लोकांनीं क्षणिकवादाचा तोडगा शोधून काढला म्हणावें, तर तोहि कांहीं प्रशस्त मार्ग नाहीं. क्षणिकवादानें जगांतील दुःख नाहींसें होणें शक्य नाहीं. त्याकरितां समाजरचना बदलली पाहिजे. विषमतेवर उभारलेली सध्यांची समाजनौका ही केव्हांतरी असूयेच्या खडकावर आपटणारच. तत्पूर्वी आपण आपली मनोवृत्ति तरी शुद्ध करायला हरकत नाहीं. गोविंदनामस्मरणानें स्वर्ग प्राप्त झाला तरी पृथ्वीवरील शल्यें त्यानें बोथटणार नाहींत.

आणि जोंपर्यंत आपणाला जगावयाचें आहे तोंपर्यंत पृथ्वीचा विचारहि सोडून चालावयाचें नाहीं.

त्या दृष्टीनें पाहिलें असतां उलट या जगांतच आनंद मानायला आणि जगापासून अधिक आनंद मिळवायला आपण शिकलें पाहिजे. जगांत कांहीं कमी महत्वाच्या आणि आनंददायक गोष्टी नाहींत. त्या क्षणिक असतील, परंतु निरुपयोगी नाहींत. जगांतील शील, सौंदर्य, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांच्या रक्षणार्थ झटणारे महाभाग हे पारमार्थिक दृष्ट्या क्षणिक गोष्टींकरितां झगडत असले, तरी त्या निरुपयोगी नसून जगाला उपकारकच आहेत. सौंदर्याचे, स्वातंत्र्याचे, सुखाचे क्षण जरी मिळवतां आले तरी त्या क्षणांकरितां सर्व आयुष्य कुरबान करायला हरकत नाहीं. दगडासारखें शाश्वततेचें जीवन कंठण्यापेक्षां इंद्रधनुष्याचें क्षणिक जीवन पुरवलें. तें तरल असलें तरी सत्य आहे, आणि त्याहीपेक्षां सुंदर आहे.

## एकेकाची तऱ्हा

सुप्रसिद्ध कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट याच्या लहानपणाची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्याला आपल्या कोटाच्या गुंड्यांना हात लावल्याखेरीज विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंच देतां येत नसत. ही त्याची तऱ्हा त्याच्या बुद्धिमत्तेचा हेवा वाटणाऱ्या एका वर्गबंधूनें लक्षांत ठेवून एके दिवशीं मारामारींत त्याच्या कोटाच्या गुंड्या उपटून टाकल्या. झालें; त्यानंतर त्या दिवशीं कुमार वॉल्टरला मास्तरांनीं विचारलेल्या प्रश्नांची केवढी गैरसोय वाटूं लागली ? एका प्रश्नाचेंहि उत्तर त्याला सुचेना. त्याची जीभ त्याच्या तोंडांत घुटमळूं लागली, आणि त्याच्या सर्वांगाला दरदरुन घाम आला !

९०५०७

वॉल्टर स्कॉटचेंच कशाला ? इतरहिं मंडळींच्या, कांहीं कमी का तऱ्हा असतात, बोलण्या चालण्याच्या ? माझ्या माहितीचे एक सुप्रसिद्ध वक्ते आहेत, त्यांना बोलत असतांना आपल्या कॉलरच्या बटनाला हात लावण्याची व त्याच वेळीं मान हलवून हवेंत काल्पनिक वर्तुळें काढण्याची संवय आहे. जसजसें त्यांचें व्याख्यान रंगत जातें, तसतसे हे विशिष्ट प्रकारचे हातवोर व हीं वर्तुळें अधिकाधिक होऊं लागतात. एकदां काय मौज झाली, त्यांचें व्याख्यान संपलें तरी मानेवर बोटें ठेवून वर्तुळें काढण्याची त्यांची क्रिया कांहीं संपेना ! तेव्हां हा कांहीं वातविकार आहे कीं काय असें वाटून एक डॉक्टर त्यांच्या जवळ आले. तेव्हा ते त्यांना इंग्रजींत म्हणाले, "Don't you worry, doctor, I am in the best of moods ( तुम्हीं काळजी नका करूं डॉक्टर. मी अगदीं मजेंत आहे. )"

दुसरे एक गृहस्थ आहेत, त्यांना बोलतांना लिहिण्याची संवय आहे. 'अफ कोर्स, अफ कोर्स' ( अलबत, कां नाहीं ? ) असें म्हणून तुमच्याशीं बोलत असतांना, दौतींत टाक बुचकळून ते बोललेला मजकूर लिहितील ! त्यांची ही तऱ्हा त्यांच्या नोकराला स्वाभाविकपणेंच त्रासदायक वाटत असल्यास नवल नाहीं. कारण कोणी दहापांच लोक येऊन गेले कीं, त्याला

टिपकागद व साधे कागद बदलून नवे ठेवावे लागतात. या त्रासाला कंटाळून पुढें मात्र त्यानें एक युक्तीच शोधून काढली. या सर्व अनर्थांचें मूळ दौतींत असणारी शाई आहे असें समजून त्यानें दौत कोरडी ठेवण्याचें ठरविलें. त्यानंतर त्याच्या धन्याची, रिकाम्या दौतींतहि टांक बुचकळून लिहिण्याची संवय जरी गेली नाहीं, तरी त्याच्या मागचा त्रास मात्र वांचला.

हॉलिवूड येथील जॉन फोर्ड नांवाच्या एका दिग्दर्शकाची तऱ्हा कांहीं वेगळीच आहे. शूटिंगचें काम चालू असतांना तो इतका कांहीं व्यग्रचित्त होतो कीं, त्याच्या मनांतील भावनांची क्षुब्धता हातरुमाल दातांनीं चावचावून तो व्यक्त करीत असतो. याकरितां त्याला आपल्या खिशांत बरेच हातरुमाल बाळगावे लागतात. त्याच्या खिशांतील हातरुमालांची होत असलेली ही दुर्दशा सौ. फोर्डसारख्या सुगृहिणीला कशी आवडणार! तिनें एके दिवशीं मि. फोर्ड यांच्या खिशांत हातरुमालांच्या ऐवजीं मलमलीचे लहान लहान चौरस तुकडे घड्या करून ठेवले. त्या दिवशीं शूटिंगच्या वेळीं खिशांत हात घालतांच जॉन फोर्डला रुमालाऐवजीं दुसरेंच कांहीं आढळलें. मग काय? त्यावेळीं त्याला दिग्दर्शनाचें काम करतां येईना. त्यानें सर्व काम थांबविलें. नोकराला आपल्या घरीं पिटाळलें. आणि जेव्हां खिसा हातरुमालांनीं

भरला आहे असें त्याला आढळलें, तेव्हां त्यानें शूटिंग-करितां आज्ञा दिली !

अशाच एका तऱ्हेच्या जोरावर एका वक्त्यानें एका सभेंत आपला ठराव पास करून घेतला ! त्याला बोलतांना टेबलावर ठेवलेले वजनाचे गोळे हातांत फिरविण्याची संवय असे. एकदां एक ठराव मांडीत असतांना हातांतला गोळा प्रेक्षकांना दाखवीत तो म्हणाला, "आपण हा ठराव पास कराल अशी माझी खात्री आहे." आणि मौज अशी कीं, एरव्हीं नामंजूर होणारा ठराव त्या गोळयाच्या भीतीनें त्या दिवशीं मंजूर झाला !

बोलणाऱ्यांप्रमाणें गाणाऱ्या लोकांच्याहि कितीतरी तऱ्हा असतात. ताना घेत असतांना हाताचीं बोटें व मान इतक्या कांहीं वेगवेगळया प्रकारांनीं कांहीं गाणारे फिरवितात कीं क्वचित् त्यांच्या गाण्यानें करमणूक नाहीं झाली तरी असल्या अंगविक्षेपांनीं खास होते. कित्येक उत्तम गवय्ये गातांना इतकीं वाईट तोंडें करितात कीं त्यांना पडद्याआड बसवून गायला लावावेसें वाटतें. अशा गाणाऱ्यांनीं निदान चांगले मुखवटे लावून गाण्याचा उपक्रम करून बघण्याजोगा आहे. कर्णमधुर संगीत ऐकत असतांना डोळयांना जाचक होणारे मुखविक्षेप पाहिले कीं उत्तम पुलाव खात असतांना लागलेल्या कठीण खड्याची आठवण होते.

लिहितां-लिहितां बोलण्याची वर तऱ्हा सांगितली. तशी लोळत असतांना गाणें म्हणण्याची संवय एका गायिकेला

होती. बसून गाणेंच म्हणतां येत नसे तिला ! याचें कारण ती गाणें शिकली ती पलंगावर पडल्या पडल्या. तिचे वडील गाण्याची तालीम करीत. ती ती पडल्या पडल्या ऐके. एका बादशाहानें जेव्हां तिच्या गाण्याची कीर्ति ऐकून तिला गाण्याकरितां आपल्या माहालांत बोलविलें आणि गाण्याची विनंती केली तेव्हां कांहीं केल्या तिच्या तोंडून एकहि सूर निघेना ! आपली मुलगी उत्तम गाते, असें म्हणून बादशाहाजवळ तिच्या बापानें फुशारक्या मारल्या होत्या. त्या आठवून त्याच्या नाड्या थंड होण्याची पाळी आली. तेव्हां होतें नव्हतें तेवढें सर्व अवसान एकवटून त्यानें रागाच्या भरांत मुलीच्या श्रीमुखांत भडकविली. त्यासरशीं मुलगी कोलमडून खालीं पडली. परंतु चमत्कार हा कीं, पडल्याबरोबर रडण्याचे सूर निघण्याऐवजीं तिच्या मुखावाटे सुरेल संगीत स्रवूं लागलें !

अंगविक्षेपांच्या बाबतींत तर कमालीच्या तऱ्हा पाहावयास सांपडतात. एक जण रस्त्यानें असे चालतात कीं जणूं काय त्यांचें सर्व शरीर एखाद्या खोड्यांत अडकवून ठेवलेलें आहे. त्यांच्याकडे पाहिलें कीं असें वाटतें, एखादा लाकडी पुतळाच तर रस्त्यातें जात नाहीं ना ? याच्या उलट मोटारीचें हँडल मारल्यावर ती जशी थरथर हलते, तशी चालतांना सर्वांगाची हालचाल करणारे दुसरे एक गृहस्थ आहेत. त्यांच्याकडे पाहिलें कीं वाटतें, हा मनुष्य

एखाद्या कायमच्या भूकंपांत तर सांपडलेला नाहीं ना ! हाताचीं बोटें मोडण्याची किंवा मानेला हिसका देण्याची किती तरी जणांना संवय असते. अशी मंडळी बसतील तिथें ' कट् कट् कट् ' असा आवाज करीत सुटतील. मिशीला पीळ भरणारे मोठे मजेशीर लोक असतात. तो त्यांचा चाळा सुरूं झाला कीं त्यापुढें त्यांना कसलीहि फिकीर वाटत नाहीं. कुठल्या तरी विचाराच्या तंद्रींत लागल्यावर, मिशांना पीळ भरल्यानें, त्यांना विचार करायला मदत होत असावी असें अनुमान करायला हरकत नाहीं. एका गृहस्थाला ही संवय इतकी लागली होती कीं, कांहीं प्रसंगामुळें त्याला आपल्या मिशांना रजा द्यावी लागली असूनहि त्याचे हात नेमके नेहमींच्याच जागीं जात !

स्त्रियांच्या वेगवेगळ्या तऱ्हांना ' चाळे ' हें रूक्ष व गद्य नांव न देतां ' विभ्रम ' किंवा ' ललित विभ्रम ' असलें काव्यमय नांव देणेंच शोभेल. केवढें काव्य किंवा केवढी जादू असते या ललितविभ्रमांत ! अर्थात् सर्वच स्त्रियांच्या ठिकाणीं हे विभ्रम पाहावयास सांपडणार नाहींत. कांहीं साध्याभोळ्या, ' अगदीं हिंदु ' अशा स्त्रिया असतात. त्यांच्या ठिकाणीं असले विभ्रम मुळींच संभवत नाहींत. अशाच एका सीध्या किंवा साध्या मुलीनें एकदा एक कादंबरी वाचायला घेतली होती. त्यांतील नायिकेनें केलेले भ्रूभंग किंवा नयनविक्षेप यांचीं वर्णनें

अनेक वेळां वाचून तिला वाटलें, आपणालाहि भ्रूभंग नाहीं का करतां येणार ? तिरक्या नजरेनें नाहीं का पाहातां येणार ? अशा विचारानें तिनें एका मोठ्या आरशासमोर स्वतःला उभें केलें, आणि डोळयांची ही कसरत करून पाहण्याचा खूप प्रयत्न केला ! पण व्यर्थ. तिला तें कांहीं केल्या साधेना. तेव्हां तिनें आपल्या मैत्रिणीला सांगितलें, " मेले कादंबरीकार भलभलतीं वर्णनें करतात. काय म्हणे भ्रभंग ! नाठाळ मेले ! " त्यावर त्या रसिक मैत्रिणीनें उत्तर देण्याच्याऐवजीं असें कांहीं मजेशीर डोळे करून तिच्याकडे बघितलें कीं, तिला त्या वेळीं पळूनच जावेंसें वाटलें.

कुठल्याहि निरोगी आणि आनंदी युवतीच्या ठिकाणीं ललितविभ्रम हे असावयाचेच. तिचा तो स्वभावधर्म आहे. तिला ते केल्यावांचून चैन पडणार नाहीं. वृक्षाची पालवी नाहीं का नाचत ? वेली नाहीं का हलत–डुलत ? लाटा नाहीं का उड्या मारीत ? कळया नाहीं का लाजत ? तीच तऱ्हा कामिनींची. त्यांच्या डोळयांच्या हालचालींत इकडचें विश्व तिकडे करण्याचें सामर्थ्य असतें. त्यांच्या भ्रूभंगांत काय असतें हें सांगण्यापेक्षां काय नसतें हेंच विचारणें जास्त शोभेल. एका स्त्रीनें आपल्या धनुष्याकार भुंवया चढविलेल्या पाहून एका सत्पुरुषाचा जागच्याजागीं तोल गेल्याचें मला माहीत आहे.

हें झालें चांगल्या विभ्रमांचें. याच्या उलट कांहीं विभ्रम मोठे गमतीचे असतात. केस किंवा डोकें करा-करा खाजविणें, पदर तोंडांत धरून त्याचा चोळामोळा करणें, किंवा आश्चर्यप्रदर्शक म्हणून जीभ बाहेर काढणें, इत्यादि प्रकार यांत यतील. माझ्या दृष्टीनें रूपवती अशा एका स्त्रीनें एके दिवशीं आश्चर्य प्रदर्शक म्हणून वीतभर जीभ बाहेर काढली ! त्या वेळीं अगदी हुडहुडी भरल्या-सारखें मला वाटलें.

कांहीं कांहीं लेखकांच्या तऱ्हाहि मोठ्या मजेशीर असतात. कोलरिजला अफूची गोळी ठासल्याखेरीज चैन पडत नसे. जॉन्सनला चहाचें कमालीचें वेड होतें. मेकॉलेनें त्याचें असें वर्णन केलें आहे—'He drank oceans of tea—चहाचे तो समुद्रच पिई.' चेस्टरटनची प्रतिभा मदिरापानावांचून प्रसन्न होत नसे. हरिभाऊ आपटे आपल्या शरिरावर चाकू, कात्र्या, सुईदोरा, पेन्सिली, फाऊंटन पेनें, कागद इत्यादि वस्तूंचा फिरता बाजारच वागवीत असत. शब्दांच्या योग्य निवडीविषयीं एका फ्रेंच लेखकाला विलक्षण नाद असे. हा त्याचा नाद इतक्या कळसाला पोंचला कीं स्वतःच्या प्रियेच्या प्रणय-पत्रांतहि भावना योग्य शब्दांत व्यक्त झाल्या आहेत किंवा नाहीं हें तो पाही ! आणि तिला उत्तर देतांना प्रणयभाव व्यक्त करण्याच्या ऐवजीं तिनें केलेल्या अक्षम्य चुका

दाखविण्यांतच त्याचें सारें पत्र भरून जाई ! असल्या तऱ्हेवाईक विद्वानाकडे पाहिल्यावर त्याच्याशीं जन्माची गांठ घालून घेतलेल्या साध्वीची कोणालाहि झालें तरी कींवच करावीशी वाटेल !

आपल्या इकडे विद्यमान लेखकांच्या खाजगी आयुष्यक्रमाची माहिती फारशी कोणाला नसते. तशी ती मिळवितां आल्यास नामांकित लेखकांच्या कितीतरी मजेशीर गोष्टी आपणाला कळतील. आपल्या राहत्या घरांत वारंवार बदल करण्याची तात्यासाहेब केळकर यांची वृत्ति पुष्कळांच्या परिचयाची असेल. हॉल असेल तेथें भिंत घालून खोली तयार कर, खोल्या असतील त्यांतील मधल्या भिंती पाडून त्यांचें हॉलमध्यें रुपांतर कर, छप्पर असेल तें काढून तिथें गच्ची कर किंवा गच्ची गळते आहे असं पाहून पुनः छप्पर कर, अशा मजेशीर आलटापालटी त्यांच्या घरांत नेहमीं होत असतात. तुम्ही त्यांना एकदां भेटून पुन: सहा महिन्यांनीं भेटायला गेलांत, तर चूकून आपण दुसऱ्याच्या घरांत तर आलों नाहींना, असें तुम्हांला वाटल्यावांचून मुळींच राहणार नाहीं.

मला मात्र या त्यांच्या वृत्तीचें मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. कारण प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व असल्या तऱ्हां-तूनच पाहावयास सांपडतें. आत्म्याचा खरा आविष्कार असल्या अनियंत्रित चेष्टांतून जसा होतो, तसा तो

नियंत्रित, जाणिवेनें युक्त अशा व्यापारांत होत नाहीं. आणि म्हणून एखादी व्यक्ति तऱ्हेवाईक आहे असें समजतांच मला तिच्याविषयीं भयंकर प्रेमभाव वाटूं लागतो. या देदिप्यमान आत्म्याच्या सूक्ष्म छटा केव्हां एकदां पाहीन असें मला होऊन जातें. कारण एकेकाची ( किंवा एकेकीची ) तऱ्हा कांहीं औरच असते.

# मी आणि तरुण स्त्रिया

या लेखाचा मथळा " तुम्ही आणि तरुण स्त्रिया " असाहि ठेवतां आला असता. कारण स्त्रियांविषयींच्या भावना सामान्यपणें सर्व रसिक आणि समंजस पुरुषांच्या सारख्याच असण्याचा संभव आहे. असें असूनही माझ्या कांहीं सोंवळ्या वाचकांचीं मनें दुखविलीं जाऊं नयेत, त्यांच्यावर भलत्याच गोष्टींचा आरोप केल्यासारखें होऊं नये, म्हणून या लेखाचा " मी आणि तरुण स्त्रिया " असा सोयीस्कर मथळा दिला आहे.

आमच्या कॉलेजांत मागें एकदा हॉलीवूडहून आलेल्या एका नटाचें हॉलीवूडविषयीं व्याख्यान झालें

असतांना, पहिलीं दहा मिनिटें त्यानें नुसतें हॉलीवूड ! हॉलीवूड ! हॉलीवूड ! असे स्टेजच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे जात असतांना साभिनय म्हटलें. आपल्या विषयाची मर्यादा, भव्यता, आकर्षकता किती मोठी आहे, हें दाखविण्याकरितां त्यानें या युक्तीचा अवलंब केला होता. तरुण स्त्रियांविषयीं लिहीत असतांना मलाहि तरुण स्त्रिया ! तरुण स्त्रिया ! असें सुरवातीला लिहावेसें वाटतें.

कांहीं वर्षांपूर्वीं एका ब्रह्मचाऱ्यानें स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील एक धोंड होय असे गंभीरपणें आणि हताशपणें जाहीर केलें होतें. बिचारा ब्रह्मचारी ! या बाबतींत विचार करतांना मला दोन कल्पना सुचतात. स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील धोंड नसून ती एक सुंदर नदी आहे. जिच्या निर्मळ प्रवाहाकडे पाहून पुरुषाला पोहावेसें वाटतें, विहार करावासा वाटतो, जिच्या कांठावर त्याला संसार थाटावासा वाटतो. जिच्या तीरावरील फुलांनीं आणि फळांनीं त्याच्या चित्तवृत्ति थरारून जातात-अशी ती एक सुंदर नदी आहे.

दुसरी कल्पना कांहींशी गद्य आहे. ती कविमनाच्या मंडळींना आवडणार नाहीं. परंतु मला ती मनापासून आवडते. स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील धोंड नसून ती एक धर्मशाळा किंवा सराई आहे. आयुष्याच्या खडतर मार्गानें जात असतांना थकलेल्या जीवांना विसांवा देऊन उत्साही

बनविणारी स्त्री ही एक धर्मशाळा आहे. हिंदुविवाह पद्धती-प्रमाणें स्त्रीचें तिच्या पतीला दान केलें जातें. याच्याहि बुडाशीं कदाचित् धर्मशाळा बांधून देण्याचीच कल्पना असावी. या धर्मशाळेचें रूपांतर घरांत, महालांत, झोंपडींत अगर उकिरड्यांत करणें हें ज्या त्या पुरुषाच्या स्वभावावर, शक्तीवर, परिस्थितीवर अवलंबून आहे. या धर्मशाळांना भुलून त्यांत कायमचाच जेठा मारून बसलेल्यांचीं उदाहरणें म्हणजें तुमच्या माझ्यासारख्या संसारी लोकांचीं होत.

स्त्रियांचे चार पांच प्रकार संभवतात. पहिला प्रकार हरिणींचा. या वर्गांतील तरुण स्त्रिया पुरुष पाहिला न पाहिला कीं लाजतात, मुरकतात, बिचकतात. हरिणी पारध्याला पाहून प्रथम पळून जातात, आणि मग कान टवकारून आणि डोळे वटारून दुरून त्याच्याकडे बघत राहतात. तीच अवस्था ह्या हीरणींसारख्या तरुणींची असते. लाजणें, घाबरणें, मुरकणें–हाच त्यांचा स्वभावधर्म. लाजत लाजत दुरून त्या पुरुषाची परीक्षा करतील, आणि मग, मग हळुहळू त्याच्याकडून आंजारून गोंजारूनहि घेतील.

दुसरा प्रकार नंदिनींचा. अगदीं गाईसारखा सरळ, गरीब, निष्कपटी स्वभाव असतो यांचा. मनांत असेल तें भावडेपणानें बोलून दाखविणें, त्याप्रमाणें आचरण करणें, दुसऱ्यावर विश्वास टाकणें, पुढचामागचा विचार न करणें –हीं त्यांच्या स्वभावांतील वैशिष्ट्यें होत. अर्थात् पुष्कळ

वेळां असल्या स्त्रियांवर फसण्याचाहि प्रसंग येतो. पण त्यांना त्याची फिकीर वाटत नाहीं. माझ्या माहितींत असल्या पुष्कळच युवती आहेत. त्यांच्या सरळ, बालसदृश, निष्कपटी, प्रेमळ स्वभावाचें आकर्षण मला कधींहि झिड-कारतां आलेलें नाहीं. त्यांच्याशीं बोलत असतांना मी पुरुषमित्रांशीं बोलत आहे, असें मला वाटतें. इतकी निःसंकोचवृत्ति त्यांची असते कीं, कोणत्याहि विषयावर त्या प्रामाणिकपणें आपले विचार प्रगट करूं शकतात. माझ्या आयुष्यांत मला जे निर्मळ, निर्भेळ, आनंदाचे क्षण लाभले आहेत त्यांत असल्या स्त्रियांबरोबर केलेल्या संवादांना मी अग्रस्थान देऊं इच्छितों.

तिसरा प्रकार तरंगिणींचा. नदी ज्याप्रमाणें वळणावळणानें वहात जाते; वहात असतांना प्रत्येक वळणावर हजारों तरंग तिच्यावर उधळतात, कुठें संथपणें वहा तर कुठें धांवत जा; कुठें एखाद्या खडकाला वळसा घाल तर कुठें गवताशीं गुजगोष्टी कर; त्याप्रमाणें या स्त्रियांची स्थिति असते. घटकेंत त्या हंसतील तर घटकेंत गंभीर बनतील. मध्येंच तुमच्याशीं प्रेमळपणानें एखादी खोडी करतील, तर लगेच फुरंगटून दोन हात दूर जाऊन बसतील. पुनः कांहीं तरी आठवून खडखडाट हंसत राहतील. नदीप्रमाणें एखादे वेळीं त्यांच्या प्रेमाला पूर येईल. दुसऱ्या वेळीं त्या कोरड्या ठणठणीत आढळ-

तील. असल्या स्त्रियांच्या सहवासांत येणें म्हणजे ती एक मोठी मौजच आहे. ज्यांना आपल्या आयुष्यांतील आनंद टिकवावयाचा असेल त्यांनीं असल्या तरुणींची अवश्य मैत्री संपादन करावी असें मी म्हणेन.

चवथा प्रकार मानिनींचा. हें मोठें बिकट प्रकरण असतें. त्यांच्याशीं गोड बोलून, त्यांना चुचकारून, 'तुम्ही शहाण्या आम्ही वेडे' असें बोलून. मोठा जपून व्यवहार केल्यास सर्व ठीक असतें. नाहींतर प्रकरण बिथरलें म्हणून समजावें. अगदीं बेपर्वाईनें, बेगुमानपणें वागणाऱ्या जर कोणी स्त्रिया असतील तर त्या असल्या मानिनी. लोकांनीं आपणाला मुजरे करावेत, आपल्या समोर प्रीतीचे नजराणे धरावेत, असें त्यांना वाटत असतें. स्वाभिमानी पुरुषांना हें जमणें शक्य नसतें. पण एखादे वेळीं जर जमलें तर मात्र मानिनी त्यांच्यावर मनसोक्त प्रेम करतात.

पांचवा प्रकार नागिणींचा. ज्यांना मरण्यांत मौज वाटते, अशा कवींखेरीज आपल्या शत्रूचाहि संबंध येऊं नये असल्या तरुण स्त्रियांशीं. कोलरिज कवीनें क्रिस्टाबेल या नांवाच्या काव्यांत असल्या एका नागिणीचा उल्लेख केला आहे. आपल्या निरुपम रूपानें, आणि त्याहिपेक्षां भयंकर अशा लाघवीपणानें त्यांनीं एकदां तुमचा चावा घेतला कीं तुम्ही खलास झालांत म्हणून समजावें. पुरुषांची शिकार करणें, त्यांना मारून टाकणें, त्यांना

गुलाम बनविणें, हेंच ध्येय असल्या स्त्रियांचें असतें. ज्यांच्याकडे मी आशेनें बघत होतों, असे कितीतरी तरुण असल्या नागिणींना बळी पडलेले मी पाहिले आहेत. अर्थात् असल्या नागिणींपासून मी सदैव दूर रहात आलों आहे. कारण मरण्यांत मौज मानणारा मी नसून जगण्यांत मौज मानणारा आहे.

मी स्त्रियांचे पांच प्रकार कल्पिले. आणखी एकाद्याला वेगळ्या तऱ्हेनें वर्गीकरण करतां येणें शक्य आहे. देवाजीच्या रम्य जगांतील तरुण स्त्री ही एक अशी अजब चीज आहे कीं, जिनें आजपर्यंत तरुणांना आणि वृद्धांना सारख्याच रीतीनें आकर्षिलें आहे. कवींच्या वाणीला आणि कलावंताच्या कुंचल्याला जर कुठें अपूर्णतेचें असमाधान वाटत असेल तर तें तरुण स्त्रियांच्या वर्णनांत किंवा आलेखनांत. आकाशांतील विजेचें संपूर्ण आकलन होणें हें जितकें कठिण, तितकेंच तरुण स्त्रियांचें संपूर्ण ज्ञान किंवा सम्यक् ज्ञान होणेंही कठिणच असतें. आणि म्हणून तर त्यांच्याविषयीं लिहिण्यांत एक प्रकारचा अतृप्तीचा आनंद वाटतो.

तरुण स्त्रियांचें पुरुषांना जें आकर्षण वाटते तें त्यांच्या रूपामुळें कीं स्वभावामुळें कीं मोहक हावभावांमुळें? मला वाटतें स्त्रियांच्या ठिकाणीं असलेल्या ललित विभ्रमांच्यामुळें त्या इतक्या मोहक वाटत असाव्यात. केवळ

सौंदर्याची जादू फार वेळ टिकणारी नसते. उलट ललित विभ्रमांचें सौंदर्य अवीट असते. कुठल्याशा कवीनें 'सुंदरा गमेना ती बाला, दावीना मजला जी प्रेमलीला' असें जें म्हटले आहे तें योग्यच आहे. युवतींच्या सौंदर्यापेक्षा त्यांच्या लीलांनींच रसिकांचें मन त्यांच्याकडे अधिक आकर्षिलें जातें. जगांतील विलोभनीय आणि सुंदर वस्तूंची कोणी मला यादी करावयास सांगितल्यास त्या यादीच्या अग्रभागीं 'युवती आणि त्यांच्या लीला' असें मी लिहीन.

# मी आणि वृद्ध स्त्रिया

मनुष्याला मनसोक्त आणि निःशंकपणें जर कुणावर प्रेम करतां येत असेल तर तें वृद्ध स्त्रियांवर ! कुमारिकांकडे बघण्यांत कोणत्याहि प्रकारचा दोष नाहीं असें कालि-दासानें जरी सांगितलें असलें, तरी सारखी टक लावून त्यांच्याकडे बघणें हें दोषार्हच ठरेल. शिवाय तुम्ही जर विवाहित असाल आणि तुमची पत्नी जर तुमच्याजवळ असेल तर तुम्हांला ती कदाचित् फार वेळ कुमारिकांकडे बघूंहि देणार नाहीं. तिला तुमच्याविषयीं शंका आणि त्या कुमारिकांविषयीं मत्सर वाटूं लागेल.

वृद्ध स्त्रियांच्या बाबतींत ही भीति बाळगायला नको. तुम्ही त्यांच्याकडे टक लावून बघितलेंत तरी तुमच्या

पत्नीच्या तोंडून चकार शब्दहि निघण्याचा संभव नाहीं. शिवाय इतर लोकांनाहि कांहीं वाटत नाहीं. एखादी स्त्री तरुण असेल तर तिच्यावर आपलें प्रेम असूनहि त्याची वाच्यता आपणाला करतां येत नाहीं. फार झालें तर अमुक तरुणी मला आवडते, एवढेंच आपणाला म्हणतां येतें. वृद्ध स्त्रियांच्या बाबतींत हा चोंकसपणा नाहीं दाखविला तरी चालतो. वृद्ध स्त्रियांवर मनसोक्त नि निःशंक प्रेम करतां येतें, हें जें मी वर सांगितलें तें या सर्व अर्थानें.

मला स्वतःला लहान मुलांच्या खालोखाल वृद्ध स्त्रिया आवडतात. कांहीं कांहीं वृद्ध स्त्रियांवर मी मनापासून प्रेम करीत आलों आहे. आणि मौज अशी कीं, याबद्दल मला आजपर्यंत पश्चात्ताप करण्याची पाळी आलेली नाहीं.

किती प्रेमळ असतात वृद्ध स्त्रिया! आपल्याहून चिमण्या अशा जगावर त्यांचें मनापासून प्रेम असतें. आपल्या प्रेमाची पांखर घालायला त्या सदैव तयार असतात. प्रेमाच्या बाबतींत असा एक नियमच दिसतो कीं, आपणाहून लहान असलेल्यांवर आपणाला स्वभावतःच प्रेम करावेसें वाटतें. दोन मोठाले कुत्रे जवळ आले तर भांडतील. दोन बैल जवळ आले तर टकरा देतील. परंतु त्याच कुत्र्यांजवळ एखादें लहान बच्चें आल्यास ते त्याला

चाटतील; बैलांजवळ बछडा आल्यास ते त्याला आपल्या रीतीनें गोंजारतील. वृद्ध स्त्रियांना सर्वांविषयीं प्रेम वाटतें तें याचमुळें होय.

या प्रेमामुळें त्या सेवा करतात ती तरी किती मनापासून आणि मोठी असते ! सर्वांच्या खस्ता खाण्याचें जें वृद्ध स्त्रियांच्या नशिबीं येतें, तें त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळेंच. घरांत कोणी आजारी असूं द्या, म्हातारा जीव लगबगीनें त्याच्या बिछान्याजवळ जाईल आणि सेवा करूं लागेल. घरांत लहान मुलें रडूं द्या, वृद्ध स्त्रियांनीं त्यांना उचलून घेतलेंच म्हणून समजा. भल्या पहाटेपासून तें अगदीं रात्रीपर्यंत जर कोणी घरांत काम करीत असेल तर त्या वृद्ध स्त्रिया. आणि गंमत अशी कीं तुम्ही त्यांना काम करण्याविषयीं प्रतिबंध केला तर तें त्यांना मुळींच रुचावयाचें नाहीं. त्या उलट रागावून बसतील. आपलें काम तुम्हांला पसंत नाहीं, असा भलताच तर्क त्या काढतील ! माझ्या माहितींत अशा वृद्ध स्त्रिया पुष्कळ आहेत कीं, ज्यांना आपण विश्रांती घेण्याविषयीं सांगितलें असतांना त्या रुसून बसतात, उपाशी राहतात ! आपण निरुपयोगी राहूं नये, असें त्यांना वाटतें.

मला वाटतें याच्या बुडाशीं त्यांचा स्वाभिमानहि असावा. आपण फुकट बसून खाऊं नये, चार कामधंदे करून मगच पोटांत गोळा घालावा, असेंहि पुष्कळ वृद्ध

स्त्रियांना वाटतें. त्यांचीं हाडें तापट असतात म्हणून म्हणा किंवा त्यांचा हट्टी स्वभाव असतो म्हणून म्हणा, बहुतेक वृद्ध स्त्रिया स्वतःची भाकरी स्वतः कमवून खातात. खायला काळ आणि भूईला भार, अशा अवस्थेंत फारच थोड्या वृद्ध स्त्रिया आढळतील. माझी एक आत्या होती. तिनें फुकट बसून कधींहि अन्न खाल्लें नाहीं. मोठ्या पहाटे ती उठे आणि तेव्हांपासून ती जें काम करी तें रात्रीं बिछान्यावर अंग टाकीपर्यंत! आम्ही तिला कधींहि रिकामी बसलेली पाहिली नाहीं. जेव्हां घरांतले इतर काम संपे तेव्हां ती चातीवर सूत काढीत बसे!

वृद्ध स्त्रिया भारी बोलक्या असतात. जेव्हां मला कांहीं काम नसतें किंवा करमत नाहीं तेव्हां मी एखादी वृद्ध स्त्री गांठून तिच्याजवळ गप्पा मारीत बसतों. वेळ कुठें जातो आहे, याचा अशावेळीं पत्ताहि मला लागत नाहीं. असल्या गप्पागोष्टींच्या प्रसंगीं बहुधा मागचा इतिहासच निघावयाचा हें ठरलेलें. हल्लींच्या पिढीवर आणि विशेषतः शिकलेल्या पोरींवर टीका करीत मागच्या हकि-कती सांगायला वृद्ध स्त्रियांनीं सुरवात केली कीं मी मनाशीं खूणगांठ बांधतों, आतां दोन तास मजेंत जाणार. भूत-कालाच्या पोतडींतून एक एक वस्तू काढून ती त्या अशा रीतीनें रंगवितात कीं, जणूं काय वर्तमानकालीन घटनाच आपण अनुभवीत आहोंत. काळाची हिकमत सर्वांवर

चालते. परंतु वृद्ध स्त्रियांच्या स्मृतिवर ती कांहीं चालत नाहीं. जितकी घटना जुनी तितकी तिची स्मृति अधिक इत्थंभूत आणि ताजी. वृद्ध स्त्रिया म्हणजे चालते बोलते इतिहासच होत असें म्हटलें असतांना चालेल. "ज्यावेळीं चिंगीला मैना झाली, त्यावेळीं शेजारच्या रखमाबाईंना डोहाळजेवणाला बोलावण्यांत आलें होतें, कार्यांत कार्य म्हणून आईनें तिच्या वन्संच्या वन्संना केळवणालाहि बोलाविलें होतें." अशा तऱ्हेनें एकदा सांगावयाला सुरवात झाली कीं त्यांत सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा अनेक गोष्टींवर धांवती टीका ही व्हावयाची.' आणि प्रत्येक वेळीं 'अशा एकेक मागच्या गोष्टी आहेत. कुठवर सांगणार ? त्यावेळचीं माणसें प्रेमळ नि अगत्याचीं', हें पालुपद असावयाचेंच. आपण जर असल्या गोष्टी अद्याप ऐकल्या नसतील तर जरूर एकाद्या वृद्ध स्त्रीची ओळख करून त्या ऐका. तुम्हांला एक वेगळीच दृष्टी लाभल्यासारखें वाटेल. आपल्या बोलण्याचा तुम्हांला त्या कधींच कंटाळा येऊं द्यावयाच्या नाहींत. तुमची नाडी पाहून त्या बोलतील. तुम्हांला पोरीबाळींसंबंधानें बोललेलें आवडतें, असें ओळखून अशा त्या एकेक गोष्टी सांगतील कीं तुम्हीं अगदीं चकितच व्हाल. तशा त्या मिस्किलच असतात म्हणाना. अगदीं अगदीं लबाड असतात.

तुमचे प्रेमाचे खेळ त्यांना समजत नसतील अशा

घेतानें तुम्ही ते खेळत राहिलांत तरी ते त्या जाणल्या वांचून रहावयाच्या नाहींत. अशा खट्याळ नजरेनें तुमच्या-कडे अशा वेळीं त्या बघतील कीं तुम्ही आपला पराजय कबूल केलाच पाहिजे. पण एकंदां तुम्ही त्यांना आपल्या विश्वासांत घेतलेत कीं तुम्हांला त्या सर्व प्रकारची मदत करतील; आणि याचें कारण उघडच आहे. प्रेमाचे खेळ खेळण्याचे जरी त्यांचे दिवस संपले असले तरी तसले खेळ बघण्याची त्यांना भारी हौस असते. तसले खेळ बघत असतांना साहाजिकच त्यांच्या स्वतःच्या बालपणच्या आणि तरुणपणच्या स्मृति जागृत होऊन त्यांना आनंद होत असतो. कोणाच्याहि लग्नांतील सोहाळे बघण्यांत वृद्ध स्त्रियांना आनंद होतो तो याच कारणामुळें. तुमच्या आनंदांत सहभागी होणाऱ्या असल्या वृद्ध स्त्रियांचे तुम्हांला आशीर्वाद मिळाले तर ते सोन्याहूनहि मोलाचे होत असें खुशाल समजावें. निदान मी तरी ते पुण्यप्रद मानतों.

वर दिलेल्या कारणांहून ज्या एका कारणामुळें वृद्ध स्त्रिया मला विलोभनीय वाटतात तें कारण म्हणजे त्यांना पाहून तरुणपणीं त्या कशा दिसत असतील या विषयींचीं माझ्या मनांत उत्पन्न होणारीं चित्रें हें होय. अंगावर सुरकुत्या पडलेल्या, चामडी लोंबळकत असलेल्या, तोंडाचें बोळकें झालेल्या, केस पांढरे बनलेल्या आणि पाठींत वांक आलेल्या, एखाद्या वृद्ध स्त्रीला जेव्हां जेव्हां मीं पहातों

तेव्हां तेव्हां माझ्या मनांत तावडतोड हा विचार येतो कीं तरुणपणीं हा जीव किती गुलजार दिसत असेल! किती युवकांचे डोळे यानें आपल्या सुंदर अवयवांकडे ओढून घेतले असतील! किती कामीजनांना यानें वेड लाविलें असेल! यक्षिणीच्या कांडीप्रमाणें अशा वेळीं त्या वृद्ध स्त्रींत एकदम बदल पडलेला मला दिसतो. मला ती सुंदर भासूं लागते आणि तिच्याशीं दोन शब्द बोलण्याचा मोह मला आवरतां येत नाहीं. प्रत्येक वृद्ध स्त्रीच्या ठिकाणीं तारुण्याचा, सौंदर्याचा, मोहकतेचा हा जो ध्वनि असतो त्या मुळें तर त्या निरंतर आकर्षक वाटूं लागतात. बकुळीच्या फुलांची माळ सुकली तरी तिचा सुगंध नाहींसा होत नाहीं. इतकेंच नाहीं तर त्या सुगंधानें त्या फुलांच्या ताजेपणींची अवस्था आठवण करून दिली जाते, तद्वतच एखाद्या वृद्ध स्त्रीची जराजर्जर मूर्ति ध्वनिरूपानें फुललेल्या बागशाहीची आठवण करून देते. आपल्या नवयौवनाच्या दिमाखानें जगाला दिपवीत फिरणाऱ्या तरुणीला दुथडी भरून वाहणाऱ्या पावसाळ्यांतील नदीची उपमा दिल्यास, वृद्ध स्त्रीला उन्हाळ्यानें जिचा प्रवाह सुकला आहे अशा नदीची उपमा द्यावी लागेल. उन्हाळ्यानंतर पुनः पावसाळा सुरू होतो. नदीच्या सुकलेल्या पात्रांत नवजीवन वाहूं लागतें. कांहीं कांहीं वृद्ध स्त्रियांच्या बाबतींत असला पावसाळा येऊन पुन: त्या टवटवींत झालेल्या मी पाहिल्या

आहेत. म्हातारपणीं लग्न करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतींत ही घटना हटकून पहावयास सांपडते. अर्थात् हीं उदाहरणें अपवादादाखल होत हें तर खरेंच.

उंबऱ्या पलीकडे उभा राहून ज्यांना मृत्यु खुणावतो आहे अशा वृद्ध स्त्रियांकडे पाहिलें कीं माझें मन व्याकुळ होतें. इतक्या प्रेमळ, इतक्या सेवातत्पर, इतक्या गोष्टीवेल्हाळ, इतक्या लबाड जीवाला काळ आतां नेणार या भावनेनें मला पराकाष्टेचें दुःख होतें. परंतु वृद्ध स्त्रिया मात्र मृत्यूलाहि आनंदानें भेटायला तत्पर असलेल्या पाहून त्यांच्याविषयीं माझा आदर दुणावतो, दुःख थोडेंसें हलकें होतें. घरांतील आप्तेष्टांचा निरोप घेत, मृत्यूच्या हातांत आपला हात देणाऱ्या वृद्ध स्त्रिया मी पाहिल्या आहेत. आणि त्या वेळीं 'धन्य ह्या वृद्ध स्त्रिया' असा एकच उद्गार माझ्या तोंडून निघाला आहे.

जगांत जीं कांहीं थोडीं पूर्ण खात्रीचीं, पूर्ण निस्वार्थी पूर्ण प्रेमळ अशीं विश्रांतीस्थानें आहेत त्यांत वृद्ध स्त्रियांची (ज्यांना आपण पुष्कळ वेळां म्हाताऱ्या किंवा डोकऱ्या असें म्हणतों) मी प्रामुख्यानें गणना करतों.

# मी आणि लहान मुलें

लहान मुलांचा कंटाळा येऊन कित्येक वेळां मी असें म्हणतों, पंचवीस मोठी माणसें पत्करतात पण पांच लहान मुलें पत्करत नाहींत ! लहान मुलें रडतात किंवा त्रास देतात त्यावेळीं चिडून 'काय कार्ट्यांचा त्रास आहे' असे माझ्या तोंडून उद्गारहि निघतात. पण ते तेवढ्या-पुरतेच खरे समजावयाचे. कारण पंचवीस मोठी माणसें जमून जी शोभा येत नाहीं ती पांच लहान मुलें जमलीं असतां येते. लहान मुलांचा त्रास असतो हें खरें आहे. पण त्याच्याच बरोबर त्यांच्यापासून आनंदहि किती तरी होतो. त्यांचे कष्ट आपणाला सहन करावे लागतात हें खरें; पण त्याच्याच जोडीला त्यांचें आपणावर निर्व्याज

प्रेम असते. त्यांच्याप्रीत्यर्थ कितीतरी झीज आपणाला सोसावी लागते. पण त्याचबरोबर कितीतरी योग्य आशांचें संवर्धनहि आपणाला करतां येतें. त्यांना मोठे करण्याची जिकीरीची जबाबदारी आपणावर असते. पण त्या जबाबदारींतहि कितीतरी आनंद असतो, नाहीं का ? ज्यांच्यावर अशी जबाबदारी पडलेली नाहीं, त्यांना जाऊन विचारा म्हणजे कळेल कीं, असल्या जबाबदारीकरितां ते किती तळमळत असतात. आपण बी लावावें, त्याचें रोपटें तयार व्हावें. त्याची मशागत आपण करावी, आणि पुढें त्याचा सुंदर वृक्ष व्हावा अशी बागवानाची इच्छा असते. त्याचप्रमाणें आपण कोणाला तरी मोठे करावें. त्याची काळजी वहावी, त्याचें संगोपन करावें, अशीहि स्वाभाविक इच्छा मनुष्यमात्राची असते. ज्यांची ही इच्छा परिपूर्ण झाली आहे ते धन्य होत. ज्यांची झाली नसेल ते दत्तक घेऊन, किंवा दुसऱ्या कोणाचें तरी मूल आपल्या जवळ ठेवून आणि त्याला मोठें करून आपली इच्छा पूर्ण करून घेतात. लहान मुलें हीं घरांतील रत्नें होत, असे जें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे तें योग्यच आहे.

किती विचित्र असतात लहान मुलें ! आतां एक वस्तु मागतील तर क्षणभरानें दुसरी मागतील ! वस्तु मिळेपर्यंत तिच्याकरितां हट्ट धरतील, भांडतील, रागावतील, रडतील ! आणि मिळाली कीं पांच मिनिटें तिच्याशीं

खेळून वा तिचा परिचय करून घेऊन जीं टाकून देतील तीं पुनः लहर येईपर्यंत ! बरें वस्तूंच्या बाबतींत समानदृष्टि अशी कीं, दिडकीच्या फुग्या करितां जेवढें रडूं येईल, तेवढेंच रुपया किंमतीच्या वाळा करितां येईल. आणि तेवढेंच रडूं आई दिसेनाशीं झाल्यास तिच्याकरितां येईल ! आमच्या दारावरून सिनेमा किंवा नाटकाच्या जाहिराती वाटणारी गाडी ज्यावेळीं जाते त्यावेळीं या चिमण्या जगाची धांदल बघावी. बँडचा आवाज ऐकूं येतांच घरांतून बाहेर यावयाचें आणि जाहिरात हातीं पडेपर्यंत गाडीच्या मागें धांवत–पडत–ठेंचाळत जावयाचें ! इतकें करून जाहिरात मिळाली तर हर्षाला सीमा नसते. परंतु न मिळाली तर साम्राज्य घालविल्याबद्दल अबिसिनीयाच्या रासतफारीला जेवढें वाईट वाटलें नसेल तेवढें यांना वाटावयाचें ! जाहिरातवाले आवाज करीत कशाला जातात कुणाला ठाऊक ! जाहिराती मुलांना न देऊन त्यांना रडवावयाचीच असलीं तर निदान बँड तरी वाजवूं नये. आणि बँड वाजवावयाचा झाल्यास सढळ हातानें जाहिराती तरी वाटाव्यात. पण माझी खात्री आहे कीं, जरी जाहिरातींची खैरात करण्यांत आली तरी देखील लहान मुलें संतुष्ट व्हावयाचीं नाहींतच. त्या जाहिरातीकरितां आपआपसांत कौरव-पांडवांच्या युद्धासारखीं निकराचीं युद्धें तीं करतील. करतील काय, करतातच; असें आपण मनांत म्हणत

असाल आणि तें खरें आहे. दिडदमडीच्या कागदाकरितां भांडणाऱ्या या मुलांना तुम्हीं विचित्र नाहीं तर काय म्हणाल !

पण हीं विचित्र मुलेंच मनुष्याच्या संसारांतील आनंद वाढवीत असतात. लहान मुलांच्या ठिकाणचीं सर्वांत अधिक अशी कोणती गोष्ट तुम्हांला आवडते, असें कोणी मला विचारल्यास, लहान मुलांचें रागावणें, असें तावडतोब मी त्याचें उत्तर देईन. किती गंमतीचें असतें त्यांचें रागावणें ! राग आला कीं, हातांतील हवी असलेली वस्तूहि फेंकून देणें, आपण समजूत घालीत असतांना दूर दूर पळून जाणें, आपण थोडेसें दुर्लक्ष करतांच पुन: जवळ येऊन ओठ बाहेर काढून इतराजी दर्शविणें, आपण जवळ जातांच चिमुकल्या हातांनीं आपणाला मारण्याचा प्रयत्न करणें, आणि इतक्यांत बाहेर माकडाचा हुप्हुप् असा आवाज किंवा मांजराचें म्याऊं म्याऊं असें ऐकूं येतांच रागाचा पारा पार नाहींसा होऊन उड्या मारीत जाणें, ही रागाची तऱ्हा पाहिली कीं सकौतुक आनंद वाटतो. लहान मुलें रागावलीं कीं फार फार छान दिसतात. त्यांचे ओठ, त्यांचे तोंड—या वेळीं अगदीं बघण्याजोगीं होतात. पण हें रागावणें देखील फार वेळ टिकत नसल्यानें, तीं रागावतांच आपण लक्षपूर्वक त्यांच्या हालचालीकडे बघावें. कारण संध्याकाळच्या आकाशांतील रंगच्छटा

या जशा क्षणजीवी असतात, तशाच बालकांच्या रागाच्या छटाहि अल्पकाळच टिकणाऱ्या असतात.

तीच तऱ्हा त्यांच्या हट्टाची. असला चमत्कारिक हट्ट घेऊन बसतील कीं तुम्ही सर्दच व्हाल. आकाशांतील चांदोबाचा हट्ट धरून कौसल्या–दशरथ यांना रामचंद्रानें जसें जेरीस आणलें, तसेंच कांहीं भलतेंच मागून लहान मुलें आपणाला रडकुंडीस एखादे वेळीं आणतात. एका लहान मुलानें आपल्या पित्याला एक लहान बोळकें आणावयास सांगतांच त्यानें तें तावडतोब आणलें. लगेच मुलानें एक मोठा लाकडी घोडा मागितला. बापानें तावडतोब घोडाहि आणून दिला. तेव्हां मुलानें हट्ट धरला, या बोळक्यांत हा घोडा घालून द्या ! बिचाऱ्या बापाची काय स्थिती झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. भारी विचित्र असतात लहान मुलांचे हट्ट. म्हणाच आहे बालहट्ट, स्त्रीहट्ट, आणि राजहट्ट हे पुरविणें कठीण असतात. पण मौज अशी कीं, ते पुरविण्याचा आपण मनापासून प्रयत्न करतो. लोकशाहीच्या सध्याच्या युगांत राजहट्टाची जागा लोकाग्रणी–हट्टानें घेतली आहे येवढेंच. हिटलर–मुसोलिनी–गांधी यांचे हट्ट आपण पुरवितोंच ना ? स्त्रीहट्ट पुरविणें यांत तर प्रत्येकाला एक प्रकारची धन्यता वाटत असते ! त्यामानानें पाहिलें असतां बालहट्ट हे विशुद्ध तरी असतात. आणि म्हणूनच ते पुरावितांना आपणाला कांहीं विशेष वाटत नाहीं.

लहान मुलांचें प्रेमहि असेंच मोठें विलक्षण असतें. ज्या आईबापांवर तीं क्षणापूर्वी रागावलेलीं असतात त्यांच्यावांचून क्षणानंतर त्यांचें चालेनासें होतें ! अगदीं मनापासून आणि मनसोक्त प्रेम करतात लहान मुलें. तुमच्याजवळ येणें, तुम्हांला मिठी मारणें, तुमचा मुका घेणें, तुमच्या अंगावर चढणें, तुम्हांला पाहिल्याबरोबर नाचूं लागणें इत्यादि प्रकारांनीं आपलें प्रेम तीं दर्शवितात. शिवाय तुमच्याविषयीं कळकळ व काळजी देखील त्यांच्या मनांत किती असते. तुम्ही आजारी असलांत किंवा तुम्हांला बरें वाटत नसलें तर तीं तुमच्याजवळ येतील, तुम्हांला काय होतें म्हणून विचारतील, तुमचें डोकें चेपून देतील, तुम्हांला आजारी पाहून अगदीं बेचैन होतील तीं.

रागावण्याच्या खालोखाल मला लहान मुलांचें लाडावणें आवडतें. तीं लाडावलीं म्हणजे आवाज काय वेडेवांकडे काढतील, नाचतील काय विचित्र, तुम्हांला येऊन त्रास काय देतील, चिमटे काय घेतील, आणखी काय काय करतील याचा कांहीं नेम नाहीं. अस्वलाच्या गुदगुल्यासारखें असतें त्यांचें लाडावणें. त्याच्यापासून बरेंहि वाटतें आणि त्रासहि होतो.

आणि त्यांचें हास्य. साऱ्या विश्वाची जादू त्यांच्या हंसण्यांत भरलेली असते. काळ्या ढगाआडून चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें कौटुंबिक अडचणींच्या वेळीं बालकांचें

हास्य प्रकाशत असतें. फुलांची टवटवी, दंवबिंदूंचा नाजुकपणा, मेघोदकाची विशुद्धता आणि निर्मळ आकाशाची प्रसन्नता हीं सर्व बालकांच्या हास्यांत सामावलेलीं असतात. तुम्हांला परिस्थितीची भीषणता विसरावयाची असेल तर लहान मुलांना खेळवा. क्षणांत तुम्हांला तीं खऱ्याखुऱ्या नंदनवनांत नेऊन सोडतील. आपल्या अकृत्रिम स्नेहानें आणि आनंददायक हास्यानें तीं तुमचें दुःख केव्हांच हलकें करतील.

शेवटीं उरलें त्यांचें अमोल अज्ञान ! आपण त्यांना ज्ञानी करण्याचा प्रयत्न करतों, आणि तींहि हळूहळू चौकसपणानें ज्ञानी होत जातात. परंतु त्यांचें तें अज्ञान किती चांगलें असतें. या अज्ञानामुळेंच त्यांना कसलीहि भीति वाटत नाहीं, कुठेंहि जायला तीं रडत नाहींत. जितक्या उल्हासानें तीं फुलें हातीं धरतील, तितक्याच उल्हासानें मुंगळे धरायला धांवतील ! आणि मुंगळे चावतील याची पर्वाही तीं कधीं करणार नाहींत ! ईश्वराच्या या जगांत सर्वच गोष्टी सारख्याच आहेत, असें त्यांना वाटत असल्यास नकळे. घाण, किळस, सरस–नीरस हें सर्व आपणाला. त्यांना त्याचें कांहींहि नसतें.

कित्येक योगीपुरुषांची बालवृत्ती असते म्हणतात. अशी वृत्ति अंगीं बाणल्यावांचून जगाचें सम्यक्‌ज्ञान होणें शक्य नाहीं. जगाशीं समरस झाल्यावांचून जगाचें कोडें

उलगडणार तरी कसे ? अर्थात् या दृष्टीनें बालवृत्ति मिळविण्याचा योगीजनांचा प्रयत्न असल्यास तो निःसंशय अभिनंदनीय आहे.

जगांत कांहीं खरोखर नाहींसें होतच नाहीं, जग होतें तसेंच आहे किंवा आहे तसेंच पुढें राहणार, अशा प्रकारची समजूत लहान मुलांची असते कीं काय ? त्यांच्या त्या बहुमोल अज्ञानदशेंत त्यांना धड बोलतां येत नाहीं किंवा धड समजावून सांगतां येत नाहीं. परंतु तसें करतां येतें तर तत्त्वज्ञानाची परिसीमा आपणाला त्यांच्याकडून खात्रीनें समजली असती. वर्डस्वर्थ कवीच्या “ आम्ही सात जण ” या कवितेंतील छोटी पोरगी किती विश्वासानें सांगत असते, ‘ आम्ही सर्व आहोंतच. जरा दुरावलों आहोंत येवढेंच. ’ आपल्या घरांत कोणाचा मृत्यु झाला कीं लहान मुलांची काय समजूत झालेली असते ती बघा. मृत्यु ही घटना त्यांना पटतच नाहीं. मेलेला इसम कुठें तरी गेला आहे–मग तो आकाशांत जावो किंवा देवबाप्पाकडे जावो–अशी त्यांची खात्री असते. अजिबात–समूळ–कांहीं नाहींसें झालें, असें त्यांना वाटतच नाहीं.

आणि हेंच खरें नाहीं का ? आपण कुठेंतरी जातच असतों. कुठें तें आपणांला माहीत नसतें इतकेंच. क्षणापूर्वी हालचाल करणारे आपण कुठेंतरी निघून जातों

झालें. आपला आत्मा या देहरूपी बागशाहीला कंटाळून जातो झालें कुठल्या तरी दुसऱ्या उपवनांत हिंडायला. लहान मुलांना हें माहित असावें. कारण नुकतींच तींहि अशाच एकाद्या बागेला कंटाळून आपल्याकडे आलेलीं असतात. पण तीं कसलीं वस्ताद. आपण विचारलें तर मुळींच थांग लागूं द्यावयाचीं नाहींत. भारी भारी विचित्र असतात लहान मुलें !

# मी आणि मुंबई

मधून मधून मुंबईत येऊन राहायला मला मनापासून आवडतें. मुंबईत एकांतवासांतील एकलेपणा नाहीं कीं गर्दीचा त्रास नाहीं. गर्दीत असून एकांतवासाचीं सुखें मुंबईसारखीं क्वचित्‌च कुठें अनुभवावयास सांपडत असतील. मनुष्याचा स्वभाव असा विचित्र आहे कीं, त्याला गर्दीहि हवी असते आणि एकांतवासहि हवा असतो. गर्दीत असला कीं त्याला एकटें राहावेसें वाटतें, आणि एकटा असला कीं त्याला गर्दीत मिसळावेसें वाटतें! निदान माझा तरी स्वभाव असा आहे. असल्या स्वभावाला मुंबई फार मानवते.

एक प्रकारचा मोकळेपणा वाटतो मुंबईत. कुणाची आपल्यावर पाळत नाहीं, कुणाला आपली पर्वा नाहीं, कुणाचें आपल्यावांचून अडलें नाहीं, कुणी आपल्याला अडवीत नाहीं. बस, बस ! दिल चाहेल, मन मानेल, त्याप्रमाणें या नगरींत फिरावें. कुठेंहि कोंडवाड्यांत अड-कल्यासारखें आपल्याला वाटत नाहीं. इथें सर्व माणसें स्वतंत्र दिसतात. एक प्रकारच्या बेफिकीरींत तीं हिंडतांना आढळतात. त्यांच्यामागें--दुःख--काळज्या--विवंचना हीं नसतील असें म्हणवत नाहीं. मोठ्या शहरांत या गोष्टी उलट मोठ्याच प्रमाणावर असण्याचा फार संभव आहे. परंतु आपल्या अन्तरींच्या जखमा ते आंतल्या आंत रुजवण्याचा प्रयत्न--यशस्वीपणानें करीत असलेले दिस-तात. लहान गांवांत असल्या जखमांवर टोंचा मारणारेच फार असतात. त्यामुळे त्या भरून यायला वेळ लागतो. इथें तसें कांहीं नाहीं. कुणी तुमची वास्तपुस्तहि करणार नाहीं. आणि हेंच पुष्कळवेळां हवें असतें. केळीचें साल पायाखालीं येऊन पडणाऱ्या मनुष्याला कोणी आपल्याकडे बघत नसलें तर बरें वाटतें ! आपली फजिती दुसऱ्यानें बघूं नये, असें त्याला वाटतें. स्वतःचें दुःख तो स्वतःच सहन करायला अशानें अधिक समर्थ बनतो.

फाजील चौकशी या शहरांत कोणी कोणाची करीत नाहीं. तुमचें नांव काय, गांव कोणतें, धंदा काय,

पगार काय, असल्या चांभार चौकशी करायला इथें कोणालाच फुरसत नसते. मी ज्या खाणावळींत जेवायला जात असतो तिथें कोणी देखील असला त्रास मला देत नाहीं. किती बरें वाटतें मला त्यामुळें! इतर ठिकाणीं हें सुख नाहीं. मनुष्याचें मन हें लज्जावतीच्या रोपासारखें आहे. फाजील चौकशीचे हात लागले कीं त्याचीं पानें मिटूं लागतात. गर्दीची उष्णता त्याला हवी असते, पण गर्दीचा स्पर्श नको असतो.

या शहरांत माणसें एकमेकांशीं तुटकपणानें, तुसडे-पणानें वागतात. कधीं एकमेकांच्या जवळ येण्याचा मुद्दाम प्रयत्न करीत नाहींत. उलट प्रयत्न करतात तो दूर दूर राहण्याचा. एका चाळींत शेजारीं शेजारीं राहणारीं माणसें देखील परस्परांशीं पूर्ण बेफिकीरीनें—बेपर्वाईनें वागतात. माझी एक विद्यार्थिनी येथें संसार थाटून गेल्या तीनचार वर्षांपासून राहते आहे. ती ज्या मजल्यावर राहते तिथल्या एकाहि बिऱ्हाडकराशीं तिची अद्यापि ओळख झाली नाहीं! मग सबंध चाळीची माहिती तर दूरच राहो. एका चाळींत बाहेरगांवाच्या एखाद्या गल्लीपेक्षां जास्त माणसें खास राहात नाहींत. परंतु बाहेरगांवीं गल्लींतल्या बहुतेक लोकांचा परस्परांशीं परिचय असतो. इथें तसें मुळींच नसतें. ही गोष्ट चांगली वाईट ठरविणें मी वाचकां-वरच सोंपवितों. मला मात्र मुंबईचें हें एक वैशिष्ट्य वाटतें. आणि मला तें आवडतें.

कबुतराच्या खुराड्यासारख्या लहान लहान जागेंत संसाराची बागशाही थाटणाऱ्या मुंबईतील बहुसंख्यांक स्त्रीपुरुषांविषयीं मला सदैव आदरच वाटत आला आहे. कबुतराच्या जोड्यानें चोंचींत चोंच मिळवून आनंदांत घुमत राहावें, स्वतःशींच संतुष्ट असावें, त्याप्रमाणें मुंबईतील मियांबिबींचे संसार मला दिसतात. स्वयंपूर्ण, स्वतः सिद्ध, स्वतंत्र असतात हे स्त्रीपुरुष. थोड्याशा गोष्टीनें राजी होतात ते एकमेकांवर. ऑफिसांतून परत येतांना ' तिकडून ' सायलीची किंवा अबोलीची वेणी आणतांच घरधनीण गुलुगुलु बोलू लागते ! तसेंच, घरीं आल्यावर तिच्या हातचा झकास चहा मिळतांच त्याचा मन–मोगरा मकरंद स्रवू लागतो. स्वर्गांतील इंद्र–इंद्राणींचें सौख्यच कदाचित् यांच्या तुलनेला येऊं शकेल.

मुंबईच्या परिसरांत असलेल्या अथांग सागराचीच उपमा मुंबईतील लोकवस्तीला शोभेल. बाहेरून या शहरांत येणाऱ्याची स्थिति त्यामुळें अक्षरशः दर्याभें खसखस अशी होते. ज्याला कोणाला आपल्या मोठेपणाचा गर्व वाटत असेल त्यानें मुंबईंत येऊन रहावें. त्याला आपलें क्षुद्रत्व ताबडतोब लक्षांत येईल. तुम्ही धनिक असा, पंडित असा, चित्रकार असा, लेखक असा कीं आणखी कुणी असा–तुमचा अहंकार येथें आलांत कीं आपोआप गळून पडेल. तुम्ही कोण आहांत याची चौकशी देखील

कोणी करणार नाहीं. मनुष्याला आपल्या यःकश्चित्त्वाची, लहानपणाची, क्षुद्रत्वाची मधून मधून जाणीव होणें, हें फार अवश्यक आहे. आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे, अशा भावनेनें कांहीं लोक फिरत असतांना आढळतात. आपल्यावांचून जगाचें अडून बसेल असेंहि त्यांना वाटतें. अशा लोकांनीं एकदां मुंबईत फेरफटका मारून जावा. आपण कोणत्या झाडाचा पाला, असें होऊन जाईल त्यांना.

मुंबईचा बकालीपणा मला फार पसंत आहे. गरीब, श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित, पांढरपेशे-मवाली, शिष्ट-अशिष्ट, कुलीन स्त्रिया-अकुलीन स्त्रिया, ब्राह्मण-शुद्र, व्यापारी-कामगार इत्यादींची मजेशीर गल्लत या शहरांत झालेली आहे. एका क्षणीं एकादा लक्षाधीश तुमच्या शेजारीं ट्रॅममध्यें बसलेला आढळेल, तर दुसऱ्या क्षणीं एखादा पाटीवाला तुमच्या शेजारीं बसलेला! सभ्य समजल्या जाणाऱ्यांच्या घरांवरून तुम्हीं जात असतांना, भलत्याच ठिकाणीं आपण आलों तर नाहींना अशीं घरें तुम्हांला दिसतील! तात्पर्य, कांहीं थोडे भाग वगळल्यास सर्व प्रकारच्या माणसांची सळमिसळ तुम्हांला मुंबईत झालेली आढळेल. एकाद्या लोकसत्ताक राज्यपद्धतीची राजधानी मुंबई उत्तम प्रकारें होऊं शकेल.

एवढ्या मोठ्या शहरांत कांहीं मूर्खपणाचे नमुने-अगदीं अस्सल नमुने-असावयाचेच. एका दावणीला बांध-

लेली गाय, डोक्यावर चाऱ्याची टोपली आणि तोंडानें 'गाईला चारा घाला व–गोमातेला चारा घाला व' असें म्हणत हिंडणाऱ्या बाया पाहिल्या कीं मला मुंबईतील कांहीं लोकांच्या मूर्खपणाबद्दल कींव येते. गरीबाला पैसा-देखील न देणारे लोक, गाईला पैशाचा चारा खाऊं घालून कोणत्या पुण्याचे वांटेकरी होत असतील तें त्यांनाच माहीत ! भगव्या टोप्या आणि खादीचे सदरे घालून गोरक्षणाच्या निमित्तानें हिंडणारे लोकहि मुंबईतच फार दिसतात ! मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरांत असला हा अचरटपणा पाहिला कीं मन आश्चर्यानें थक्क होतें.

पण मुंबईची खरी मोहिनी कशांत आहे, असें जर कोणीं मला विचारलें तर, ती तिच्या पदराशीं खेळणाऱ्या सागरांत आहे असें मी म्हणेन. डोंगरी, वडाळा, कुलाबा, चौपाटी, नेपियन सी, आणि जुहू हीं या सागराचीं मनोहर अशीं निरनिराळीं रूपें आहेत. कधीं या सागराचा वर्ण निळा असतो तर कधीं काळा, तर कधीं पिंवळसर पांढरा. कधीं हा एखाद्या मुनिराजाप्रमाणें दूर जाऊन एकान्तांत विचारमग्न झाल्यासारखा दिसतो. तर कधीं एखाद्या उतावळ्या कामुकाप्रमाणें या नगरीशीं झोंबाझोंबी करतांना आढळतो. याच्या लाटा अशा कांहीं लडिवाळ-पणानें किनाऱ्यावर येतात कीं, जणूं काय त्या लाटा नसून सागराचे ते अधरच या नगरीचें चुंबन घेत आहेत !

आणि या सागरावर तरंगणारें आकाश ! त्याची तर शोभा अपूर्व असते. काल संध्याकाळचीच गोष्ट. मी कुलाबा-बीचवर बसलों होतों. सूर्यास्त होऊन गेला होता. आणि एकाएकीं पश्चिम क्षितिजावरून केशरी-लाल-पिवळ्या-निळ्या-भुरकट रंगाच्या पिचकाऱ्या-अगदीं अक्षरशः पिचकाऱ्या मारल्या गेल्या. आणि त्यांच्या रंगछटांनीं सारें आकाश ओसंडूं लागलें.

मुंबईतील मानवी-समुद्रानें आपल्या ठिकाणचा अहंकार जसा नाहींसा होतो, तसेंच मुंबईच्या भोंवतीं पसरलेल्या सागरानें ईश्वराचा मोठेपणाहि प्रत्ययास येतो. असल्या मुंबईत नाहीं वाटत राहावेंसें तुम्हांला ?

## न वठणारा वृक्ष

कालिदासाने सांगितलेली रमणीयतेची व्याख्या मान्य केल्यास रमणीय वस्तूंच्या यादींत कॉलेजचें नांव घालायला कांहीं हरकत नाहीं. अगदीं शब्दशः प्रत्येक क्षणाला कॉलेजांत नाविन्य किंवा नवेपणा आढळल्या-खेरीज राहात नाही. कॉलेजांत शिकविणारे प्राध्यापक, कॉलेजांत शिकविले जाणारे विषय, कॉलेजांत शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी या सर्वांत एक प्रकारचा नवीनपणा नेहमीं दिसतो. सर्वांत कमी काळ टिकणारी विद्यार्थ्यांची पिढी होय. दर चार किंवा सहा वर्षांनीं अगदीं नवीन मुलें शिकावयास येतात. त्या मानानें कॉलेजांत शिकविले जाणारे विषय आणि त्यांचे प्राध्यापक हे थोडे

अधिक काळ टिकतात. मागच्या पिढींतील प्राध्यापक हे जसे आज दिसत नाहींत तसेंच मागच्या पिढींत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांतहि आतां कमालीचा फरक पडला आहे. कॉलेजांत जो एक प्रकारचा ताजेपणा दिसतो, त्याचें बरेंचसें श्रेय या गोष्टीला द्यायला कांहीं चिंता नाहीं. मला तर असें वाटतें, कीं प्राध्यापकहि सारखे बदलीत जावे. अमेरिकेंतील कित्येक विद्यापीठांतून हा प्रकार आजहि सुरू आहे. तेथें फिरते प्राध्यापक असतात. ते एका कॉलेजांतून दुसऱ्या कॉलेजांत—अशा तऱ्हेनें सारखे फिरत असतात ! त्यामुळें त्यांचा कंटाळा न येतां त्यांच्या ज्ञानाचा लाभ आळीपाळीनें सर्व कॉलेजांना मिळतो.

त्याच त्याच प्राध्यापकांकडून शिक्षण घेण्यानें जो एक प्रकारचा खारखेपणा आणि रुक्षपणा विद्यार्थ्यांना वाटत असेल किंवा वाटतो, तो या पद्धतींत वाटत नाहीं. प्राध्यापकालाहि कार्याचें क्षेत्र बदलल्यानें काम करायला एक प्रकारचा उत्साह वाटणें अगदीं साहजिक आहे. आपल्या येथील विद्यापीठांनीं असा कांहीं उपक्रम केल्यास तो कितीतरी चांगला ठरेल असें मला नेहमीं वाटतें. पण मग विद्येचें जेथें पीठ पडतें तें विद्यापीठ अशी जी एका खोडकर विचारवंतानें व्याख्या केली आहे तिचें काय होईल ?

त्या व्याख्येचे कांहींहि होवो. मुलांच्या आणि प्रोफेसरांच्या हिताच्या दृष्टीनें पाहतां हा प्रयोग करून

बघण्याजोगा आहे असें मला वाटतें. सध्याच्या पद्धतींत मुलांना पहिल्या टर्ममध्यें एक कॉलेज तर दुसऱ्या टर्ममध्यें दुसरें कॉलेज–अशी कॉलेजें बदलण्याची सवलत असल्यानें त्याच त्याच प्राध्यापकांचीं कदाचित् कंटाळवाणीं वाटणारीं व्याख्यानें ऐकावीं लागत नाहींत. माझ्या माहितीच्या एका सुखवस्तु व बहाद्दर विद्यार्थ्यानें एम. ए. होईपर्यंत अक्षरशः दहा कॉलेजें पालथीं घातलीं ! आणि त्यामुळें तो चांगलाच गुंड व हुषार झाला आहे ! त्या मुलाचें झालें तें ठीक झालें; पण बिचाऱ्या प्राध्यापकांना एकाच कॉलेजला चिकटून रहावें लागतें त्याचें काय ? एकाच कॉलेजला कंटाळलेले असे किती तरी प्राध्यापक मला माहीत आहेत. अगदीं सुस्त आणि निरुपयोगी बनल्यासारखे ते दिसतात. पेन्शन किंवा प्रॉव्हिडंट फंड मिळेपर्यंत कशीबशी रेंगाळत नोकरी करायलाच पाहिजे म्हणून ते ती करीत असलेले आढळतात. नसतें त्यांचें शिकविण्यांत लक्ष किंवा आणखी कशांत लक्ष ! कॉलेजची तीच इमारत, तेच आपण, तेच विषय, त्याच परीक्षा–यांनीं कंटाळून गेलेले असतात ते ! असे जे प्राध्यापक असतील त्यांच्या दृष्टीनें मीं सुचविलेला प्रयोग खचित करून बघण्याजोगा आहे.

आपल्या आयुष्यांतील सुखद स्मृतींची यादी एखाद्यानें आपणाला करायला सांगितली तर त्या यादींत

आपण जर कॉलेजांत कांहीं दिवस घालविले असतील तर कॉलेज–जीवनाचा समावेश आपण अवश्य करूं. कॉलेजांत आपण किती दिवस घालविले, बरे घालविले कीं वाईट घालविले, त्यांत यश मिळालें कीं अपयश मिळालें–हे मुद्दे स्मृतींची नोंद करीत असतांना भविष्य काळांत गौण स्वरूपाचे ठरतात. चार वर्षांचा कॉलेजचा अभ्यासक्रम संपवायला ज्यांना दहा–बारा वर्षें लागलीं आहेत, गरिबीमुळें ज्यांना अभ्यास करीत असतांना फार कष्ट पडले आहेत, अशा लोकांना वाटल्यास आपण विचारून पाहा. कॉलेजचें नांव निघतांच ते अगदीं निहायत खूष होऊन आपल्या एकेक आठवणी सांगायला सुरवात करतील. " आमच्या वेळीं तो अमका प्रोफेसर होता, असं छान शिकवायचा ! पण स्वारीची लहर लागली पाहिजे !.... तो प्रोफेसर ना ? अगदीं सरळ माणूस. पोरांनीं किती त्याला त्रास दिला असेल; पण त्याची शांति कधीं ढळली नाहीं !.... त्याची तर गोष्टच सोडा. लाख माणूस होता. पण स्वारीचीं लफडीं फार. पुस्तक न आणल्याबद्दल एका पोरीला वर्गांत त्यानं रडायला लावलं ! आणि पोरगी रडूं लागतांच त्याच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या ! असा मृदु अंतः-करणाचा माणूस आपण नाहीं पाहिला !.... होय. त्याची ऐटच नुसती पाहून घ्यावी. वर्गांतल्या साऱ्या मुलीं आप-ल्यावर अनुरक्त आहेत असें त्याला वाटत असे !.... आणि

तो विलायतेहून आलेला ? त्याचें सर्व पोकळ पांडित्य ! एम्टी बकेट....”–ह्या व अशा तऱ्हेच्या बऱ्यावाईट आठवणी कॉलेजांत जाऊन येणाऱ्या बहुतेक सर्व मंड-ळींच्या तोंडून ऐकायला सांपडणार.

किती अवीट गोडी असत असल्या आठवणींची ! संजीवनीसारख्याच असतात त्या. त्या आठवल्या कीं पुन्हा आपण कॉलेजांत जाणारे, दंगामस्ती करणारे, थट्टा-विनोद उधळणारे, प्राध्यापकांना छेडण्यांत धन्यता मानणारे विद्यार्थी किंवा माकडे आहोंत असें आठव-णाऱ्याला वाटतें. पुनर्यौवन प्राप्त झाल्याचा प्रत्यय येतो अशा वेळीं ! आपण कितीहि मोठे असलों तरी पुन्हा आपण लहान झाल्यासारखें आपणाला वाटतें. विद्यार्थी-दशेंतल्या आठवणी सांगणारा विद्यार्थी मात्र मिळाला पाहिजे. मग आपणाला कसलेंहि बंधन उरत नाहीं. पुन्हा आपण विद्यार्थीदशेंत ज्या वयाचे असूं त्या वयाचे बनतों. सुदामाला पाहातांच उगीच का श्रीकृष्ण नाचू-उडूं लागला ? सांदीपनी ऋषींच्या आश्रमांत परस्परांच्या सहवा-सांत घालविलेल्या दिवसांच्या रम्य आठवणी आतां निघ-णार याच आशेनें तो हर्षित झाला असणार !

आत्तांच पुनर्यौवनप्राप्तीसंबंधानें मी बोललों. त्या-संबंधीं एका सहाध्यापकांची आठवण सांगणें अस्थानीं होणार नाहीं. त्यांना आम्ही आदरानें ‘ बाबासाहेब ’

म्हणत असूं. बाबासाहेबांचा आनंदी चेहरा आतां दिसायाचा नाहीं, या विचारानें आम्ही कैक वेळां विषण्ण बनतों. त्यांच्याइतका कॉलेजच्या कामाशीं समरस झालेला प्राध्यापक माझ्या पाहाण्यांत अद्यापि आलेला नाहीं.- एकदां कॉलेजविषयी बोलणें निघालें असतांना ते म्हणाले, " कॉलेज म्हणजे सध्यांच्या काळांतील बदललेल्या परिस्थितींतील बदललेल्या स्वरूपाचे पूर्वीचे आश्रमच होत. पूर्वीचे आश्रम अरण्यांत असत, तर हे शहरांत असतात. पूर्वीच्या आश्रमांत बारा किंवा अठरा वर्षं विद्यार्थी राहात तर हल्लींच्या आश्रमांत चार किंवा सहा वर्षं ते राहातात. पूर्वीच्या आश्रमांत एकच ऋषि असे, हल्लींच्या आश्रमांत अनेक ऋषि असतात. पूर्वी एक किंवा दोन विषय शिकविले जात. आतां त्या मानानं पुष्कळच विषय शिकविले जातात. असा कांहीं बाबतींत फरक दिसला तरी आश्रम म्हणजे विद्यार्थ्यांचा मेळा असं समजल्यास— आणि असंच समजायला हवं; कार्डिनल न्यूमनची विद्यापीठासंबंधीं हीच कल्पना आहे—पूर्वीच्या आणि आजच्या परिस्थितींत कांहींहि फरक तसा पडलेला नाहीं. शिक्षणाचं निम्मं कार्य या मेळयानंच साध्य होतं. परस्पर भ्रातृभाव वाढविणं, एकमेकांचे विचार समजून घेऊन त्यांचा सहानुभूतीनं विचार करणं, उदारमतवादी बनणं इत्यादि गोष्टींचा शिक्षणांत अंतर्भाव केल्यास, त्या विद्यार्थी व प्राध्यापक एकत्र आल्यानंच साध्य होऊं शकतील. किती

बरं वाटतं विद्यार्थ्यांच्या सहवासांत असतांना ! कळ्यांनीं बहरलेल्या बटमोगऱ्यांच्या मांडवाखालीं आपण उभे आहोंत असं वाटतं ! अपेक्षित बहराच्या आशेनं आपलं मन अशा वेळीं भारावून जातं ! उद्यां या कळयांचीं फुलं होणार आणि सारं वातावरण सुगंधानं भरून जाणार ! उद्यां हे विद्यार्थी आदर्श नागरिक बनणार आणि सारा देश त्यांच्या गुणसौरभानं दरवळणार ! विद्यार्थ्यांच्या सान्निध्यांत वयोमानाची जागृतीच नसते. आपण अजून लहान आहोंत, तरुण आहोंत, हूड आहोंत, असंच मला नेहमीं वाटतं. माणसाचं तारुण्य आणि बाल्य टिकाविण्याचं सामर्थ्य कॉलेजइतकं कशांत नसेल."

खरेंच नाहीं का त्यांचें हें म्हणणें ? कॉलेजांत दर चार वर्षांनीं येणारीं नवीं मुलें आणि नव्या मुली, त्यांचे वेष नी केशभूषेच्या नव्यानव्या पद्धति, त्यांच्या डोळ्यांत दिसणारी अधीरता–आतुरता आणि मिस्किलपणा, त्यांच्या पावलांत असणारा आत्मविश्वास, त्यांच्या अभ्यास करण्याच्या तऱ्हा, प्राध्यापकांना छेडण्याकरितां त्यांनीं योजिलेल्या युक्त्या, जातीय आणि स्वाभाविक परस्पराकर्षणामुळें मुलांमुलींत चाललेले लपंडाव, निवडणुकी व संमेलनांच्या वेळची त्यांची धांदल व धांवपळ, कोणाच्या तरी डोळ्यांत भरण्याकरितां त्यांनीं चालविलेली धडपड व खटपट– आणि या सर्वांच्या मागें असलेली निर्व्याजता, निरागसता,

विशुद्धता व बालिशता पाहिली कीं मला हिरव्या पानांनीं बहरलेल्या, फुलांफळांनीं डवरलेल्या पक्ष्यादिकांनीं विशोभिलेल्या एकाद्या अक्षय्य वृक्षराजाची उपमा कॉलेजला द्यावीशी वाटते. विचारांचा ताजेपणा, वागणुकीचा अल्लडपणा आणि स्वभावाचा बाणेदारपणा हीं प्रकर्षानें व सारख्याच स्वरूपांत कुठें पाहावयास सांपडत असतील तर तीं कॉलेजांत होत. आणि म्हणून त्याला कधींहि न वठणाऱ्या वृक्षाची उपमा देण्याचा मोह मला आवरत नाहीं. कॉलेजबाहेरच्या जगांत प्रतिष्ठितपणाच्या नांवाखालीं प्रायः विचारांची उसनवारी आणि मारलेलीं मनें तुम्हांला पाहावयास सांपडतील. आमच्या ह्या न वठणाऱ्या वृक्षाजवळ असली घाण तुम्हांला क्वचित्च आढळेल.

कॉलेजला न वठणाऱ्या वृक्षाची उपमा मान्य केल्यास, कॉलेजांत शिकविणाऱ्या प्राध्यापकांना बागवानाची उपमा ओघानेंच आली. वृक्षाला नीट वळण लावणें, त्याला कुठें कीड लागली असल्यास ती काढून टाकणें, त्याला वेळच्या वेळीं खत–पाणी घालणें, हीं कामें बागवानानें करावयाचीं असतात. कॉलेजशीं समरस झालेल्या प्राध्यापकांनाहि असल्याच स्वरूपाचीं कामें करावीं लागतात. विद्यार्थ्यांशीं खेळीमेळीनें वागून त्यांच्या आशा-आकांक्षा जाणून घेणें, त्यांना नीट मार्ग दाखविणें, त्यांच्या अडचणी दूर करणें इत्यादि कामें प्राध्यापकांना करावीं

लागतात. ज्यांना असले बागवानाचें कार्य करायला सांपडत असले ते धन्य होत !

आपण ज्या झाडाची सेवा करण्याचें व्रत स्वीकारलें असेल तें झाड प्रफुल्ल व टवटवीत दिसतें आहे, त्याच्या पानापानावर आणि फुलाफुलावर तेज खेळतें आहे, त्याच्या फांद्यांवर पाखरांची गोड-गोड किलबिल सुरू आहे आणि आपण त्याच्या बुंध्याशीं निर्मळमनानें पाणी घालतों आहोंत हें दृश्य मला कमालीचें कमनीय व भाग्यशाली वाटतें. आणि असेंहि एखादे वेळीं वाटतें, कीं असलें पाणी घालण्याचें साधें पण भव्य नी उज्ज्वल काम करीत असतांनाच म्हातारपणीं देवाजीनें आपले गप्कन् डोळे मिटावेत ! मला वाटतें, असल्या मरणाइतकें दुसरें सुंदर मरण नसेल !

# हांक

'कु कु....कू'

तिसऱ्या प्रहरचा सुमार होता. ऊन कलूं लागलें होतें. प्रकाशाचा रंग पिवळा बनत चालला होता. आमच्या मागील दारीं कोंबडा आरवत होता—'कु....कु....कू.'

माझ्या लहान मुलानें प्रश्न केला, 'दादा, कोंबडा असा 'कु....कु....कू' कां करतो?' त्यानें कोंबड्या-सारखा आवाज केला. आम्ही सर्व तो ऐकून हंसलों. त्यानें पुन्हा हटकलें, 'पण सांगा ना, असा कां तो ओरडतो?'

'एकदां काय जंमत झाली....' मीं सुरवात केली.

'हं....हं....गोष्ट ना? सांगा.'

'हं. गोष्टच सांगतों कोंबड्याची. कोंबडा पूर्वी स्वर्गांत रहात असे. देवांचा तो लाडका होता. देवांकरितां फुलं वेंचून आणावींत, त्यांना प्रत्येक नव्या प्रहराची 'कुं....कु....कू' म्हणून जाणीव करून द्यावी आणि बाकीच्या वेळांत ऐटींनं नाचत फिरावं येवढीच काय ती त्याची कामगिरी.'

'किती छान!'

'एकदां काय झालं, फुलं आणण्याकरितां कोंबडा पृथ्वीवर आला. दिवस थंडीचे असल्यामुळं त्याला फुलं कुठं मिळेनात. भटक भटक तो खूप भटकला. शेवटीं त्याला एक फूल मिळालं. तें घेऊन तो स्वर्गाच्या वाटेला लागला. तों स्वर्गाचे दरवाजे बंद!

'अं?'

'होय. स्वर्गाचे दरवाजे पहांटे बंद होतात. कोंबड्यानं हताश होऊन हांक मारायला सुरवात केली—केशवा फूल,—केशवा फूल.'

'कोंबडा तर कु कु कू करतो?'

'आपण तसं म्हणतों. तो म्हणतो—केशवा फूल.' कोंबड्यानं खूप हांका मारल्या. तरीहि स्वर्गाचे दरवाजे उघडले गेले नाहींत. त्या दिवसापासून तो सारखा केशवाला हांकाच मारीत असतो—केशवा फूल, केशवा फूल.'

‘ कां हांका मारतो ? ’

‘ त्याला आशा आहे, कीं स्वर्गाचे दरवाजे उघडले जातील आणि आपल्या हांकेला ओ येईल.’

माझा मुलगा हें ऐकून कांहीं विचित्र तऱ्हेनें हंसला आणि त्याचें हंसणें न समजून आम्हीहि खूपखूप हंसलों.

‘ कोंबड्याच्या डोक्यावर जो लाल तुरा दिसतो तो वास्तविक तुरा नसून मुळांत फूल होतं. देवाचं फूल म्हणून कोंबडा आतां तें डोक्यावर घेऊन नाचूं लागला आहे ! ’ मी माझी बाजू सांभाळीत म्हणालों.

तें ऐकून माझा मुलगा गंभीर झाला आणि अशा तऱ्हेनें मीं माझी सोडवणूक करून घेतली.

पण अशी सोडवणूक माझ्या मनाकडून होणें शक्य नव्हतें. कोंबड्याच्या हांका मारण्यावरच माझें मन विचार करूं लागलें. मनाला म्हटलें, चला भटकायला निघूं या.

आम्ही घराबाहेर पडलों. शाळा नुकत्याच सुटल्या होत्या. पुस्तकांचा संभार वक्षस्थलाजवळ आडवा धरून थट्टा-विनोद करीत जाणाऱ्या युवती, आणि पुस्तकांचीं पाकिटें पाठीवर टाकून एकमेकांना चिडवीत जाणारीं मुलें यांना पाहून आम्हांला मौज वाटली. कितीहि थट्टाविनोद आणि मस्कऱ्या मुलांमुलींनीं केल्या तरी तीं घरीं जात होतीं; कुठल्यातरी ओढणीनें घरीं जात होतीं. कुणाला तरी हांक मारीत घरीं जात होतीं. कुणाच्यातरी हांकेला

उत्तर देत होती. ती हांक आईची असेल, बहिणीची असेल, आणखी कुणाची असेल !

मी पुढें जाऊं लागलों. एका खांबाजवळ पोस्टाचा शिपाई पेटींतील पत्रें काढण्यांत गुंतला होता. त्यानें पेटींत हात घालून सर्व पत्रें बाहेर काढलीं आणि आपल्या पिवळ्या थैलींत तीं टाकलीं. त्यांत साधीं कार्डें, गुलाबी–निळ्या–भुरकट–पांढऱ्या रंगाचीं पाकिटें, कांहीं मोठाले लिफाफे–अशी सर्व गल्लत होती. त्यानें पेटीला कुलूप लावलें आणि बॅग खांद्यावर टाकून तो चालूं लागला. तो आपला असाच चालला होता. त्याला कल्पनाहि नव्हती, कीं आपण आपल्या थैलींत शेंकडों लोकांच्या हांकेला उत्तरें नेत आहोंत ! प्रियकरांनीं आपल्या प्रेयसींना मारलेल्या हांका, प्रेयसींनीं आपल्या प्रियकरांकरितां फोडलेला टाहो, बेकारांनीं जाहिरातींना दिलेलीं उत्तरें, श्रीमंतांनीं किंवा सत्ताधाऱ्यांनीं आपल्या अंकितांना केलेलीं दुरुत्तरें, वंचितांनीं वंचकांच्या नावानें मारलेल्या आरोळ्या, मातांनीं आपल्या बालकांचे घेतलेले पापे–अशा एक कीं दोन, विविध प्रकारच्या हांकांनीं शिपायाची थैली त्याच्या पाठीवर नाचत होती, उडत होती. रोज असल्या हांका ऐकून त्याचे कान बधिर झाले होते; नाहींतर त्यानें बसल्याबसल्या या सर्व हांका ऐकल्या असत्या आणि मग त्या हांका मात्र इच्छित स्थळीं जाऊन पोंचल्या नसत्या.

मी थोडा पुढें गेलों तों कचेऱ्या सुटल्यामुळें खांद्यावर छत्र्या टाकून कारकून मंडळी घरीं परत येत होती. त्यांच्या गप्पा कचेरींतल्या कामासंबंधीं, साहेबासंबंधीं, शिरस्तेदारासंबंधीं चालल्या होत्या. बिचारे थकून गेल्यासारखे दिसत होते. एकाच्याहि तोंडावर ताजेपणा नव्हता. पण वृत्तींत लगबग, धांदल, सुटका हीं प्रतीत होत होतीं. ती कशामुळें ? अर्थात् घरून येणाऱ्या हांकेमुळें. दारी वाट पहात उभ्या असलेल्या गृहिणीच्या कल्पनेनें छत्र्यांचा तोल सांभाळींत ते लगबगीनें चालले होते.

त्यांच्याविषयीं मी विचार करीत असतांना एक अद्यतन पोषाख केलेला तरुण माझ्याजवळून गेला. कोटाच्या वरच्या खिशांतून रुमाल हलकेंच डोकावून बाहेर पाहतो आहे, बटनहोलमधील पिवळा गुलाब दिमाखानें दरवळतो आहे, केंसावरील कुठल्याशा सुवासिक तेलाचा घमघमाट पसरला आहे आणि हृदयांत उत्पन्न होणारें कुठलेंसें गाणें ओंठांवर थयथयत आहे--अशा त्या विलोभनीय युवकाला पाहून मन म्हणालें, ‘ हाहि कोणाच्या तरी हांकेला उत्तर द्यायला चालला आहे का ? ’

मी म्हणालों, ‘ बरोबर ! ’

आणि तितक्यांत विजेच्या चमकेनें एक कामिनी आली आणि रस्ता ओलांडून पलीकडे गेली. एखाद्या भिंगरीप्रमाणें तिचें शरीर नाचत असून स्थिर दिसत होतें.

तिच्या नेत्रांत तेज मावत नव्हतें, भुवयांत भाव स्थिरावत नव्हते. मुग्ध प्रेमाचे नजराणे घेतघेत ती चालली होती. तिला पाहून अधीरतेनें मन म्हणालें, ' ही देखील कुणाच्या तरी हांकेला उत्तर देण्याकरितां चालली आहे का ? '

मी म्हणालों, ' अगदीं बरोबर. '

माझे शब्द पुरे होतात न होतात, तोंच माझ्या कानांवर हांक येऊन आदळली, ' टिलिलो ! टिलिलो ! ' एका रस्त्यावरून दोन मुलें ओरडत आलीं आणि तीं एका बोळांत शिरलीं. थोड्या वेळानें पूर्वीसारखीच हांक ऐकूं आली आणि दुसरीं दोन मुलें एका बोळांत शिरलीं.

' टिलिलो, टिलिलो, ' म्हणून परस्परांना हांक मारीत जाण्याचा तो एक खेळ असून त्यांत मुलें मग्न झालीं होतीं. जो कोणी हांक मारील, त्याला उत्तर देत पळत जाण्याच्या या खेळानें त्या वेळीं माझें लक्ष फार वेधलें गेलें. मुलें ' टिलिलो–टिलिलो ' म्हणत आणि त्याला उत्तरहि ' टिलिलो–टिलिलो ' म्हणून येई. मन म्हणालें, ' मुलांनीं मारलेल्या हांकांना जसं उत्तर येतं, तसं सर्व हांकांना येतं का ?–येईल का ? '

मी म्हणालों, ' अलबत्. कां नाहीं येणार ? मनापासून मारलेल्या हांकेला उत्तर येतंच येतं. खऱ्या प्रेमानं, खऱ्या भावानं, खऱ्या निष्ठेनं मारलेली हांक–मग ती भक्ताची असो वा प्रियकराची असो, कलावंताची असो

वा कर्मवीराची असो–कधींहिं अनुत्तरित रहात नाहीं, कधींहि वांया जात नाहीं. ’

आमच्या विचारांचे पडसाद अणूरेणूंत भरल्या-सारखे मला वाटलें. कारण थोड्याच वेळांत श्रमलेल्या दिवसाची हांक ऐकून रजनी धांवत आली आणि आपल्या श्यामल अंचलाखालीं तिनें त्याला थोपटून निजविलें. रजनीनें कांहीं काळ असा घालविला असेल नसेल तोंच आपल्या चंदेरी किरणांनीं दशदिशा नाहून टाकीत हिमांशु वर जाला. रजनीच्या मूक हांकला उत्तर मिळालेलें पाहून समाधानाचा निःश्वास माझ्याप्रमाणेंच साऱ्या जगानें टाकला असेल.

## बोले तैसा चाले—

बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें—ही म्हण सर्वांच्या तोंडीं बसलेली असली तरी तिच्यांत कांहीं फार अर्थ नाहीं असें मला नेहमीं वाटतें. कारण बोलणें म्हणजे चालणें नव्हे आणि चालणें म्हणजे बोलणें नव्हे. या दोन्ही वेगवेगळ्या क्रिया आहेत असें शरीरशास्त्रज्ञ देखील सांगतील. ते म्हणतील, बोलत असतांना चालूं नये आणि चालत असतांना बोलूं नये. तोंड मिटून चालावें आणि चाल मिटून बोलावें ! असें असतांना बोलण्यांत आणि चालण्यांत मेळ कसा बसावा ? तुम्हींच सांगा, कसा बसावा ?

पण सामान्य मनुष्य म्हणणार– बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें ! तुकाराम महाराज बोलले त्याप्रमाणें चालले. एकनाथ बोलले तसे चालले. रामदास तर म्हणतातच–आधीं केलें मग सांगितलें. विवेकानंद, रामतीर्थ बोलले तसे चालले. आधुनिक संत महात्मा गांधी हेहि बोलल्याप्रमाणेंच चालतात. आधीं करतात, मग करवितात. अलबत् आम्हांला वाटतें, मनुष्यानें बोलल्याप्रमाणेंच चाललें पाहिजे, नाहींतर जगांत हाहाःकार उडेल !

उपदेश आणि कृति, तत्त्वप्रतिपादन आणि आचरण–यांत सदैव मेळ असलाच पाहिजे. असें नसेल तर काय उपयोगाचा तुमचा उपदेश आणि तुमचें तत्त्वप्रतिपादन ? सत्य बोलावें म्हणणाऱ्यानें स्वतः सत्य बोललेंच पाहिजे. चोरी करूं नये म्हणणाऱ्यानें चोरी करतां कामा नये. व्यभिचार वाईट म्हणणाऱ्यानें व्यभिचार करूं नये. स्वातंत्र्य हा सर्वांचा हक्क आहे म्हणणाऱ्यानें स्वातंत्र्यावर मर्यादा घालूं नये. पैसा सांठविणें पाप आहे म्हणणाऱ्यानें पैसा सांठवूं नये इत्यादि इत्यादि. जो उपदेश करतो त्याच्यावर त्याबरहुकूम वागण्याची जबाबदारी येतेच येते. दारू वाईट म्हणणाऱ्यानें, दारूच्या दुष्परिणामावर नाटकें लिहिणाऱ्यानें, स्वतः झिंगून पडणें याच्याइतकी नामुष्कीची आणि निंद्य गोष्ट दुसरी नाहीं. ज्या गोष्टी तुम्हांला साधत

नाहींत, त्या बोलतां कशाला आणि तोंडाची वाफ दवडतां कशाला ? त्यापेक्षां गप्प बसाल तर किती बरें ! जगावर तुमचे उपकार होतील. तुम्हाला माहीत नाहीं, कीं बोलल्याप्रमाणें चालणाऱ्याचीच लोक पूजा करतात.

अशा लोकांना मी म्हणेन, खामोश ! जरा आस्ते घ्या. बोलण्याची आणि चालण्याची अशी गल्लत करूं नका. बोलण्याबरहुकूम न चालणाऱ्याची निंदा करूं नका. त्याच्या बोलण्यांतून जो काय निष्कर्ष निघेल तो घ्या. त्याच्या बोलण्याला बोल लावूं नका. सरळ चाला म्हणणारा वांकडा चालला म्हणून तुम्ही त्याला नांवें ठेवूं नका. आणि तुम्ही तर वांकडें चालूच नका. त्याचे पाय अधु असतील म्हणून तो वांकडा चालत असेल; त्याच्या दृष्टींत दोष असेल म्हणून तो वांकडा चालत असेल; पण सरळ चालण्याचें सत्य त्याला जें सांपडलें तें त्यामुळें खोटें ठरत नाहीं. त्याची किंमत कमी होत नाहीं. किंबहुना वांकडें चालल्यामुळेंच त्याला सरळ चालण्याविषयीं तुम्हांला सांगावेंसें वाटत असेल. स्वतःच्या अनुभवावरून तो दुसऱ्याला 'हुश्शार' म्हणून म्हणत असेल. पुढच्यास ठेच मागचा शाहाणा व्हावा म्हणूनहि तो तुम्हांला 'सरळ चाला' असें विनवीत असेल. अशा वेळीं बोलल्याप्रमाणें तो चालत नाहीं म्हणून तुम्ही त्याची हेटाळणी कराल ? बरी दिसेल का अशी हेटाळणी केलेली ?

सत्य आणि व्यवहार, प्रतिपादन आणि आचरण यांत परिस्थितीनें निर्माण केलेले केवढे अजस्र आणि खोल खंदक असतात. चंद्रप्रकाशाच्या शीतल भुलावणींत खांचखळगे आणि दगड-कांटे नाहीं दिसले तरी सूर्य-प्रकाशांत ते दिसतात. सत्य आणि व्यवहार यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे तें असें. आकाशांत प्रकाशणाऱ्या तारकेचें रूपांतर पृथ्वीवर आल्यावर दगडांत होतें तेंहि असेंच.

पण म्हणून सत्याची किंमत कमी ठरेल काय? चंद्रप्रकाशाची किंमत उतरेल काय? तारका बिनमोलाची वाटेल काय? परिस्थितीनें हिरा उकिरड्यावर लोळत पडला तर त्यांत हिऱ्याचा काय दोष? आपल्या तेजाप्रमाणें तो तळपत राहिला नाहीं असें म्हणून त्याला निंदण्यांत काय अर्थ? नांवें ठेवायचीं झाल्यास परिस्थितीला ठेवा, समाज-रचनेला ठेवा; व्यक्तीला ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें, असला आततायीपणा विचारवंतांना शोभत नाहीं.

इतकेंच नाहीं, तर तो आत्मघातकी आहे असें मला वाटतें. कारण बोलल्याप्रमाणें न चालणाऱ्यांची मुस्कटदाबी आपण केली तर समाजाची प्रगतीच थांबेल. ' तुमचें आचरण तुमच्या उपदेशाप्रमाणें नाहीं; सबब कलम अमुकतमुकप्रमाणें तुमच्यावर भाषणबंदीचा हुकूम

सोडण्यांत येत आहे ' अशा तऱ्हेचा वटहुकूम एकाद्या शासनसंस्थेनें सोडला तर तिच्या दुर्दशेला पारावार उरणार नाहीं. कारण विचारवंतांची मुस्कटदाबी करण्यापरता दुसरा नादानपणा कांहीं असूं शकेल असें मला वाटत नाहीं.

प्रगतिपथावर जगाचीं जीं पाऊलें पडतात, तीं विचारवंतांच्या उपदेशामुळें. जग कसें आहे याचा विचार करीत असतांना, जग असावें कसें त्याचीं स्वप्नें, त्याचीं चित्रें, त्याचीं चिन्हें, विचारवंताला दिसूं लागतात. त्याच्या चित्तवृत्ति उल्हसित होतात. त्याच्या नेत्रांत तेज चमकूं लागतें. त्याला कांहींतरी श्रेय गवसतें आणि तो म्हणतो– ' सर्वांना स्वातंत्र्य मिळालं पाहिजे, सर्वांना अन्न मिळालं पाहिजे, सर्वांना ज्ञान मिळालं पाहिजे. ब्रह्म नाहीं मिळालं तरी चालेल.'

अशा विचारवंताचा हात धरून ' तूं कोणाला स्वातंत्र्य दिलं आहेस ? ज्ञान दिलं आहेस ? अन्न दिलं आहेस ?' असें म्हणून हटकण्यांत काय अर्थ आहे ? काय पुरुषार्थ आहे ? त्याच्या हातून कांहींहि घडूं शकलें नसलें किंवा शकत नसलें तरी त्याला सांपडलेल्या श्रेयाची किंमत कांहीं कमी होते असें नाहीं. असल्या श्रेयांच्या आणि सत्यांच्या संकलनानेंच जगाची उन्नति होत असते.

सर्व जगांतील विचारवंत कांहीं करीत असले तर तें एकच—जगाच्या ज्ञानांत भर घालणें, सद्विचारांचा ठेवा वाढविणें. विचारवंतांना सांपडलेल्या सत्यांवर सर्व जगाचा हक्क असतो. त्यांना गवसलेल्या निःश्रेयसावर सर्व जगाची मालकी असते. आणि म्हणूनच जे जे विचारवंत सद्विचारांचा सांठा वाढवीत असतील, त्यांच्या त्यांच्याबद्दल आपण सदैव ऋणी असलें पाहिजे. त्यांना आपण विचारतां कामा नये, कीं 'तुम्ही बोलल्याप्रमाणें चालतां आहांत कीं नाहीं?' त्याच्यांत आपलीच किंमत कमी होईल.

ऋषीचें कुळ आणि नदीचें मूळ शोधूं नये म्हणतात तें याच अर्थानें. ऋषीपासून सद्विचारांचा आणि नदीपासून निर्मळ जळाचा आपणांला फायदा होत असतांना त्यांच्या कुळांमुळांचा थांग लावूं पाहाणें कृतघ्नपणाचें ठरेल. हिंदु तत्त्वज्ञानांत षड्दर्शनांचा प्रकाश पाडणारे ऋषि घ्या किंवा जागतिक तत्त्वज्ञानाला सुरवात करणारे ॲरिस्टॉटल, प्लेटो, सॉक्रेटीस हे घ्या, किंवा शुद्ध तऱ्हेनें विचार कसा करावा हें शिकवणारा बेकन घ्या, स्वातंत्र्याची घोषणा करणारे रूसो, मिल्ल, स्पेन्सर, मोर्ले, मॅझिनी, टिळक हे घ्या; अगर समतेची घोषणा करणारे कार्ल मार्क्स, लेनिन, महात्मा गांधी हे घ्या. यांना सांपडलेल्या सत्यांत आणि प्रत्यक्ष त्यांच्या आचरणांत पुष्कळ फरक



ऋषींपासून सद्विचारांचा लाभ होत असतांना त्यांच्या कुळाचा थांग लावूं पाहाणें शहाणपणाचें होईल काय ?

आढळेल. परंतु तेवढ्यानें ते कमी वंदनीय ठरतात असें थोडेंच आहे ? बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें असेंच म्हणायचें ठरविल्यास यांपैकीं पुष्कळांना पूजेच्या यादींतून वगळावें लागेल आणि तें करणें ठीक होईल काय ?

कदापि नाहीं. पण नेमकी हीच चूक आपण करीत असतों. भलभलत्या गोष्टीची आपण गल्लत करतों. आतांच पाहिलें आपण, कीं बोलण्याच्या आणि चालण्याच्या क्रियेंत आपण भयंकर गल्लत आजपर्यंत केलेली आहे. एकादा मोठा विचारवंत वा तत्त्वज्ञ पाहिला आणि त्याचे विचार आपण ऐकले वा वाचले, कीं तो त्या विचारांप्रमाणें वागतो कीं नाहीं याची फिकीर आपणाला लागून तो त्याप्रमाणें वागत नसल्यास आपल्या दृष्टीनें तो कवडीमोल ठरतो ! इतकेंच नाहीं, तर आपण त्याचे वाभाडे काढून त्याला बोलणें दुर्घट करून टाकतों ! विचारांकरितां विचार, सत्याकरितां सत्य याची आपणाला किंमत कळत नाहीं. प्रत्येक चांगल्या गोष्टीच्या मागें उपयोगाचा मुंगा लावून आपण त्या गोष्टीचा खून करतों. त्या गोष्टीपासून मिळवितां येणाऱ्या तत्त्वांकडे किंवा ज्ञानाकडे आपलें लक्ष नसतें. तत्त्वज्ञानी दारूबाज असला तर आपण त्याच्या दारूकडे पाहूं, पण तत्त्वज्ञानाकडे पाहाणार नाहीं ! कलावंत शिथिल आचरणाचा असल्यास,

आपण त्याच्या आचरणांत किड्यासारखें लोळूं, पण त्याच्या कलेंत विहार करणार नाहीं ! कवि भंगड असला



" डावा–उजवा ! " त्यांच्या बोलण्यांत आणि चालण्यांत मेळ असतो म्हणून त्यांचीं पाऊलें वंदण्याची एकाद्याला स्फूर्ति झाली, तर त्याला कोण अडविणार ? ( पृ. १२० )

तर आपण त्याच्या भांगेकडे तारवटलेल्या नजरेनें बघूं. पण त्याच्या उच्च प्रतीच्या काव्याकडे उल्हसित नजरेनें बघणार नाहीं !—कारण ? कारण एकच—बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें ! खासा न्याय !

अगदीं सामान्य प्रतीच्या आचरणांत—तसाच विचार केला तर—बोलण्यांत आणि चालण्यांत मेळ आढळेल. लष्करी कवायतीनें चालणारे लोक डावा—उजवा, डावा—उजवा ( Left—Right ) करीत जातात. त्यांच्या बोलण्यांत आणि चालण्यांत निःसंशय मेळ असतो. आणि बोले तैसा चाले म्हणून त्यांचीं पाउलें वंदण्याची एकाद्याला स्फूर्ति झाल्यास त्याला कोण अडविणार आहे ? आगगाड्यांच्या वेळापत्रकांत आणि त्यांच्या जाण्यायेण्यांतहि विलक्षण मेळ असतो ! या आगगाड्यांनाहि साष्टांग नमस्कार घालण्याची प्रेरणा कुणाला झाल्यास त्याच्या आड कोणी येणार नाहीं. कांहीं पुढाऱ्यांच्या आणि राजांच्या अगोदर जाहीर झालेल्या कार्यक्रमांत आणि मागाहूनच्या त्यांच्या घटनांत मिनिटामिनिटाचा मेळ असतो ! त्यांनाहि ज्यांना लोटांगण घालावयाचें असेल त्यांनीं खुशाल घालावें !

यालाच बोलल्याप्रमाणें चालणें म्हणावयाचें असल्यास माझें कांहींच म्हणणें नाहीं. पण याव्यतिरिक्त जें आयुष्य आहे—आणि तें फार मोठें आहे—त्याच्यांत

बोलण्याप्रमाणें चालणें कठीण असतें. परिस्थितीच्या इंगळ्या चावत असतांना बोलण्यांत आणि चालण्यांत मेळ न बसल्यास आश्चर्य नाहीं. विचारवंतांची स्थिति अजगरानें विळखा घातलेल्या हतभाग्यासारखी असते. त्याला बोलण्याची ताकद असते. ( आणि ती देखील थोडा वेळ असते ) पण चालण्याची नसते. अशा वेळीं तो बोलल्याप्रमाणें चालत नाहीं म्हणून त्याच्या दुःखावर डाग देऊं नका. नम्रपणानें ऐका त्याला काय सांगावयाचें आहे तें. उगीच आचरटपणा करण्यांत काय अर्थ आहे ?

# पूर्णविराम

पुष्कळ दिवसांनीं मी माझे गुरुमित्र प्रो. मेडूंडो यांना भेटायला नुकताच कांहीं दिवसांपूर्वीं गेलों होतों. प्रोफेसर कुठल्याशा प्रश्नासंबंधीं एक विद्वत्तापूर्ण असा ग्रंथ लिहीत असल्यामुळें, उगाच त्यांच्या कामांत व्यत्यय नको यायला, या हेतूनें मी बरेच दिवस त्यांची घरीं जाऊन भेट घेण्याचें टाळीत होतो. परंतु ही गोष्ट त्यांना व मला दोघांनाहि इष्ट अशी वाटत नव्हती. माझ्या मनांत त्यांना भेटण्याचा विचार यायला आणि 'मला येऊन भेटशील का?' अशी त्यांची चिठ्ठी यायला एकच गांठ पडली. आणि मग मी अधिकच उत्साहानें त्यांच्या बंगल्यावर त्यांच्या भेटीकरितां म्हणून गेलो. प्रोफेसरांनीं

माझे हर्षभरानें स्वागत केलें आणि हस्तांदोलन झाल्या-वर माझ्या पाटीवर थाप मारीत ते म्हणाले, " काय रे, मी बोलाविल्यावांचून न येण्याचा निर्धार केला होतास वाटतं ! अं ? "

" तसं नाहीं सर. "

" मग कसं ? "

" तुम्ही ग्रंथलेखनांत गुंतला असतांना त्रास देणं मनाला प्रशस्त वाटना. ग्रंथसंपतांक्षणींच येणार होतों."

या माझ्या बोलण्यावर प्रोफेसर खूप हसले व म्हणाले, " ठीक सांगितलंस. आजच ग्रंथाला पूर्णविराम देतों, म्हणजे तुझ्या भेटीआड तो नको यायला. हो, नाहींतर काय ! "

" अशी अडवणूक काय करतां सर ? तुम्ही ग्रंथ लिहितां यांत आम्हांला केवढा अभिमान वाटतो ! "

" असं ? "

" उगीच बोलायचं म्हणून नाहीं बोलत. मना-पासून बोलतों. इतके सर्व उद्योग करीत असूनहि हा साधेपणा व ही शांति पाहिली कीं आश्चर्यच वाटतं. मीं उद्योगी माणसं पुष्कळ पाहिलीं आहेत; पण त्यांच्या ठिकाणीं मनाची शांति आढळत नाहीं. खवळलेल्या समुद्रासारखी त्यांची धडपड सुरू असते. तुमच्याकडे पाहिलं कीं पाण्यानं तुडुंब भरलेल्या शांत सरोवराची

आठवण होते. उसळलेच तर त्यावर लहानलहान तरंग उसळतात आणि ते प्रेमाचे किंवा हास्याचे असतात. ”

“ अगदी घरीं पाठ करून आल्यासारखं बोललास हं. पण चांगलं बोललास. ” प्रोफेसर हंसत उद्गारले.

“ तुम्ही वाटल्यास थट्टा करा. मला जें नेहमीं तुमच्याविषयीं वाटतं तें मी बोललों. ”

“ तूं उपन्न केलला मुद्दा फार चांगला आहे. ” डाव्या हाताच्या तळव्यानें डोक्याच्या मागील बाजूला असलेल्या केसांना गोंजारीत प्रो. मडूंडो म्हणाले, “ तुला माझ्या ठिकाणीं असलेल्या शांतीचं रहस्य जाणून घ्यायचं आहे का ? ”

“ तुम्हीं कृपा केली तर–” मी हंसत म्हणालों.

“ करतों कृपा. ” हंसत प्रोफेसर उद्गारले, “ कांहीं वर्षांपूर्वी मला एका गोष्टीचा शोध लागला. ती गोष्ट म्हणजे पूर्णविराम. आयुष्यांत आपण पूर्णविराम द्यायला शिकलं पाहिजे असं मला आढळून आलं. ”

“ म्हणजे ? ”

“ म्हणजे असं, आपण आपल्या मर्यादा ओळखून कांहींतरी जीवितकार्य निश्चित केलं पाहिजे. आयुष्याच्या पहिल्या अमदानींत आपण अनेक गोष्टी करून पाहातों. आपल्याला समाजकार्य करावंसं वाटतं, राजकारणांत डोकं खुपसावंसं वाटतं, धर्मांत लुडबूड करण्याची इच्छा

होते; चित्रकला, शिल्पकला, लेखनकला यांत हात चालवून पाहावासा वाटतो; प्रेमाचा लपंडाव खेळतां आल्यास तोहि खेळून पाहावा असं वाटतं; मैत्रीचं क्षेत्र जितकं व्यापक बनवितां येईल तितकं बनविण्याची इच्छा होते; विविध प्रकारच्या संस्थांतून सभासद, चिटणीस, अध्यक्ष या नात्यांनीं काम करण्याचा मोह उत्पन्न होतो; अशा एक कीं दोन–अनेक गोष्टी आपणाला कराव्याशा वाटतात आणि त्यांपैकीं पुष्कळशा आपण सुरूहि करतों, ”

“ मग यांत काय वावगं आहे ? ” मध्येंच मला न राहवून मी म्हणालों.

“ कोण म्हणतो वावगं आहे ? अनेक गोष्टी सुरवातीला सुरू करायला कांहींच हरकत नाहीं. आपल्या मनाचा कल नक्की कळेपर्यंत असल्या गोष्टी करायला कांहींच चिंता नाहीं. परंतु मनुष्याचं बुद्धिसामर्थ्य, शरीरसामर्थ्य, द्रव्यसामर्थ्य, हीं मर्यादित स्वरूपाचीं असल्यामुळं सर्वच गोष्टींत यश मिळणं त्याला मुळीच शक्य नाहीं. अशा वेळीं त्यानं ज्या ज्या गोष्टी त्याला झेंपत नसतील त्यांना त्यांना पूर्णविराम दिला पाहिजे. शिल्पकार होण्याची त्याची इच्छा असून त्याच्या मनाचा खरा कल तिकडे नसेल किंवा त्याला ती कला जमत नसेल तर त्यानं त्या कलेला पूर्णविराम देऊन दुसरी हातीं घेतलेली बरी. इंग्रजी वाङ्मयांतील विलियम मॉरिस

आठवण होते. उसळलेच तर त्यावर लहानलहान तरंग उसळतात आणि ते प्रेमाचे किंवा हास्याचे असतात."

"अगदी घरीं पाठ करून आल्यासारखं बोललास हं. पण चांगलं बोललास." प्रोफेसर हंसत उद्गारले.

"तुम्ही वाटल्यास थट्टा करा. मला जें नेहमीं तुमच्याविषयीं वाटतं तें मी बोललों."

"तूं उत्पन्न केलेला मुद्दा फार चांगला आहे." डाव्या हाताच्या तळव्यानें डोक्याच्या मागील बाजूला असलेल्या केसांना गोंजारीत प्रो. मॅडूडो म्हणाले, "तुला माझ्या ठिकाणीं असलेल्या शांतीचं रहस्य जाणून घ्यायचं आहे का ?"

"तुम्हीं कृपा केली तर–" मी हंसत म्हणालों.

"करतों कृपा." हंसत प्रोफेसर उद्गारले. "कांहीं वर्षांपूर्वीं मला एका गोष्टीचा शोध लागला. ती गोष्ट म्हणजे पूर्णविराम. आयुष्यांत आपण पूर्णविराम द्यायला शिकलं पाहिजे असं मला आढळून आलं."

"म्हणजे ?"

"म्हणजे असं, आपण आपल्या मर्यादा ओळखून कांहींतरी जीवितकार्य निश्चित केलं पाहिजे. आयुष्याच्या पहिल्या अमदानींत आपण अनेक गोष्टी करून पाहातों. आपल्याला समाजकार्य करावंसं वाटतं, राजकारणांत डोकं खुपसावंसं वाटतं, धर्मांत लुडबूड करण्याची इच्छा

होते; चित्रकला, शिल्पकला, लेखनकला यांत हात चालवून पाहावासा वाटतो; प्रेमाचा लपंडाव खेळतां आल्यास तोहि खेळून पाहावा असं वाटतं; मैत्रीचं क्षेत्र जितकं व्यापक बनवितां येईल तितकं बनविण्याची इच्छा होते; विविध प्रकारच्या संस्थांतून सभासद, चिटणीस, अध्यक्ष या नात्यांनीं काम करण्याचा मोह उत्पन्न होतो; अशा एक कीं दोन—अनेक गोष्टी आपणाला कराव्याशा वाटतात आणि त्यांपैकीं पुष्कळशा आपण सुरूहि करतों, ”

“ मग यांत काय वावगं आहे ? ” मध्येंच मला न राहवून मी म्हणालों.

“ कोण म्हणतो वावगं आहे ? अनेक गोष्टी सुरवातीला सुरू करायला कांहींच हरकत नाहीं. आपल्या मनाचा कल नक्की कळेपर्यंत असल्या गोष्टी करायला कांहींच चिंता नाहीं. परंतु मनुष्याचं बुद्धिसामर्थ्य, शरीरसामर्थ्य, द्रव्यसामर्थ्य, हीं मर्यादित स्वरूपाचीं असल्यामुळं सर्वच गोष्टींत यश मिळणं त्याला मुतराम् शक्य नाहीं. अशा वेळीं त्यानं ज्या ज्या गोष्टी त्याला झेपत नसतील त्यांना त्यांना पूर्णविराम दिला पाहिजे. शिल्पकार होण्याची त्याची इच्छा असून त्याच्या मनाचा खरा कल तिकडे नसेल किंवा त्याला ती कला जमत नसेल तर त्यानं त्या कलेला पूर्णविराम देऊन दुसरी हातीं घेतलेली बरी. इंग्रजी वाङ्मयांतील विलियम मॉरिस

या कवीचं उदाहरण मला या बाबतींत आठवतं. तो काव्य रची, निबंध लिही, व्याख्यानं देई, चित्रं काढून पाही, लाकडावर नक्षीकाम करी व कलात्मक संस्था चालवी! इतक्या सर्व गोष्टी तो एकाच वेळीं करी हे खरं. पण त्याचमुळं त्यांपैकीं कोणतीहि गोष्ट त्याच्याहातून उत्कृष्टपणें घडली नाहीं. विलियम मॉरिसला उत्तम प्रकारचं यश कशांतच मिळालं नाहीं. कशामुळं असं झालं असं तुला वाटतं? पूर्णविराम देण्याची कला त्याला हस्तगत झाली नव्हती म्हणून. प्रेमाप्रमाणंच व्यवसायाच्या बाबतींत एकनिष्ठा लागते. आज जेनवर प्रेम कर, उद्यां एलिझाशीं लगट कर, परवां मेरीबरोबर कानगोष्टी कर—असं जर प्रेमाच्या बाबतींत मनुष्य करूं लागला तर त्याला जेन, एलिझा, मेरी यांपैकीं एकहि मिळण्याचा संभव तर दूरच राहिला, पण पुढं कधीं एखादी पोरगी त्याच्याशीं हस्तांदोलनहि करायला तयार होणार नाहीं. एकनिष्ठा हीच खऱ्या प्रेमाची कसोटी. ईश्वराच्या ठिकाणीं अव्यभिचारिणी भक्ति असावी असं तुमचं तत्त्वज्ञान सांगतं. जें जीवितकार्य आपण निश्चित केलं असेल, त्याच्याहि ठिकाणीं आपली अव्यभिचारिणी भक्ति असायला हवी, तरच त्या कार्यांत यश येईल आणि आपल्या मनाला शांति लाभेल."

"मला वाटतं, बरोबर आहे आपलं म्हणणं."

" मनाला शांति मिळवायची असेल तर दहा ठिकाणीं लुडबूड करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सुरवातीं ग कांहीं वर्षं कार्यनिश्चिति करण्यांत जातील. तेवढीं गेलेलीं चालतील. पुढं मात्र वर्षं वायां न घालवितां ज्या गोष्टींत जमत नसेल त्या त्या करायच्या थांबविल्या पाहिजेत, त्यांना पूर्णविराम दिला पाहिजे. असं करणं कठीण आहे. त्यांत पुष्कळ त्यागहि आहे. पण यशाकरितां त्यागाची आवश्यकता आहे. हेंहि मी करीन, तेंहि मीच करीन. असल्या हावरेपणानं कांहींच साधणं शक्य नाहीं. "

" तें खरं आहे सर, पण एक शंका विचारतो तुमची परवानगी असेल तर. "

" अवश्य विचार. " पुन्हा आपल्या केसांवरून हात फिरवीत प्रो. मर्डूडो म्हणाले.

" तुमच्या पूर्णविरामाच्या सिद्धान्तानें मनुष्य अल्प-संतुष्ट, उत्साहहीन होण्याचा संभव नाहीं का ? हजारो गोष्टी आपण करून पाहाव्यात, त्या चुकल्या तर दुसऱ्या हातीं घ्याव्यात अशा तयारीनं काम करणाऱ्या मनुष्यांत उत्साह सतत राहाण्याचा अधिक संभव नाहीं का ? आपलं एकच कार्य आयुष्यभर करीत राहिल्यानं आयुष्य नीरस, बेचव, यांत्रिक बनण्याचा अधिक संभव आहे. तेंच नवींनवीं कामं हातीं घेतल्यानं तीं करण्यांत मौज वाटेल, आयुष्याला रंग येईल. आयुष्याला चाकोरीचं स्वरूप

आलं कीं त्या जगण्यांत कमला आला आहे आनंद नी कसली आली आहे गंमत ? ”

“ एक अननुभवी तरुण माझ्याशीं बोलत आहे असं मी समजत असल्यानं तुझ्या बोलण्याचं मला आश्चर्य वाटत नाहीं. या वयांत माझेहि विचार तुझ्यासारखेच होते. काय करूं आणि काय नाहीं असं मला या वयांत वाटत असे. नवीनच पंख आलेल्या पक्ष्याला ज्याप्रमाणं आकाशांत किती उंच उडूं आणि किती नाहीं असं होऊन जातं, त्याप्रमाणं तरुणपणीं कर्तृत्वाच्या आकाशांत किती उड्डाण करूं आणि किती नाहीं असं तरुणांना वाटतं. आपलं उड्डाण आपल्या पंखांच्या शक्तीवर अवलंबून आहे आणि ते पंख अवघे दोनच आहेत हें त्या वेळीं पक्ष्याप्रमाणंच आपण विसरतों. पण लवकरच ही चूक लक्षांत येते आणि मग बेतशीर रीतीनं आपण वागूं लागतों. अशा वागण्यानं कांहीं आपला उत्साह कमी होतो असं मला मुळीच वाटत नाहीं. विवेकानं आपल्या मर्यादा ओळखून त्याप्रमाणं वागण्यांत अल्पसंतुष्टपणा नसून, यश मिळविण्याचा शहाणपणा आहे. एकच एक कार्य करीत राहिल्यानं त्यांत हटकून यश मिळतं, मनाला शांति लाभते असं मी म्हणतों. तूं म्हणतोस तसल्या आयुष्याला मग चाकोरींतून जाणाऱ्या गाड्याचं स्वरूप येतं ! पण मी म्हणतों, तुम्ही त्या चाकोरीला इतकी कमी

कां लेखतां ? इच्छित स्थळीं जायचं असेल तर चाकोरींतून, विशिष्ट रस्त्यांतूनच गेलं पाहिजे. सैरावैरा धावल्यानं तुम्ही कुठंच जाऊन पोंचणार नाहीं. ”

“ नाहीं तर नाहीं. त्या धावण्यांत तर मौज वाटेल ? ” मुद्दाम प्रोफेसरांना खिजविण्याकरितां मी हंसत म्हणालों.

“ कांहीं दिवस वाटेल मौज; मग कंटाळा येईल; जीवन भकास वाटूं लागेल. चाकोरींतून सुटायचं म्हणतोस; पण सुटतां कुठं येतं आहे ? रोजचें जेवण, रोजची झोंप, रोजचा धंदा, रोजच्या गप्पा, रोजचे खेळ—ही चाकोरी कुठं सुटली आहे ? त्याच त्याच गोष्टी बहुधा रोज आपण करीत असतों. एकच कार्य केल्यानं उत्साह नाहींसा होत नाहीं, तर अजिबात कार्य न केल्यानं मात्र नाहींसा होतो. ”

“ तुम्ही म्हणतां तें खरंहि असेल. ”

“ माझा अनुभव सांगितला तुला. पुढंमागं तुलाहि तसला अनुभव येईल आणि मग तूंहि अनेक गोष्टींना पूर्णविराम देऊं लागशील. प्रत्येक गोष्टीला सुरुवात, मध्य आणि शेवट हीं असायचींच. डोंगरावर उत्पन्न झालेल्या, कड्यांवरून उड्यां मारणाऱ्या, स्वैरगतीनं, वळणावळणानं वाहणाऱ्या नदीला देखील सागरांत मिळून पूर्णविराम घ्यावासा वाटतो; तो तिला चुकत नाहीं. असला पूर्ण-

विराम देत-घेत असतांनाच तिच्या पात्राला एक प्रकारची प्रसन्नता, शांति, शोभा हीं लाभत असतात. ".

मी कांहीं बोलण्याची इच्छा करीत आहे असें समजून प्रोफेसर म्हणाले, " तुझी शंका आली माझ्या लक्षांत. पूर्णविराम याचा अर्थ 'मरण' असा तूर्त मी करीत नाहीं. तें आपल्या स्वाधीन नाहीं. मरण म्हणजे देखील एक प्रकारचा पूर्णविराम होय हें खरं. पण तो सध्यां माझा मुद्दा नाहीं. कांहीं एक काम उत्कृष्टपणानं, शांतीनं करतां यावं म्हणून दुसरीं कांहीं कामं आपण होऊन बंद करणं याचं नांव पूर्णविराम होय. आणि असला पूर्णविराम हा निराशाजनक नसून उत्साह-द्योतक आहे. वाक्य लिहीत असतांना आपण वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम देतों. तो पुढें कांहीं न लिहिण्याकरितांच देतों असं नसून पुढील वाक्य लिहिण्याकरितांहि देतों. पूर्णविरामावांचून ज्याप्रमाणं लेखनांत अर्थबोध होणार नाहीं, त्याचप्रमाणं जीवनांतहि सार्थता येणार नाहीं." असें म्हणत आणि आपल्या केसांवरून हात फिरवीत प्रो. मेडूंडो खिडकीच्या बाहेर दिसणाऱ्या निळ्या आकाशा-कडे शून्य दृष्टीनें बघत राहिले.

# ३१ डिसेंबर

गेल्या ३१ डिसेंबरची गोष्ट. दरवर्षी या तारखेच्या आसपासच्या दिवसांत मी बहुतेक परगांवीं जात असतों. जुनें वर्ष आणि नवें वर्ष यांच्या संधिकालांत बाहेर कुठें तरी जाऊन, आणि ताजेतवानें होऊन, नव्या वर्षाच्या दुसऱ्या तिसऱ्या तारखेला घरीं परत यावयाचें, असा क्रम गेल्या कांहीं वर्षांचा माझा आहे. यामुळें कांहीं फायदे व क्वचित् कांहीं तोटेहि होतात.

कांहीं वर्षांमागें श्री. नानासाहेब चाफेकर यांच्या अध्यक्षतेखालीं बडोद्यास साहित्य संमेलन भरलें असतांना, माझ्या भटक्या स्वभावाप्रमाणें मी संमेलनाच्या दिवसांत हरिद्वार-हृषिकेशच्या गंगातटाकावर भटकत होतों! अर्थात् केवळ साहित्याचा विचार केल्यास माझें अपरिमित नुकसान झालें असें माझ्या कांहीं मित्रांप्रमाणें मलाहि

एकादे वेळीं वाटतें. परंतु साहित्यसंमेळनाचें खोटें निमित्त करून नाताळच्या सुट्टींत बडोद्यास मौज मारायला आलेल्या पाहुण्यांचा मला जो खात्रीनें त्रास सोसावा लागला असता तो लागला नाहीं, यांत मला वाटतें माझा खूप फायदाच झाला असणार.

पाहुण्यांना हा माझा स्वभाव आतां माहित झाल्या-सारखें दिसतें. त्यामुळें यंदा जे पाहुणे आले ते नाताळची सुट्टी सुरू होण्यापूर्वी चार दिवस! पाहुण्यांची गाडी दाराशीं येतांच माझ्या उरांत धडकीच भरली. मनांतल्या मनांत मी त्यांच्यावर रागावलों देखील. त्यांतून पाहुणे तरी कुणी चांगले होते का? आपली सर्वच वयस्कर माणसें! एक दोन त्यांच्यांत स्त्रियाहि होत्या. परंतु त्या आया-आज्यांप्रमाणें शोभणाऱ्या अशा होत्या. असल्या पाहुण्यांपासून कसला आनंद आणि कसलें सुख, असा विचारहि माझ्या मनांत आला. परंतु आपणालाहि एक दिवस म्हातारें व्हायचें आहे, असा पोक्त विचार करून आणि चेहऱ्या-वर हर्षाच्या कळ्या उमलवून मी तावडतोब पाहुण्यांचें स्वागत केलें. माझ्या स्वागतानें पाहुणे इतके खूष झाले कीं, त्यांनीं आपले डेरेतंबू आमच्या घरात चांगले दहा दिवस ठेवले. ११ डिसेंबरला माझे पाहुणे गर्गाचार्यांच्या सुमुहूर्तावर मथुरेकडे प्रयाण करते झाले! आणि त्यानंतर मला माझ्या स्वतःविषयीं विचार करायला फुरसद मिळाली.

पण हाय! फुरसदीअंतीं केलेला विचार तापदायक ठरला. प्रवासाकरितां राखून ठेवलेले पैसे पाहुण्यांची मिजास राखण्यांत खर्ची पडले होते आणि मला बडोद्याबाहेर कुठें हि जातां येणें शक्य नाहीं, हें सत्य त्यांतून निर्माण झालें होतें. अर्थात्, त्या दिवशीं माझ्या डोक्यांत क्रांतीचे विचार अगदीं थैमान घालीत होते. भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे, माझ्यासारख्या श्रमजीवी आणि बुद्धिजीवी माणसांना मिळतो त्यापेक्षां अधिक पैसा मिळाला पाहिजे, आम्हांला प्रवास करतां आला पाहिजे, थोडीशी चैन करतां आली पाहिजे, 'इन्किलाब झिंदाबाद,' 'क्रांति चिरायु होवो.' इत्यादि अगदीं अद्यतन आणि पुरोगामी विचार माझ्या डोक्यांत सुरू होऊन, जणूं काय त्यांचा नशाच माझ्यावर चढला होता!

परंतु नशा चढून काय उपयोग? इमानें इतबारें नोकरी करणाऱ्या माझ्यासारख्या शिक्षकाला मनांतल्या विचारांना मनांतच दाबून ठेवावे लागत असल्यानें, मी विचारचक्र प्रयत्नानें बंद केलें, आणि आईनें समोर आणून ठेवलेला चहा घेतला.

त्या चहानें मात्र माझ्यांत अनुकूल बदल घडवून आणला; आणि माझी खात्री झाली कीं, रेल्वे स्टेशनावरील चहाच्या दुकानावर झळकत असलेल्या चहाविषयक जाहिराती सर्वस्वी खऱ्या आहेत. 'गरमीके दिनोंमें थंडक

देनेवाली चहा है '—हें म्हणणें अगदीं खरें आहे. हवेंतील उष्णता जो चहा कमी करूं शकतो, तो डोक्यांतील उष्णता कमी केल्याखेरीज कसा राहील ? कधींच नाहीं. निदान माझा तरी अनुभव तसा नाहीं. चहामुळें क्षणापूर्वी उत्पन्न झालेले सर्व क्रांतिकारक आणि पुरोगामी कीं पुच्छगामी विचार माझ्या डोक्यांतून पार नाहींसे होऊन, त्या जागीं शांत विचार सुरू झाले. ठीक आहे, असेंच चालावयाचें, असेच पाहुणे यावयाचे, असेच खिसे रिकामे व्हावयाचे-अशा प्रकारचें शांत सौम्य नि मवाळ विचार माझ्या डोक्यांत सुरू होऊन माझ्या आईला आणि पत्नीला हायसें वाटलें, असें त्या दोघींच्या चेहऱ्यावरून मला दिसलें.

मी कोट–टोपी चढविली आणि घराबाहेर पडलों. दुधाची तहान ताकावर भागवावी, त्याप्रमाणें लांबचा प्रवास नाहीं तर नाहीं, जवळचा प्रवास करावा असें मी ठरविलें. चालत चालत मी स्टेशनावर गेलों. सुदैवानें तिथें दोन गाड्या उभ्या असून त्या परस्पर भिन्न दिशांना जाणाऱ्या होत्या. त्यांपैकीं एका गाडीनें गेलों असतांना रात्रीं बडोद्यास परत येण्याची शक्यता पाहून मला आनंद झाला. त्या आनंदाच्या भरांत स्टेशनमास्तरला मी तिकीटाची किंमत विचारली. 'जाऊन येऊन सुमारे एक रुपया लागेल' असें त्यानें सांगितलें ! मी माझ्या खिशांत हात घालून पाहतांच त्यांत सात आठ पैसेच असलेले

आढळले ! या ठिकाणीं माझी कींव करणाऱ्या कांहीं वाचकांना ३१ तारखेला त्यांच्या स्वतःच्या खिशांची काय अवस्था होते, तिकडे लक्ष देण्याची मी नम्रपणें सूचना करतो. माझा पडलेला चेहरा पाहून स्टेशनमास्तरनें सहानुभूति व्यक्त केली. परंतु तसें कांहीं करण्याची जरूरी नाहीं, असें त्यांस मी आश्वासन दिलें.

गाडीनें प्रवास नाहींतर नाहीं, पायींच प्रवास करावा असें मीं शेवटी ठरविलें. आणि स्टेशनावर उभ्या असलेल्या दोन्ही गाड्यांकडे आणि त्यांत बसलेल्या प्रवाशांकडे तुच्छतेनें बघत मी मुंबईच्या दिशेनें जाऊं लागलों.

सर्व प्रकारचीं सुचिन्हें मला होऊं लागलीं. वारा मंद मंद वाहू लागला ! आकाश निरभ्र दिसूं लागलें ! भारद्वाज पक्षी मला मधून मधून दिसू लागले ! आणखीहि कांहीं गोष्टी दिसल्या. परंतु त्या शुभ कीं अशुभ यांची मला माहिती नसल्यानें त्यांच्याविषयीं मुग्धताच स्वीकारीत आहे. एखाद्या वीराप्रमाणें माझीं पावलें दमदार पडत होतीं. आणि थोड्याच वेळांत मी पुष्कळ चाललों असें रेल्वेच्या बाजूनें लावलेल्या माइली-धोंड्यांवरून मला कळलें. थोडा का होईना, पण प्रवास आज झाला या जाणीवेनें मला खूप बरें वाटलें. मी सूर्याकडे बघितलें. तें बुवा आपला दिवसाचा प्रवास संपवून अस्ताला

३१ डिसेंबर
70407

जाण्याच्या तयारींत दिसले. अर्थात् मलाही माझा प्रवास तिथेंच थांबवावा लागला.

एका दगडावर बसून सूर्यास्ताची शोभा मी पाहूं लागलों. जुन्या वर्षाचा निरोप सूर्य घेत असतांना दिसत होता. आणि हें हृदयस्पर्शी दृश्य आकाशांत जमा होऊन विविध रंगांचे ढग पाहात होते. क्षितिजापासून वर आकाशांत ढगांच्या बिछायतीवर सूर्यकिरणांचा पट्टा दिसत होता. त्याचा खालचा भाग अंधुक व वरचा भाग अधिकाधिक प्रकाशमय होता. जुन्यावर्षांतून निर्माण होणारें नवें वर्ष जणूं काय असेंच प्रकाशमय, तेजोमय, स्फूर्तिमय निघणार अशी ग्वाही किंवा सूचना त्या प्रकाश-मार्गावरून मिळत होती. तें दृश्य पाहून नकळत माझे दोन्ही हात जोडले गेले. यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ही ओळ मला आठवली आणि वाटलें कीं, खरेंच अजूनहि विश्वाचें किंवा विश्वेश्वराचें सम्यक् ज्ञान कुठें झालें आहे आपणाला. नमस्कार असो त्या चिरशक्तीला ! तिच्या महानुभूतीनें नवें वर्ष सुखाचें आणि प्रगतीचें सर्वांचे होवो !

६९५६
REFBK-0006154

" कांहीं वर्षांपूर्वी एका ब्रह्मचाऱ्यानें स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील धोंड होय असें गंभीरपणें आणि हताशपणें जाहीर केलें होतें. बिचारा ब्रह्मचारी ! स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील धोंड नसून ती एक सुंदर नदी आहे. जिच्या निर्मळ प्रवाहाकडे पाहून पुरुषाला पोहावेंसें वाटतें, विहार करावासा वाटतो, जिच्या कांठावर त्याला संसार थाटावासा वाटतो, जिच्या तिरावरील फुलांनीं आणि फळांनीं त्याच्या चित्तवृत्ति थरारून जातात अशी ती एक सुंदर नदी आहे. "

—मी आणि तरुणस्त्रिया, पृ. ६५

# मराठी नाट्यसृष्टि

पृष्ठ संख्या पांचशेच्या वर | **खंड पहिला** | किंमत पांच रुपये

## पौराणिक नाटकें

लेखक:—प्रो. वि. पां. दांडेकर, एम्.ए.

प्रस्तुत ग्रंथाच्या मुद्रणाला आतां सुरुवात झाली असून तो येत्या जून मध्यें प्रसिद्ध होईल. सुमारे पांचशें पृष्ठांच्या या ग्रंथांत लेखकानें पौराणिक नाटकांची सर्वांगीण चर्चा केली आहे. ललितें, तमाशे, कळसुत्री बाहुल्या, दशावतारी खेळ इत्यादिकांची या ग्रंथांत आलेली माहिती साधार व सोपपत्तिक असून, तिनें पौराणिक नाटकांवर नवीन प्रकाश टाकला आहे. इ. स. १६९० च्या सुमारास लिहिलेल्या लक्ष्मीकल्याणनाटकापासून ते १९४० पर्यंतच्या अडीचशें वर्षांच्या काळांत तयार झालेल्या सुमारें तीनशे नाटकांवर छोटी–मोटीं परीक्षणें या ग्रंथांत आल्यानें संदर्भग्रंथ म्हणून त्याची योग्यता पुष्कळच वाढली आहे. मराठी वाङ्मयांत अशा प्रकारचा हा पहिलाच ग्रंथ असल्यानें आपल्या पुस्तकालयांत तो असणें अत्यंत अगत्याचें आहे. याच क्रमानें सामाजिक नाटकें, ऐतिहासिक नाटकें, नट-नाटककार नाटक कंपन्या, रंगभूमी इत्यादींवर ग्रंथ यथावकाश प्रसिद्ध होतील. प्रसिद्ध पुस्तक विक्रेत्यांकडे ग्रंथ मिळण्याची सोय करण्यांत आली आहे. शिवाय खालील पत्त्यावर ते मिळूं शकतील.

**कृष्णाजी वामन मराठे**

प्रोप्रायटर, श्रीरामविजय प्रिंटिंग प्रेस

रावपुरा, बडोदें.